नोकरी रा. ९, दिशांत, दि पा को ऑप. हौ.
सोसा. संघवीनगर औंध पुणे ७.

समक्ष विचारले वरुन सांगतो की, मी वरील ठिकाणी माझे परीवारासह राहणेस असून मी, सुवर्णयुग सहकारी बँक लिमी; मारणे हाईटस् ११०२/१०/११ बुधवार पेठ पुणे या बँकेमध्ये सुमारे २० वर्षा पासुन नौकरी करित असुन सुमारे ४ वर्षापासुन व्यवस्थापक या पदावर कार्यरत आहे. तसेच सदर बँकेमध्ये श्री सुरेश शिवाजीराव काके रा. कृष्णा नगर सोसा- म्हात्रे पुलाजवळ एरंडवणा पुणे. हे सरव्यवस्थापक म्हणुन काम पाहत असुन, आमच्या बँकेच्या एकूण ६ शाखा पुणे शहरात १, शाखा जेजुरी व १ शाखा नेणावळ्या ठिकाणी आहे. आमच्या बँकेचे, बँक नियमानुसार एकुण १८ सदस्य असलेले संचालक मंडळ व दोन सेवकसंचा- -लक आहेत. त्याचे सरव्यवस्थापक हेच पदसिद्ध संचा- -लक म्हणुन काम पाहतात.

आजरोजी पुणे शहरातील प्रमुख दैनिक वर्तमान- पत्रामध्ये आमच्या सुवर्णयुग सहकारी बँक लिमी. या बँकेविरुद्ध श्री डी. एन. काळे, विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था वर्ग-2 यांनी बँक कर्ज रोखे व्यव- हारात होम ट्रेड लिमिटेड या संस्थांच्या बरोबर संगनमत करून ५ कोटी, ६५ लाख रुपयाचा गैरव्यवहार करुन ठेवी- दाराशी व सभासदाशी फसवणूक केली अशी बातमी प्रसिद्ध झाल्याने मी स्वत: पोलिस ठाण्यात येवुन चौकशी केली तेव्हा मला वरील फिर्याद दाखल झाल्याचे समजले. आमचे बँकेचे सर- व्यवस्थापक श्री सुरेश काके व अध्यक्ष श्री उल्हास - 26

कालीरवे हे अनुक्रमे परवानगी व आगाशी असल्याने त्यांचे वतीने मी बँकेचा व्यवस्थापक या नात्याने माझी साक्ष की;

फिर्यादी यांनी दर्शविलेले आरोपी क्र. १ ते १९ हे संचालक मंडळ सन १९९८ ते सन 2003 या ५ वर्षांचे कालावधी करिता नियुक्त आहे पैकी क्र. १९ येथे दर्शविलेले श्री सुरेश शिवाजीराव काळे हे सन २००० मध्ये सरव्यवस्थापक म्हणून नियुक्त झाले आहेत. संचालक मंडळाचे ठरावानुसार कर्ज रोखे खरेदी-विक्री गुंतवणूक या संदर्भात दैनंदिन व्यवहार बाबत सर्व अधिकार अध्यक्ष, उपाध्यक्ष, व सरव्यवस्थापक यांना दिलेले आहेत. या पैकी जो कोणी हजर असेल तो वरील व्यवहाराचे आदेश देऊ शकतो; व ते व्यवहार झाले नंतर त्यावर कार्योत्तर मंजुरी साठी सदर संचालक मंडळाचे होणाऱ्या मिटींग मध्ये ठेवण्यात येऊन त्याची अंतिम मंजुरी घेण्यात येते.

आमच्या बँकेने दि. ३०।०३।२००२ रोजी बँकेच्या करीता, बँकेतील नेहमीच्या होणाऱ्या कर्ज रोख्यांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारानुसार बँकेकडे नेहमीचे से.बी. मान्यता प्राप्त अनेक ब्रोकर पैकी होम ट्रेड लिमीटेड वाशी मुंबई यांचे कडे खालील तपशील प्रमाणे व्यवहार झाले आहेत.

१) बँकेकडे उपलब्ध असलेले महाराष्ट्र जिवन प्राधिकरण १३.५०% २०१० दर्शनी किंमत ५ कोटी, १ लाखा प्रमाणे ५०० सर्टीफिकेट क्र ०२९९७७०१ ते ०२९९७७५०० असे फिजीकल स्वरूपात असलेले बाँड बँकेकडे उपलब्ध होते. मे. होम ट्रेड लिमि. यांनी बँकेकडे असा प्रस्ताव दिला की, सदरचे रोखे (अलॉटमेंट लेटर) फिजिकल स्वरूपात असल्याने बँकेस केंद्र सरकारचा रोखा ८.०७%, २०१७ हा रोखा तुम्हास देव करतो, सदर खरेदी विक्री

वरिष्ठ ना. मिथे विभाग पोलीस ठाणे पुणे

पुरवणी: विश्रामबाग पोस्टे गु.र.नं. ६५/2002 भा.दं.वि.क. ४०६, ४०९, ४२०, ३४ मधील साक्षीदार वसंत दत्तात्रय कामत यांचे आले तपासले टिपण लिहून घेतले असे.

---

व्यवहारात बँकेस उत्तम नफा मिळणार असल्याने बँकेने सदरचा प्रस्ताव मान्य केला. या विषयी आवश्यक ती कायदेशीर कॉन्ट्रॅक्ट नोट बँकेस उपलब्ध करून दिली. तसेच सदर खरेदी विक्री व्यवहारातील फरकाची रक्कम रुपये १,४४,५९९ रु. ३५ पैसे त्या HDFC बँकेच्या चेक क्र. ३२९६०७ ला पास झाला. सदर व्यवहाराची नोंद दि. २०।०२।०२ रोजी बँक दफ्तरी आहे. यावर बँकेने नेहमीच्या पद्धतीने त्यांच्याकडे सर्टिफिकेट बाबत मागणी केली. त्यावर त्यांनी कळविले की, हा रोखा फेडरल बँकेच्या नांवाने असल्याने सर्टिफिकेटचे विभाजन करण्या करिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांचे कडे पाठविले आहे. याची खात्री पटविण्या करिता आर.बी.आय. बँकेची झेरॉक्स (रिसीटची) बँकेस दिली. बँकेच्या नियमानुसार, या साठी २१ दिवसाच्या कालावधी लागणार असल्याने बँक तो पर्यंत थांबली. यानंतर बँकेने होम-ट्रेड लिमी. यांचेशी वेळोवेळी संपर्क साधला. कारण वर्षाअखेरी मुळे सदर फिजीकल रोखे, बँकेस RBI च्या नियमानुसार SGL (सबसीडीअरी जनरल लेजर) मध्ये रुपांतरीत करायचे होते. यावर होमट्रेड लिमिटेड ने सदर रोख्याच्या झेरॉक्स प्रती बँकेस उपलब्ध करून दिल्या, व बँकेस कळविले की, फेडरल बँकेच्या अधिकाऱ्याच्या रजा चुकल्याने विलंब होत असे. वेळो वेळी मा. सरव्यवस्थापक श्री सुरेश काळे यांना होम ट्रेड लिमी. कडून सांगण्यात येत असे.

→

परतू बंकेस SGL मध्येच कर्जरोखे असल्याने कंपनीने ७.५०% २०१० दर्शनी किंमत ५ कोटी ६५ लाख चा रोखा बँकेने विकत घ्यावा असे सुचविले, पुर्वीचा ८.०७% २०१७ हा रोखा बँकेने विकून टाकावा असे लेखी पत्र व कॉन्ट्रॅक्ट नोटस् बँकेच्या दप्तरी आहेत. सक्षम पदाधिकारी यांनी सदरच्या प्रस्ताव मान्य केल्यानंतर दि. ३०/०३/२००२ सदर खरेदी विक्री व्यवहाराची प्रत्यक्ष पुर्तता बँकेच्या हिशोबामध्ये हि नोंदविण्यात आली आहे. सदर खरेदी विक्री व्यवहारातील फरकाची रक्कम रुपये १६,०६७ रुपये २५ पैसे HDFC चेक क्र. ८६४१४७ नुसार बँकेकडे जमा झाली आहे.

वरील आमच्या बँकेने होम ट्रेड लिमी. शी जो कॉन्ट्रॅक्ट नोट प्रमाणे व्यवहार केले त्या प्रमाणे त्यांनी कोणतेही कर्जरोखे सर्टीफिकेट न देता टाळाटाळ करु लागल्याने आमचे बँकेचे अध्यक्ष व सरव्यवस्थापक हे होम ट्रेड लिमी. कंपनी वाशी मुंबई यांचे कार्यालयात समक्ष भेटले त्यावेळी होम ट्रेड लिमी. चे कार्यकारी संचालक: एन. एस. त्रिवेदी, व केतन शेठ यांनी असे आश्वासन दिले की, तुमच्या व्यवहाराची लवकरात लवकर पुर्तता केली जाईल. परंतु बँकेच्या असे लक्षात आले की, होम ट्रेड लिमी. कंपनी हेतूपुरस्स टाळाटाळ करीत आहे तसेच त्या कंपनी विषयी वर्तमान पत्रा-तुन उलट सुलट बातम्या प्रसिध्द झाल्या त्याचे व्यवहार संशयास्पद असल्याचे बँकेच्या लक्षात आल्याने बँकेने संचालक मंडळाची तातडीची सभा दि. २२/५/२००२ रोजी बोलावुन त्या मध्ये असा ठराव झाला, होम ट्रेड ला ४८ तासाच्या मुदतीत सर्टीफिकेट मिळणेची नोटिस पाठवावी, त्या नुसार कायदेशीर नोटिस →

ए. जी. विधिज्ञ चोरे, पुणे

पुरवणी : विश्रामबाग पोस्टे गुरनं ६५/2002 भा. दं. वि. क. ४०६, ४०९, ४२०, ३४ मधील साक्षीदार वसंत दत्तात्रय कामत यांचे झाले तपासाचे टिपण खालील प्रमाणे असे

---

होम ट्रेड कंपनीला बाय बॅक पोच केले परंतु त्याला त्यांनी दाद दिलेली नाही तेव्हा आमच्या बँकेची ५ कोटी ६५ लाखाची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्या संदर्भात दि. २६/७/2002 रोजी संचालक मंडळाची तातडीची सभा होऊन सदर होम ट्रेड कंपनी व त्यांचे संचालक मंडळ यांचे विरुद्ध फौजदारी दावा दाखल करावा असे ठरावाने पास झाले त्या प्रमाणे आमचे बँकेचे सरव्यवस्थापक यांनी दि. २९/०७/2002 रोजी मा. ज्युडी. मॅ. साो फर्स्ट क्लास कोर्ट पुणे यांचे कोर्टात भा. दं. वि. क. ४०९, ४२०, ४६५, ३४ प्रमाणे दावा दाखल केला त्याचा नंबर १३७/2002 दि. २९/०७/2002 असा आहे. आम्ही आमच्या दाव्यात दर्शविलेले होम ट्रेड लिमी. कंपनीचे संचालक मंडळ खालील प्रमाणे १) संजय अगरवाल २) डॉ. ओ. पी. त्रिवेदी ३) मनोज (माईक) शहा ४) धनंजय अगरवाल ५) ॲलन जेम्स मॅकमिलन, ६) रसेल वोयकन ग्रोजर ७) शशांक रानडे ८) सनिल गांधी ९) विजय कुमार मोदी १०) केतन शेठ, असे आरोपी दर्शविले आहेत. वरील दावा दाखल केल्यानंतर आम्ही, आमच्या बँकेची होम ट्रेड लिमी कंपनीने ५ कोटी ६५ लाखाची फसवणूक केल्याबाबत लेखी पत्र दि. ०२/०९/2002 रोजी रिझर्व बँक ऑफ इंडीया व मा. सहकार आयुक्त कार्यालयात दिले आहेत. आमच्या वरील पत्रानुसार आम्ही, आमच्या

बँकेने कोणाच्याही हेतीकारवी / स्वार्थासाठी फसवणूक केलेली नाही.

वरील प्रमाणसार R.B.I. व सहकार खात्याचे अधि. म्हणजे फिर्यादी, यांनी दि. 07/05/2002 व 08/05/2002 या दिवशी बँकेच्या सर्व व्यवहाराची सारकाईने तपासणी केली त्यावेळी बँकेने त्यांना सर्व व्यवहाराच्या कागद-पत्रांच्या प्रती दिल्या आहेत.

फिर्यादी यांनी आमची बँकेचे सरव्यवस्थापक व संचालक मंडळ यांचे विरुद्ध ज्या कागदपत्रांवरती आरोप केले ते संपुर्णपणे चुकीचे आहेत कारण बँकेचा कोणताही प्रत्यक्ष संबंध नसताना उलट होम ट्रेड लिमी. कंपनी कडूनच बँकेची फसवणूक होवून होम ट्रेड च्या संचालक मंडळाने बँकेस वेळोवेळी आश्वासन देवून योग्य ती कागदपत्रे देवून बँकेने १९९९ साल पासून होमट्रेड व त्यांचेशी संलग्न कंपन्या यांचेशी जे कर्जरोख्याचे विश्वासाने व्यवहार केले त्या विश्वासाला होमट्रेड कडून तडा गेला आहे. तसेच वरील बाब होम ट्रेडने जाणिव पुर्वक केली आहे व आमच्या बँकेची फसवणूक केली आहे.

All allegations are mainly against HTL

आपण दिलेल्या नोटीसी प्रमाणसार बँकेचा व्यवस्थापक या नात्याने मी आपणा कडे बँके कडील व्यवहाराची कागदपत्रे बँकेकडील प्रमाणपत्रे सादर करीत आहे.

हे माझे टिपण मी वाचुन पाहिले ते माझे सांगणे प्रमाणे बरोबर लिहिले आहे.

समक्ष

म्हणुन माझे सांगणे

वरिष्ठ पो. निरी. बि[illegible] पोस्टे.

Employee of Bank Accountant

टिपण तारीख १६।५।२००२ (११),

मी - सुनिल विष्णू प्रसाद बारी वय ३८
व्यवसाय नोकरी रा. ३०८ क्र. शुक्रवार
पेठ पुणे २ फोन - ४४६१२१२
४४९५६२२

समक्ष हजर राहून विचारले वरून सांगतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहणेस असून मी सुवर्ण युग सहकारी बँक लि.- मारणे हाईट्स ११०२/१०।११ बुधवार पेठ पुणे या बँकेत सुमारे १५ वर्षा पासून नोकरी करीत आहे. व दोन वर्षा पासून मी अकौंटंट या पदावर कार्यरत आहे. आमचे बँकेचे सरव्यवस्थापक म्हणून श्री. सुरेश शिवाजीराव काळे रा. कृष्ण नगर - सोसायटी म्हात्रे पुला जवळ एरंडवणा पुणे हे आहेत. व बँकेच्या एकूण ८ शाखा असून पैकी ६ शाखा पुणे शहरात तर एक जेजुरी व एक लोणावळा या ठिकाणी आहे. तसेच बँकेचे एकूण १८ सदस्य संचालक व दोन सेवक संचालक आहेत. सरव्यवस्थापक हेच प्रमुख पदसिद्ध संचालक म्हणून काम पहातात.

आज रोजी पुणे शहरातील प्रमुख वृत्तपत्रा मध्ये मी नोकरी करीत असलेली सुवर्ण युग सहकारी बँक लि. ची संचालक मंडळ व होम- ट्रेड लि. कंपनी वाशी मुंबई चे संचालक मंडळ यांनी संगनमत करून ५ कोटी ६५ लाख रु. चा कर्जरोखे खरेदी प्रकरणी गैर व्यवहार करून बँकेचे ठेविदार व सभासद यांची फसवणूक केले बाबत श्री. डी.एन. काळे विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था वर्ग २ पुणे यांनी फिर्याद दाखल केल्याची बातमी प्रसिद्ध झाली. म्हणून मी स्वत:, बँकेचे व्यवस्थापक श्री. वसंत कामत यांचे सह पो. ठाणे येथे येवून चौकशी

केली तेव्हा मला वरील फिर्याद वाचणेस मिळाली
तसेच बँकेचे सरव्यवस्थापक श्री. कुंभे व अध्यक्ष
अनुक्रमे बाहेरगावी व आजारी आहेत. परंतु मी
सुवर्णयुग सहकारी बँकेचा अकौंटंट या नात्याने माझे
सांगणे की,

श्री. डी.एन. कुंभे यांनी त्यांचे फिर्यादी
मध्ये दर्शविलेले १ ते १८ प्रमाणे आरोपी हे आमचे
बँकेचे सन १९९८ ते सन २००३ या पांच वर्षाचे
कालावधी करीता संचालक मंडळ म्हणून नियुक्त आहेत
तर सुरेश शिवाजीराव कुंभे हे सन 2000 मध्ये
सरव्यवस्थापक म्हणून नियुक्त झाले आहेत. संचालक
मंडळाचे मिटींग मध्ये झालेल्या ठरावा नुसार बँकेचे
कर्ज रोखे खरेदी विक्री गुंतवणूक या संदर्भातील दैनंदिन
व्यवहाराचे अधिकार हे अध्यक्ष, उपअध्यक्ष व सरव्यवस्था-
पक यांना देणेत आले आहेत त्यांचे पैकी जो कोणी हजर
असेल तो वरील व्यवहाराचे संदर्भात आदेश देवू शकतो
व ते व्यवहार झाले नंतर कार्योत्तर मंजूरी साठी
संचालक मंडळाचे होणाऱ्या मिटींग मध्ये मांडणेत
येवून त्यांची अंतिम मंजूरी घेणेत येते.

वरील कर्ज रोखे खरेदी विक्रीचे
हे आर.बी.आय. चे नियमावली प्रमाणे तरतुदी
प्रमाणे केले जातात. व आमची बँक सेबी ची
मान्यता प्राप्त ब्रोकर पैकी सन १९९९ पासून होम-
ट्रेड लि. कंपनी वाशी मुंबई यांचे शी कर्ज रोखे खरेदी
विक्रीचा व्यवहार करीत आहे. त्या प्रमाणे बँकेकडे
उपलब्ध असलेले महाराष्ट्र जिवन प्राधिकरण १३.५०%-
२०१० दर्शनी किंमत ५ कोटी १ लाख प्रमाणे ५०० सर्टिफिकेट
क्र ०२८८६६०१ ते ०२८८६६५०० असे फिजीकल स्वरुपात
असलेले बॉन्ड आमचे बँके कडे उपलब्ध होते. म्हणून
होम ट्रेड कंपनी लि. यांनी बँके कडे असा प्रस्ताव

म्हणून माझे सांगणे

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पो. ठाणे

पुरवणी :- वि. बाग पो. ठाणे. गु.र. नं. ६५/००२
IPC 406, 409, 420, 34 मध्ये दिनांक
३६/५/००२ रोजी सुनिल बारी यांचे जबानी
टिपण

की, सदरचे रोखे (ॲलाटमेन्ट लेटर) फिजीकल
स्वरुपात असल्याने बँकेस केंद्र सरकारचा रोखा
८.०७%, २०१० हा कुम्हास देवू करतो. त्या व्यव-
हारात बँकेस चांगला नफा होणार असलेने बँकेने
तो प्रस्ताव मान्य केला. या विक्रीची कायदेशीर
कॉन्ट्रक्ट नोट होम ट्रेड लि. कंपनी यांनी बँकेस
दिली. सदर खरेदी विक्री व्यवहारातील फरकाची
रक्कम ९,४४,५६६/३५ रु. पैसे चा H.D.F.C बँके-
चेक क्रं. ३२१६०७ हा दिला व तो पास झाला.
त्या व्यवहाराची नोंद मी स्वत: दि. 20/2/2002
रोजी बँकेचे दप्तरी केली आहे. आमचे बँकेने
नेहमीच्या पद्धतीने सर्टिफिकेट ची मागणी केली.
त्यावर होम ट्रेड कंपनी लि. ने बँकेस कळवले की.
हा रोखा फेडरल बँकेचे नावे असलेने सर्टिफि-
केट्स विभाजन करणे करीता रिझर्व्ह बँक ऑफ
इंडिया यांचे कडे पाठवलेले आहे. व ती
खात्री पटविणेसाठी आर.बी.आय. बँकेची
रिसीटची झेरॉक्स प्रत आमचे बँकेस दिली.
बँकेचे नियमानुसार या साठी २१ दिवसाचा
कालावधी लागणार असलेने बँक थांबली त्यानंतर
बँकेने होम ट्रेड कंपनी लि. यांचेशी वेळोवेळी संपर्क
साधला कारण आमचे बँकेस वरील अटीमुळे
सदर फिजीकल रोखे. आर.बी.आय. चे नियमा
नुसार एस.जी.एल मध्ये रुपांतरीत करायचे
होते. परंतु होम ट्रेड लि. कंपनीने सदर रोखेचे
झेरॉक्स प्रती बँकेस उपलब्ध करुन दिल्या व
कळवले की फेडरल बँकेचे अधिकाऱ्या च्या

सदर्या चुकल्यामुळे विलंब होत आहे. तसेच होम ट्रेड लि. कंपनीने बँकेस असे सुचवले की ७.५०% २०१० दर्शनी किंमत ५ कोटी ६५ लाख हा रोखा बँकेने विकत घ्यावा त्या बदल्यात पुर्वीचा कर्ज रोखा ८.०७% २०१७ हा बँकेने विकून टाकावा. असे दिलेले लेखी पत्र व कॉन्ट्रक्ट नोट बँकेची दप्तरी नोंद केली आहे. सक्षम पदाधिकारी यांनी सदर प्रस्ताव मान्य केले नंतर दि. ३०/३/२००२ रोजी कर्जरोखा खरेदी विक्रीची पुर्तता झाले बाबत हिशेबामध्ये बँकेने नोंद घेतली. व त्या व्यवहाराचे फरकाची रक्कम ९६००७ रु. २५ पैसे H.D.F.C चेक क्रं. ८८४९८७ ने बँके कडे जमा झाली आहे.

आमचे बँकेने होम ट्रेड लि. कंपनी बरोबर वरील व्यवहार हे कॉन्ट्रक्ट नोट प्रमाणे केले परंतू होम ट्रेड लि. कंपनी कडून कोणतीही पुर्तता केली नाही. उलट कर्जरोखे सर्टिफिकेट न देता ते टाळाटाळ करु लागले म्हणून आमचे बँकेचे अध्यक्ष व सर व्यवस्थापक हे समक्ष होम ट्रेड लि. कंपनीचे कार्यालयात जावून भेटले तेव्हा होम ट्रेड लि. कंपनी कडून बँकेला आश्वासन दिले गेले की, तुमचे व्यवहाराची लवकरात लवकर पुर्तता केली जाईल परंतु बँकेचे असे लक्षात आले की, होम ट्रेड लि. कंपनी कडून बँकेस फसवणेचा प्रयत्न चालु आहे. दरम्यान होम ट्रेड लि. कंपनीचे संदर्भात वृत्तपत्रा तून उलट सुलट बातम्या प्रसिद्ध झाल्या. व बँकेचे लक्षात आले की वरील व्यवहार होम ट्रेड लि. कंपनीने संशयास्पद रितीने केला आहे. म्हणून बँकेचे संचालक मंडळाने दि. २२/४/२००२ रोजी संचालक मंडळाची तातडीची सभा बोलावून

म्हणून माझे सांगणे

समक्ष
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पो. ठाणे पुणे

पुरवणी :- वि. नाग पो. ठाणे गु. र. नं. ६५/2002
IPC 406, 420, 409, 34 नी सुनिल बादी
यांनी दि. १६/५/2002 रोजीचे जबाबात

होम ट्रेड लि. कंपनीस सर्टिफिकेट देणे बाबत ४८ तासा
ची मुदत द्यावी. ही नोटीस बँकेने बाय हॅन्ड
पोहोच केली. तरी ही होम ट्रेड लि. कडून दाद मिळा-
ली नाही. व बँकेची ५ कोटी ६५ लाख रु. ची
होम ट्रेड लि. कंपनी कडून फसवणूक झाल्याचे लक्षात
आले. म्हणून पुन्हा संचालक मंडळाने दि. २६/४/०२
रोजी तातडीची सभा बोलावून सभेत असा ठराव
पास झाला की, होम ट्रेड लि. कंपनीचे व त्यांचे
संचालक मंडळा विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा
त्या प्रमाणे बँकेचे सरव्यवस्थापक यांनी फौजदारी
दावा क्र. 93८/2002 भा. दं. वि. कलम ४०९, ४२०
४६८, ३४ नेे होम ट्रेड लि. कंपनी व त्यांचे संचा-
लक मंडळ (1) संजय अगरवाल (2) एन. एस. त्रिवेदी
(3) मनोज (माईक) शहा (4) धनंजय अगरवाल
(5) ऑकलन जेम्स मॅक मिलन (6) रसेल बोसकॅनग्रोज-
र. (7) शंशांक रानडे (8) सलील गांधी (9) विजय
कुमार मोदी. (10) केतन सेठ यांचे विरुद्ध दाखल
केला आहे. व होम ट्रेड लि. कंपनीने आपले
बँकेची फसवणूक केली आहे. फसवणूक झालेली
रक्कम ५ कोटी ६५ लाख रु. अशी असल्याचे नमूद
करून लेखी पत्र दि. २१/५/2002 रोजी रिझर्व
बँक ऑफ इंडिया व मा. सहकार आयुक्त यांचे
कार्यालय यांना दिले आहे. वरील पत्रा नुसार
आर. बी. आय. व सहकार खात्याचे अधिकारी
यांनी दि. ७/५/2002 व दि. ८/५/2002 रोजी
बँकेचे सर्व लेखी व्यवहाराची हिशोबाची तपासणी
केली आहे.

लेखा परिक्षक श्री. डी. एन. काळे यांनी आमची बँक व बँकेचे सरव्यवस्थापक, सर्व संचालक मंडळा विरुद्ध ज्या कलमान्वये आरोप केले आहेत ते चुकीचे आहेत वस्तुस्थिती ला धरुन नाहीत. कारण आमचे बँकेनीच ५, कोटी ६५ लाख रु. ची कर्जरोखे खरेदी-विक्री चे व्यवहार होम ट्रेड कं. कंपनीने करुन बँकेस फसवले आहे. बँकेने कोणत्याही ठेवीदार अथवा कोणत्याही सभासदाची फसवणूक करुन बँकेने अथवा संचालक मंडळाने कोणताही गैरव्यवहार केलेला नाही.

माझे जबाबी टिपण मी वाचून पाहिले. माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्राम बाग पो. ठाणे

म्हणून माझे सांगणे

(९२)

जा. क्र. १९/गुन्हे/पोसीबी-३/२८०५ /०२
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,पुणे
दिनांक:- १७ मे, २००२

आदेश

विषय :- विश्रामबाग पोलीस ठाणे ६५/२००२ भादंविक ४०६,४०९, ४२०,३४ या गुन्हयाचा पुढील तपास करणे बाबत..

पोलीस निरीक्षक,गुन्हे/आर्थिक विभाग,पुणे शहर

विश्रामबाग पोलीस ठाणे गुरनं ६५/२००२ भादंविक ४०६,४०९,४२०, ३४ या गुन्हयाचे मूळ कागदपत्र,मूळ केसडायरी असे कागदपत्र यासोबत ठेवलेले आहेत.

तरी सदरगुन्हयाचा पुढील तपास आपण स्वत: करुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सोबत मूळ कागदपत्र,केस डायरी व बँकेने सादर केलेले फेरिस्त १ ते १२ प्रमाणे कागदपत्र जोडले आहेत.

[ श. मि. मुश्रीफ ]
अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,
पुणे शहर.

17 MAY 2002

पोलीस निरीक्षक
आर्थिक गुन्हे विभाग, गुन्हे शाखा
पुणे शहर.

34

जा. क्र. ७५८६
पोलीस निरिक्षक कार्यालय (१३)
विश्रामबाग पो. स्टेशन, पुणे.
दिनांक १७/५/२००२

मा. अप्पर पो. आयुक्त सो. गुन्हे पुणे शहर
यांना सविनय सादर.

रिपोर्ट :- एस. एम. गायकवाड वरिष्ठ पो. नि. विश्रामबाग पो. स्टेशन पुणे यांजकडून विनंती पूर्वक की,

विषय :- गुन्ह्याचे मुळ कागदपत्र पुढील तपासकामी सादर केले बाबत.

संदर्भ :- हुजूर कार्यालय जा क्र. १९/गुन्हे/पी.सी.बी.-१/२३८५/०२ पो. आ. यांचे कार्यालय, पुणे दिनांक १७/५/२००२ व विश्रामबाग पो. स्टेशन गु. र. नं. ६५/२००२ भा.द.वि.कं. ४०६, ४०९, ४२०, ३४. नं

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर करतो की, विश्रामबाग पो. स्टेशन गु. र. नं. ६५/२००२ भा.द.वि.क. ४०६, ४०९, ४२०, ३४ या दाखल गुन्ह्याबाबत संदर्भांकित आदेशा प्रमाणे झाले तपासाचे मुळ कागदपत्र फेरीस्त क्रमांक १ ते १२ प्रमाणे व निशाणी नं. १२ ही फाईल सुवर्णयुग सहकारी बँक लि. पुणे यांनी सादर केली असून ती फेरीस्त १ ते १२ प्रमाणे फाईल मध्ये आहे. तसेच गुन्ह्याच्या केस डायऱ्या क्रमांक १ ते ३ या सोबत जोडून पुढील तपासकामी हुजूर कार्यालयास सादर करित आहे.

मा. सादर व्हावे.
ता. १७/५/२००२

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलिस स्टेशन पुणे.

17 MAY 2002
Crime Branch
Date of Receipt :-
Addl. C. P. CR. :-
Inward No. :- ९५५५
Branch :-

(98)

जा. क्र. १९/गुन्हे/पीसीबी-३/२४१८ /०२
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,पुणे
दिनांक:- १८ मे, २००२

## आदेश

विषय :- विश्रामबाग पोलीस ठाणे गुरनं ६५/२००२ भादंविक ४०६,४०९,४२०,३४ या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक,श्री. बोधे,दरोडा प्रतिबंधक पथक,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचेकडे सुपूर्द करणे बाबत..

पोलीस निरीक्षक,आर्थिक विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर

विश्रामबाग पोलीस ठाणे गुरनं ६५/२००२ भादंविक ४०६,४०९, ४२०,३४ या गुन्ह्याचे कागदपत्र इकडील जा. क्र. २४०५/२००२ दि. १७-५-२००२ अन्वये पुढील तपासकामी आपणाकडे दिले होते.

तरी आता सदर गुन्ह्याचे कागदपत्र पुढील तपासकामी पोलीस निरीक्षक,श्री. शशिकांत बोधे,दरोडा प्रतिबंधक पथक,गुन्हे शाखा,पुणे शहर यांचेकडे सुपूर्द करावेत.

[ श. मि. मुश्रीफ ]
अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,
पुणे शहर.

प्रत
१/- पोलीस निरीक्षक,श्री. शशिकांत बोधे,दरोडा प्रतिबंधक पथक,गुन्हे शाखा,पुण
२/- वर नमूद केलेला विश्रामबाग पो. ठाणे गुरनं ६५/२००२ भादंविक ४०६, ४०९,४२०,३४ हा गुन्हा पुढील तपासकामी पो. नि. आर्थिक विभाग, गुन्हे शाखा,पुणे यांचेकडून घेवून पुढील तपास करावा.

36

जावक क्रमांक- 692 /२००२ (95)
पोलीस निरीक्षक दरोडा प्रतिबंधक पथक
पुणे यांचे कार्यालय दिनांक-२६/५/२००२

प्रति,

मा प्रशासकीय अधिकारी सो,
सुवर्णयुग सहकारी बँक लि पुणे
बुधवार पेठ शाखा पुणे शहर

विषय :- विश्रामबाग पो स्टे गु र नं ६५/०२ भादंवि ४०६,४०९,४२०,३४
तपासकामी माहिती व कागदपत्रे मिळणे बाबत-

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सदर गुन्हयाचा तपास आम्ही स्वत: करीत असुन तपासकामी आपले बँकेकडुन खालील मुद्दयावर माहीती व संबंधित लागणारे कागदपत्रे सोबत पाठविलेले पो कॉ यांचे ताब्यात देण्यात यावी.

१] बँकेने होम ट्रेड कंपनीलाच का मुकरर केले ?

२] बँकेने अप्रुव्ह ब्रोकरची यादी मेन्टेन केली आहे का ? त्यात होम ट्रेड अप्रुव्ह आहे का ? बँकेकडे ब्रोकरची अप्रुव्ह यादी नसल्यास ती का ठेवली नाही ?

३] बँकेने रोखे घेताना होम ट्रेडला पैसे कसे दिले ? कोणत्या बँके मार्फत दिले ? कधी दिले ता व रक्कम ? या रकमेपोटि होम ट्रेडने सरकारी रोखे घेतले बाबत बँकेकडे काही कळविले आहे काय ?

४] रोखे घेतल्यावर त्यावरील व्याज बँकेला दिले आहे का ? दिले असल्यास कोणत्या स्वरुपात ?

५] बँकेचे स्वत:चे एसजीएल खाते उघडण्यात आले आहे का ? त्याचा नंबर काय ? उघडले पासुन आजपर्यंतचे बँक स्टेटमेंट ची छायांकित प्रत देणे ? खाते उघडले नसल्यास का उघडले नाही याबाबत खुलासा ?

६] वरील गुन्हयातील रोखे प्रकरणाचा व्यवहार एसजीएल मार्फत केला गेला का ?

७] बँकेचे ता ३१/३/००, ता. ३१/३/०१ व ता ३१/३/०२ च्या वर्ष अखेरीचे बॅलन्स शीट छायांकित प्रत ?

८] आरबीआय नियमाप्रमाणे बँकेकडील पैसे कोठे कोठे गुंतवणुक करावेत ? व कसे केले आहे ? त्याबाबत आरबीआयला कळविले आहे का ? कळविले असल्यास त्या पत्राची प्रत ? सदर प्रकरणाआधी बँकेने होम ट्रेड कडुन सरकारी रोखे घेतले होते का ? या संदर्भात होम ट्रेड व्यतिरीक्त इतर ब्रोकर मार्फत व्यवहार झाला होता का ?

९] बँक इंटरनल ऑडीटरने प्रत्येक ६ महिन्यात ३० सप्टेंबर व ३१ मार्च मध्ये घेतलेले तपास णीत रोखे प्रत्यक्ष आहेत अगर कसे ? त्याचे प्रमाणपत्राची प्रत ? आरबीआयला पाठवली आहे का ? असल्यास त्याची प्रत ?

१०] बँकेने आपला पैसा सरकारि रोखे खरेदी करुन गुंतवावा बाबत वेळोवेळी केलेले ठराव त्यात होम ट्रेडशी व्यवहार करावा बाबत घेतलेले ठराव ? त्या ठरावाचे वेळी ठराव कोणी मांडला ? अध्यक्ष कोण होते ? ठरावास अनुमोदन कोणी दिले ? कोणत्या — संचालकांनी सहया केल्या ? त्या ठरावा बद्दलचा अजेंडा ? ठरावाची पक्की व कच्ची नोंद याच्या प्रती देणे?

११] सरकारी रोखे खरेदी करताना बँकेनी वेगवेगळया ब्रोकरची कोटेशन घेतली होती काय ? केलेल्या व्यवहाराबद्दल ब्रोकर्स बरोबर कॉन्ट्रक्ट नोट्स ठेवल्या होत्या काय ? असलेस त्याच्या प्रती ?

१२) सर्व आरोपींचे पत्ते व फोन नं.

कळावे ता २६/५/२००२

(शशिकांत बोधे)
पोलीस निरीक्षक

दि. 24/5/02

27/5/02

37

समजपत्र, (सी.आर.पी.सी.१६० प्रमाणे)

जा.क्र. ७२५/२००२ (१६)
गुन्हे शाखा कार्यालय पुणे शहर
दिनांक. ५/६/२००२.

प्रती,
श्री. दादासाहेब भिकोबा काळे,
विशेष लेखा परिक्षक, सहकारी संस्था वर्ग २
सह निबंधक सहकारी संस्थेचे कार्यालय.
पुणे म.न.पा. इमारत दुसरा मजला.
कसबे चौक पुणे,

१/- आपण दि. १५/५/२००२ रोजी विश्रामबाग पो.स्टे. येथे सुवर्णयुग सहकारी बँक लि. संचालक मंडळ इत्यादी विरुद्ध दिलेले तक्रारी अन्वये विश्रामबाग पो.स्टे. गु.र.नं. ६५/२००२ भा.द.वि.क. ४०६, ४०९, ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

संबंधीत गुन्ह्याचा तपास आम्ही करीत आहोत या गुन्ह्याचे संदर्भात काही मुद्यांवर आपणाकडे समक्ष चर्चा करून माहिती घेणे आहे, तरी त्याकरीता आपण दि. ६/६/२००२ रोजी १५.०० वा. गुन्हे शाखा कार्यालय (पोलीस आयुक्त कार्यालय कंपाऊंड) पुणे १ येथे समक्ष हजर रहावे, हि विनंती.

काळे दि. ५/६/२००२

( प्रदीप आफळे )
सहा. पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

o/c

Recd
15/6

38

जा.क्र. सपोनि/पो.नि/आर्थिक गुन्हे/४५३/०२
आर्थिक गुन्हे विभाग गुन्हे शाखा पुणे शहर
पुणे दिनांक- ६/६/२००२

(९०)

प्रति.

मा. प्रशासक.
सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत.
पुणे.

विषय:- गुन्ह्याचे पुरावे कामी दस्तऐवज हजर करणे बाबत.
संदर्भ:- विश्रामबाग पो.स्टे. गु.र.नं. ६५/०२ भा.दं.वि.क. ४०६, ४०९, ४२०, ३४.

-०-

महोदय,

"सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत पुणे या बँकेचे संचालक, बँक अधिकारी तसेच होम ट्रेड लिमी." या कंपनीचे डायरेक्टर यांचे विरुद्ध वरील नमूद संदर्भान्वये गुन्हा दाखल करणेत आला असून सदर दाखल गुन्ह्याचा तपास आम्ही स्वतः करीत आहोत.

वरील नमूद दाखल गुन्ह्याचे पुरावे कामी खालील मुद्यावरील माहीती माहीतगार बँक अधिकाऱ्यासह पोलीस आयुक्त कार्यालय, साधू वासवानी रोड पुणे १. येथील आर्थिक गुन्हे विभागाचे कार्यालयात घेऊन येणेस विनंती आहे.

① सुवर्णयुग सहकारी बँकेने होम ट्रेड लिमी. या कंपनीशी सरकारी कर्जरोखे खरेदी विक्री संदर्भात जे जे व्यवहार केले त्यासंदर्भात बँकेने केलेल्या ठरावांचे मुळ ठराव पुस्तिका.

② सुवर्णयुग सहकारी बँकेकडील सरकारी कर्ज रोख्यांचे खरेदी विक्री संदर्भातील मुळ ~~ठराव पुस्तिका~~. रजिस्टर

③ सुवर्णयुग सहकारी बँकेने होम ट्रेड लिमीटेड या कंपनीशी रोखे खरेदी विक्री संदर्भात केलेला सर्व मुळ पत्र व्यवहार.

④ सरकारी रोख्यांचे खरेदी विक्री संदर्भात RBI कडील वेळोवेळी प्रसिद्ध केलेली परिपत्रके.

⑤ सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्री संदर्भात बँकेने तयार केलेली नियमावली.

⑥ बँकेने होम ट्रेड लिमी. या कंपनीस सरकारी रोख्यांची विक्री केल्यानंतर होम ट्रेड लिमी. या कंपनीने ज्या ज्या चेकद्वारे बँकेस कराराची रक्कम परत दिली त्या संबंधीचे मुळ दस्तऐवज.

⑦ बँकेने होम ट्रेड लिमी. या कंपनी कडून सरकारी रोखे खरेदी करणेला रिझर्व बँकेची परवानगी घेतली होती का? असल्यास त्या संबंधीचे मूळ.

Mwatpute 6/6/02

सुवर्णयुग सहकारी बँक ... पुणे-२

आर्थिक गुन्हे विभाग, गुन्हे शाखा ...

रेकॉर्ड.

(c) बँकेच्या सर्व संचालकांचे नावे-पत्ते व फोन नंबर्स यांची यादी.

(d) बँकेच्या मुख्यालयातील सर्व अधिकाऱ्यांचे नावे पत्ते यांची यादी. (गुन्ह्याचे कालावधीतील).

( प्रदीप आफळे )
सहा. पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

जावक क्रमांक- ६४४ /२००२ (९८)
पोलीस निरीक्षक गुन्हे ,पुणे यांचे
कार्यालय दिनांक- ८/६/२००२

प्रति,

मा प्रशासक,
सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत
बुधवार पेठ पुणे

विषय :- गुन्हयाचे पुरावेकामी दस्तऐवज हजर करणे बाबत

संदर्भ :- इकडील कार्यालयीन जा क्रं ४५३/०२ ता ६/६/२००२ अन्वये

महोदय,

सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित बुधवार पेठ पुणे या बँकेचे संचालक मंडळ, बँक अधिकारी तसेच होम ट्रेड लिमिटेड मुंबई या कंपनीचे डायरेक्टर यांचे विरुद्ध विश्राम बाग पो स्टे गु र नं ६५/०२ भादंविक ४०६,४०९,४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असुन सदर गुन्हयाचा तपास आम्ही स्वत: करीत आहोत.

सदर गुन्हयाचे तपासकामी आपणाकडील कागदपत्रांची आवश्यकता असलेने वरील संदर्भान्वये माहीती मागविण्यात आली होती परंतु ती अदयाप आम्हांला प्राप्त झालेली नाही.

तरी वरील संदर्भान्वये व विषयान्वये मागविलेलदस्तऐवज लवकरात लवकर पाठविण्याची व्यवस्था करावी हि विनंती

कळावे

ता ८/६/२००२

[ सी पी शिऊरकर ]
पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग,पुणे शहर

40

मी० दादाभाऊ निवृत्ती काळे उ. व. ३३ धंदा नोकरी रा० फ्लॅट नं ४, कल्पवृक्ष अपार्टमेंट, बॉम्बे सॅपर्स कॉलनी, वडगाव शेरी पुणे १४

Special Auditor

समक्ष हजर राहून पुन्हा जबाब लिहून देतो की, मी विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ (नागरी बँका) या पदावर सहकार खात्यात नोकरीस असून माझे सहकारी बँकेचे लेखा परिक्षण करणे असे काम आहे. मी ता० ३।५।०२ चे विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग यांचे आदेशाने सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेचे सरकारी कर्ज रोख्यांचे - गुंतवणुक रकमेबाबत तपासणी ता० ६।५।०२ ते ८।५।०२ या दरम्यान तपासणी केली व त्याचा विशेष अहवाल ता० १०।५।०२ रोजी मा० आयुक्त सो, सहकार व निबंधक सहकारी संस्था म० राज्य पुणे यांना सादर केलावर त्यांनी ता० १४।५।०२ रोजी सुवर्णयुग सहकारी बँकेचे गैर व्यवहार बाबत गुंतलेल्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद करण्याचा अधिकार दिल्याने मी सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे चे नमुद १ ते १८ संचालक, सरव्यवस्थापक व मे. होम ट्रेड लि. कंपनी वाशी, मुंबई कडील १ ते ३ संचालक व इतर यांनी संगनमत करुन बँकेचे सभासद/ठेवीदार यांचे ५ कोटि ६५ लाख रुपयाचा गैरव्यवहार करुन फसवणुक केली याबाबत मी ता. १५।५।०२ रोजी दिलेला फिर्यादी जबाब दाखविला तो मी वाचुन पाहिला तो बरोबर असुन त्याखाली सही माझी आहे त्याबाबत माझे पुन्हा सांगणे की,

याठिकाणी बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरव्यवस्थापक व संचालक मंडळातील सदस्य यांनी मे. होम ट्रेड लि. कं. चे संचालकाशी रोखे खरेदी विक्री व्यवहार करताना सदर मे. होम ट्रेड कंपनी

शेअर्स मान्यताप्राप्त असणेबाबत मुंबई व पुणे स्टॉक एक्सचेंज कडून खात्री करून घेणे आवश्यक होते तसेच बँकेने HTL शी व्यवहार करताना तो SGL फॉर्म मध्ये करणे आवश्यक असतानाही तसे न करता तो प्रिंटिंग फॉर्ममध्ये केला आहे त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार एका ब्रोकरशी व्यवहार करताना तो ५% पेक्षा जास्त प्रमाणात करू नये असे असताना त्यांनी HTL शी ५% पेक्षा जास्त व्यवहार केल्याचे दिसून आले आहे व रिझर्व्ह बँकेच्या निर्देश प्रमाणेच अधिकृत ब्रोकरचे शेअर्स खरेदी विक्री करताना खरेदी व विक्री करणारे दोन्ही पक्षांना एकाच असणे गरजेचे आहे परंतु देखील बँकेने त्याबाबत खात्री केलेली नाही या त्यांच्या निष्काळजीपणा मुळे बँकेला रक्कम रुपये ५ कोटि ६५ लाखाचे कर्ज शेअर्स न देता बँक पदाधिकाऱ्यांच्या मदतीने बँकेचे खातेदार/ ठेवीदार यांची पर्यायाने फसवणूक केलेली आहे.

वरील आलेला जबाब मी वाचून पाहिला तो मी सांगितले हकिगती प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

हा जबाब लिहून दिला स.ता.न.म.

15/3/

जावक क्रमांक- ६५२ /२००२ (20)
पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा पुणे यांचे
कार्यालय दिनांक- १०/६/२००२

महत्वाचे/तातडीचे
==============

प्रति,

मा प्रशासक सो,
सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित,
बुधवार पेठ पुणे

विषय :- गुन्हयाचे पुरावे कामी दस्त ऐवज हजर करणे बाबत
===== ===================================

संदर्भ :- विश्रामबाग पो स्टे गु र नं६५/०२ भादंविक ४०६,४०९,४२०,३४
==== ==============================================

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेचे संचालक,बँक अधिकारी तसेच होम ट्रेड या कंपनीचे डायरेक्टर यांचे विरुध्द वरील संदर्भान्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्हयाचा तपास आम्ही स्वत: करीत आहोत.

वरील नमुद दाखल गुन्हयाचे पुरावेकामी खालील मुदयावरील माहीती -पोलीस आयुक्त कार्यालय,साधु वासवानी रोड पुणे १ येथील दरोडा प्रतिबंधक -पथक विभागाचे कार्यालयात पाठवुन देण्यास विनंती आहे.

१] मुंबई स्टॉक एक्सचेंज एस ई बी आय रजिस्टर नंबर ,मे होम ट्रेड लि. ला सरकारी रोखे खरेदी करण्याची परवानगी किंवा विक्री करण्याची परवानगी कोणी दिली

२] रोखे खरेदी विक्री व्यवहारातील जमा झाले रकमांचा खाते उतारा

३] ८.०७ टक्के,जी ओ आय २०१७ रोखा गुंतवणुक रजिस्टर झेरॉक्स

४] संचालक मंडळाने रोख्यांचा व्यवहार करताना ते ज्यांना विकायचे होते ती पार्टी कोण याबाबत ब्रोकरने कल्पना दिली होती काय

५] त्यापुर्वी रोखे विक्रीचा जो व्यवहार झाला होता ते रोखे विकताना तशी कल्पना होती मग यावेळेसच असे का केले .

कळावे

ता १०/६/२००२

[ सी पी शिउरकर ]
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,पुणे शहर

पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा पुणे शहर

सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे २ मुख्य कचेरी
१०/६/२००२

42

जबाब ता० ११।७।२००२ (२९) १ Same Statement like other

मी० उल्हास नथोबा काळोखे उ. व. ५४ धंदा व्यापार रा० इंदिरा हौसिंग सोसायटी सेनापती बापट रोड पुणे १६ (अध्यक्ष-सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित)

समक्ष हजर राहुन जबाब लिहुन देतो की मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासह राहणेस असुन माझे समजेल्या वर्षांपासुन कामकाज मी पाहतो कायद्या-पेक्षान मी समाजसेवेचे काम करीत असुन मी यापुर्वी पुणे शहराचा नगरसेवक होतो व सन १९८५ ते १९९० पावेतो आमदार ही होतो.

आता आपण आम्ही दि० ११।७।०२ रोजी मा० उप मुख्यमंत्री सो म. राज्य यांचे नावे केलेला अर्ज दाखविला तो आम्हीच सह्या केलेल्या लोकांनी केलेला असुन त्याबाबत आमचे सांगणे की,

सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेची स्थापना दि० २१।०१।१९७३ रोजी झाली तेव्हा पासुन बँकेवर वेगवेगळे लोक संचालक मंडळावर नेमले गेले होते. सन १९९३ ते सन १९९८ पर्यंत मी स्वतः सदर बँकेच्या संचालक मंडळावर प्रथम निवडुन आलो व त्यानंतर सन १९९८ ते सन २००३ या कालावधी साठी झालेल्या निवडणुकीत मी पुन्हा संचालक मंडळावर निवडुन येवुन सन १९९९ मध्ये सदर बँकेचा अध्यक्ष म्हणुन आजपावेतो कार्यरत होतो.

आमच्या वर नमुद केलेल्या बँकेचा आर्थिक कारभार हा अत्यंत सुरळीतरित्या चालु असुन आज पावेतो कोणत्याहि रीतीने त्यात अफरातफर असर 2 —

कोणत्याही रीतीने अडथळे निर्माण होतील असे प्रकार आहेत नव्हते त्यात सन १९९६ पासून बँकेच्या पैशाच्या गुंतवणुकी वाढण्याचे सरकारी नियमानुसार बँकेतील अतिरिक्त निधी हा सरकारी कर्ज रोखे घेवून त्यात गुंतविला पाहिजे असे असल्याने आमच्या सुवर्णयुग बँकेकडे असलेल्या अतिरिक्त पैसा सरकारी कर्ज रोख्यात गुंतविण्याच्या विचारात असताना आमचे कडे वेगवेगळे - सेबी मान्यताप्राप्त तसेच मुंबई व पुणे स्टॉक एक्स्चेंज यांची मान्यता असलेले ब्रोकर्स आहे. असे एकूण २१ ब्रोकर्स यांची यादी आमचे बँकेकडे उपलब्ध आहे. त्यात गिल्टेज मॅनेजमेंटचे मे. केतन शेठ यांचाही समावेश आहे. तेव्हापासून आमच्या बँकेने केलेल्या कर्जरोख्यांच्या - खरेदी विक्री बाबतचे व्यवहार अत्यंत प्रामाणिकपणे होत असत व तसे व्यवहार चालूही होते. त्यातून आमचे बँकेचा चरमसा फायदाही झाला आहे व आजतागायत सदर झालेल्या फायद्याच्या रकमेचा बँकेच्या संचालक मंडळावर अगर संबंधित अधिकाऱ्यांवर पैशाचा अपहार केल्याचा कोणताही आरोप कोणीही केलेला नाही.

दिनांक - ३१।१।२००२ रोजी आमचे बँकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बॉण्ड १३.५०% - २०१० दर्शनी किंमत ५ कोटीचे १ लाखा प्रमाणे ५०० सर्टिफिकेट क्रं. ०२९७७००१ ते ०२९७७५०० प्रमाणे प्रत्यक्षात खरेदी केलेले होते. त्याची विक्री दि० २०।२।०२ रोजी करण्यात आली सदर वेळी मे. केतन शेठ यांचीच होम ट्रेड ही कंपनी (या नावाने सुरु झालेली कंपनी) असल्याचे व ते कायदेशीर ब्रोकर असल्याने त्यांचे मार्फतच ते रोखे विकण्यात यावेत कारण यापूर्वीही त्यांचे मार्फतच

—३—

हा जबाब लिहून दिला स.ना.म.

(signature)

११/६/२००२

समक्ष

(signature)

पोलीस निरीक्षक

गुन्हे शाखा, पुणे शहर

पुरवणी - श्री. उल्हास नथोबा काळोखे यांचे नाशिक -
१७।५।०२ रोजीचे जबाबा प्रमाणे असे (२१) २.

आमचे बँकेने बरेचसे रोखे खरेदी विक्रीचे व्यवहार केलेले
असल्याने नवा उमेद बँकेच्या इतर संचालक मंडळाशी
चर्चा करून एकमताने पास झाल्याने यात नमूद केलेल्या
सर्टिफिकेटसची विक्री करण्यात आली. परंतु हा व्यवहार
झाल्यानंतर होम ट्रेड कं. केतन शेठ व त्यांचे सहकारी
त्यांनी आम्हांस यापूर्वी दिलेल्या उत्तम सेवा व विश्वास
आहेत या गोष्टींचा गैरफायदा व क्लिष्ट व्यवहारातील
नांगिव प्रावधानांचा मार्ग शोधु लागल्याने आमचे ध्यानात
येण्यास सुरु झाले कारण त्यांना विकलेल्या रोख्यांचे -
बदल्यात दुसरे रोखे घेणे बँकेस फायदेशीर आहे असे
सांगुन त्यांनी ८.०७% - २०१७ दर्शनी किंमत ५ कोटि २५
लाख खरेदी किंमत ५ कोटि ६८ लाख ४९ हजार दर रुपये
१०३.०४ हे घेण्यास त्यांनी बँकेला उद्युक्त केले त्यात
बँकेचा आर्थिक फायदा असल्याने त्यास आम्ही मान्यता
दिली व सदरचा रोखा त्यांनी कॉन्ट्रक्ट नोट क्र. १६०२९
नुसार विकला त्यापोटी फिडाडेवी नफ्याची रक्कम
१,४४,५६६.३५ रुपये सिन्डीकेट्री या बँकेचा चेक क्र.
३२१६७७ ने बँकेस अदा करून ती रक्कम बँकेस प्राप्त
झाली त्याबाबतचे योग्य रिपोर्ट बँकेत आहेत अशा
रीतीने बँकेचा आधिक विश्वास संपादन करून केतन शेठ
व त्यांचे सहकारी यांनी त्याचे सर्टिफिकेट्स बँकेने त्यांचे
कडे मागता ते न देता उलट बँकेस पुन्हा ७.५०% -
२०१० या सरकारी कर्ज रोख्यांच्या खरेदीचा प्रस्ताव
(यापूर्वीच्या रोख्यांच्या बदल्यात) बँकेला दिला त्यावेळी
तो फायदेशीर असल्याचेही सांगितले. सदरचा प्रस्ताव

देखील बँकेच्या कायद्याच्या दृष्टीने संचालक मंडळाचे पुढे मांडून तोही एकमताने मान्य करण्यात आला. त्याप्रमाणे व्यवहार ~~करून~~ होवुन त्याची कॉन्ट्रॅक्ट नोट क्रं. १६८७३ व १६८७७ दर्शनी किंमत रुपये ५ कोटी ६५ लाख खरेदी किंमत ५ कोटी ७८ लाख ९८ हजार ३७५ रुपये, दर रुपये ९९.६० व्याजाची पुर्वीचा ८.०७% - २०१७ हा रोखा पुन्हा बँकेने विकत घेण्याचा प्रस्ताव दिला त्याची कॉन्ट्रॅक्ट नोट क्रं. १६७७१, दर्शनी किंमत ५ कोटी २५ लाख, खरेदी किंमत ५ कोटी ७९ लाख, १४ हजार रुपये याबाबतही — बँकेने संचालक मंडळाने जेणे करून बँकेचा फायदाच होईल या हेतूने एकमताने ठराव पास केला त्यावेळी देखील केतन शेठ यांच्या होम ट्रेड कंपनीने खरेदी विक्री व्यवहारातील फरक १६०८१.२५ रुपये रकमेचा मल्टीसिटी चेक क्रं. ९८४१४७ हा देना तोही पास झाला. परंतु रोखा बाबत चौकशी करता ते लवकर आणून देतो असे सुरुवातीस सांगितले व त्यानंतर टाळाटाळ सुरु केल्याने आमचे प्रधान आडेने. आमचे सुवर्णयुग सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने व संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी ठरविल्या प्रमाणे केतन शेठ त्यांचे सहकारी (१) संजय अगरवाल (२) नंदकिशोर त्रिवेदी वगैरे यांचे बरोबर बरेच पाठपुरावा करता त्यांनी आम्हांस रोखे सर्टिफिकेटस् देण्यास पुर्णपणे टाळाटाळ केल्याने आपण सदर व्यवहारात पुर्णपणे फसलो गेलो आहोत अशी आमची खात्री झाल्याने २२ एप्रिल २००२ रोजी होम ट्रेड कंपनीचे संचालकांना त्याप्रमाणे वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली आहे परंतु त्यासही दाद न दिल्याने मानी मा० न्याय० मॅजि० सो. प्रथम वर्ग सौ. जाधव मॅडम जे. सी. सिवि. कोर्ट शिवाजीनगर पुणे यांचे कोर्टात होम

हा जबाब लिहून दिला खरा आहे.
दत्तात्रय
20/5/2002

समक्ष
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा पुणे शहर

पुरवणी - श्री. उल्हास नथोबा काकोरखे यांचे तारीख १५।६।०२ रोजीचे जबाबा पुढील पान (२१) ३

---

ट्रेडचे केतन शेठ व त्यांचे ८ सहकारी कंपनीसह अशी फौजदारी तक्रार नं. १३८।०२ दि. २९।४।०२ रोजी दाखल केलेली आहे त्याप्रमाणे त्याची कार्यवाही चालू आहे. त्याचप्रमाणे दिनांक २।५।०२ रोजी आमच्या बँकेच्या रोखे खरेदी विक्री व्यवहारात होम ट्रेड कंपनीने केलेल्या घोटाळ्याबाबत हकिकत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, वरळी मुंबई व सहकार आयुक्त म. राज्य पुणे यांना लेखी पत्राद्वारे कळविलेले आहे.

त्यानंतर दि. ७।५।०२ रोजी रिझर्व्ह बँकेतर्फे या घोटाळ्याबाबतची चौकशी सुरु झाली तथापि दिनांक ८।५।०२ रोजी सहकार खात्यामार्फत बँकेच्या व्यवहारा बाबत लेखा परिक्षण करण्यात येऊन त्यांचे कडील विशेष लेखा परिक्षक श्री. दादाभाऊ लिंगोबा काळे यांनी ता. ३०।७।०२ रोजी रक्कम रुपये ५ कोटि ६५ लाख हे गुंतविलेले रोखे बँकेच्या ताब्यात फिरुन आलेले नाहीत अशा रीतीने बँकेचे संचालक मंडळाचे सदस्य, सरसंचालक, यांनी मिळून होम ट्रेड लि. वाशी, मुंबई चे संजय अगरवाल, केतन शेठ त्रिवेदी वगैरे यांचेशी संगनमत करुन बँकेचे सभासद/ ठेवीदार यांची फसवणूक केल्याचा ठपका ठेवून पोलीसांकडे फिर्याद दाखल केलेली आहे. वास्तविक त्यांची फिर्याद दाखल होण्या पूर्वीच आमचे बँकेच्या पैशाची (रोखे स्वरुपात असलेल्या) फसवणूक झाल्या चे आमचे संचालक मंडळ व बँक अधिकारी यांचे -

Conspiracy with NS SA

लक्षात आल्याने आम्ही तात्काळ होम ट्रेड चे नमुद केलेले संचालक यांचे विरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई केलेली असुन आमच्या कोणत्याही संचालकांच्या अगर अधिकाऱ्यांचा त्यात कोणताही वाईट हेतु नसतानाही फक्त बँकेचे जबाबदार मंडळातील लोक व अधिकारी लोक आमची नावे आरोपी म्हणुन नमुद केली आहेत. आजतागायत बँकेच्या संचालक मंडळाने अगर अधिकाऱ्यांनी केलेला बँकेशी निगडीत आर्थिक व्यवहार हा अत्यंत चोख पध्दतीने व पारदर्शक पध्दतीने केलेला असुन आमच्या बँकेचे जनतेमध्ये त्याबद्दल नाव उंचावलेले आहे. या सर्व कारणास्तव व [illegible] आमचा कोणताही संबंध नसल्याने सदर फिर्यादीवरुन नोंद झालेल्या गुन्ह्यामधुन आमची नावे कमी करण्यासाठीच सदरचा अर्ज आम्ही केलेला आहे. आमच्या कोणत्याही संचालकांचा व अधिकाऱ्यांचा होम ट्रेड कंपनीच्या संचालका बरोबर वैयक्तिक हितसंबंध नसुन वैयक्तिक आर्थिक व्यवहारही नाही.

हा जबाब मी वाचुन पाहिला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे

समक्ष

हा जबाब दिला स.ता.म.

(सही)

(सही)
११/६/2002

पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

जबाब ता० ११।५।२००२ (229)

मी० उल्हास महादेव भट उ.व. ४८ धंदा व्यापार
रा० फ्लॅट नं. ३-२७/८१२ बुधवारपेठ, पुणे

Same statement like Ulhas Kolatkar

समक्ष हजर असताना जबाब लिहून देतो की मी वरील ठिकाणी सुमारे ७ वर्षांपासून माझे कुटुंबिया बरोबर रहावयास असून माझा पूर्वा ट्रेडिंग कंपनी नावाचा मेशनरी सप्लाय करण्याचा व्यवसाय आहे त्याच बरोबर मी समाजकार्य करतो. मी सन १९८३ पासून सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेचा संचालक असून सध्या बँकेचा उपाध्यक्ष आहे.

Director

आता आपण आम्हाला ता० ९।५।२००२ रोजी मा० उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे नावाने केलेला अर्ज दाखविला तो आम्ही वाचून पाहिला तो आम्हीच केलेला असून त्या स्वाक्षरी आमच्या सह्या समक्षच आहेत त्या बाबत माझे सांगणे की.

सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेची स्थापना ता० २१०१।१९८३ रोजी झाली असून सध्या मी बँकेचा संचालक असून उपाध्यक्ष म्हणून काम पहात आहे.

मी संचालक असलेल्या सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेचा आर्थिक व्यवहार सुरळीत पणे चालू असून आजपर्यंत कोणत्याही प्रकारे अफरातफर व अडचणी निर्माण होतील असे प्रकार झालेले नाहीत.

सन १९९६ पासून बँकेच्या पैशाच्या आर्थिक व्याप वाढल्याने सरकारी नियमानुसार बँकेतील अतिरिक्त निधी हा सरकारी कर्ज रोखे घेऊन त्यामध्ये गुंतवला पाहिजे असे असल्याने बँकेकडे असलेला अतिरिक्त पैसा गुंतविण्याच्या विचारात असताना रोखे मान्यताप्राप्त दलाल पुणे व मुंबई

स्टॉक एक्स्चेंज यांची मान्यता असलेले ब्रोकर्स आहेत. अशा २१ ब्रोकर्सची यादी बँकेकडे उपलब्ध आहे. त्यात निकटेज मॅनेजमेंटचे मे. केतन शेठ यांचाही समावेश आहे. तेव्हापासून बँकेने केलेल्या कर्जरोख्यांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार व्यावसायिक व प्रामाणिकपणे होत होते व चालूही आहेत त्यामध्ये बँकेला फायदाही झालेला आहे. आजपर्यंत झालेल्या फायद्याच्या-रकमेत बँकेच्या संचालक मंडळावर, संबंधित अधिकाऱ्यांवर-पैशाचा अपहार केल्याचा कोणताही आक्षेप कोणीही घेतलेला नाही.

ता. ३१/१/२००२ रोजी बँकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बॉण्ड १३.५०% - २०१०, दर्शनी किंमत ५ कोटीचे १ लाखाप्रमाणे ५०० सर्टिफिकेट क्र. ०२९६६००१ ते क्रमांक ०२९६६५०० प्रमाणे प्रत्यक्षात खरेदी केलेले होते त्याची विक्री ता. २०/२/०२ रोजी करण्यात आली त्यावेळी मेसर्स केतन शेठ यांचीच होम ट्रेड लि. कंपनी (या नावाने सुरु असलेली कंपनी) असल्याने व ते कायदेशीर ब्रोकर असल्याने त्यांचे मार्फतच सर्व विक्री करण्यात आली कारण यापुर्वीही त्यांचे मार्फत बँकेने बरेचसे सर्व खरेदी विक्रीचे व्यवहार केलेले असल्याने तसा ठराव बँकेच्या इतर संचालक मंडळाशी चर्चा करुन एकमताने मंजूर झाल्याने यात नमुद केलेल्या सर्टिफिकेटची विक्री करण्यात आली परंतु हा व्यवहार झाल्यानंतर होम ट्रेडचे श्री केतन शेठ व त्यांचे सहकारी यांनी आमच्या या पुर्वी दिलेल्या उत्तम सेवा व विश्वासार्हता या गोष्टीचा गैर फायदा व किचकट व्यवहारातील तांत्रिक पळवाटांचा मार्ग शोधु लागल्याचे आमचे ध्यानात येण्यास सुरु झाले कारण त्यांना विकलेल्या रोख्यांच्या बदल्यात दुसरे रोखे घेणे बँकेस फायदेशीर आहे असे सांगुन त्यांनी ८.०७% - २०१८, दर्शनी किंमत ५ कोटि, २५ लाख खरेदी किंमत ५ कोटि, ६८ लाख, ४९ हजार,



हा मजकूर [illegible]

सही
पर्यवेक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

दर रुपये १०३.०४ हे घेण्यास त्यांनी बँकेला उद्युक्त केले
त्यात बँकेचा आर्थिक फायदा असल्याने आम्हीही मान्यता
दिली व सदरचा रोखा त्यांनी कॉन्ट्रॅक्ट नोट क्रं. १६०२९
नुसार विकला त्यापोटी मिळालेली नफ्याची रक्कम रुपये
१ लाख ४४ हजार ५६६.३५, जनरल लेजरच्या बँकेच्या चेक क्रमांक
३२१६७८ ने बँकेस अदा करुन ती रक्कम बँकेस मिळाली
त्याबाबतचे योग्य अहवाल बँकेत आहेत. अशा रीतीने
बँकेचा आर्थिक विश्वास संपादन करुन केतन शेठ व त्यांचे
सहकारी यांनी त्यांचे सर्टिफिकेट बँकेने त्यांचेकडे मागता ते न
देता उलट बँकेस पुन्हा ७.५०% - २०१० या सरकारी कर्ज-
रोख्याच्या खरेदीचा प्रस्ताव (यापूर्वीच्या रोख्याच्या बदल्यात)
बँकेला दिला व तो फायदेशीर असल्याचेही सांगितले.
तो प्रस्ताव बँकेच्या फायद्याच्या दृष्टीने संचालक मंडळापुढे
मांडून एकमताने मान्य करण्यात आला त्याप्रमाणे व्यवहार
होऊन त्याची कॉन्ट्रॅक्ट नोट क्रं० १६८७३ व १६८७५, दर्शनी
किंमत रुपये ५ कोटि ६५ लाख, खरेदी किंमत ५ कोटि ७८
लाख ९८ हजार ३७५ रुपये दर रुपये ९९.६०, त्याच वेळी
पूर्वीचा ८.०७% - २०१७ हा रोखा पुन्हा विकत घेण्याचा
प्रस्ताव दिला त्याची कॉन्ट्रॅक्ट नोट क्रं. १६७७१, दर्शनी किंमत
५ कोटि २५ लाख, खरेदी किंमत ५ कोटि ७९ लाख, १४
हजार बाबतही संचालक मंडळाने विचार करुन बँकेला फायदाच
होईल या हेतुने एकमताने ठराव पास केला त्यावेळी-
देखील केतन शेठ यांच्या होम ट्रेड कंपनीने खरेदी विक्री
व्यवहारातील फरक १६०८१.२५ रुपये रकमेच्या जनरल लेजरच्या चेक
क्रं १८४१४७ हा दिला तोही पास झाला परंतु रोख्याबाबत

चौकशी करता ते प्रवर्तक आणि केले असे सुरवातीस संगनमताने
व त्यानंतर व्यवहार सुरु केल्याने आमचे खात्यात आल्याने
आमचे बँकेचे संचालक मंडळाने व संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी
त्यांच्या प्रमाणे केतन शेठ व त्याचे सहकारी (१) संजय -
अगरवाल (२) ... वगैरे यांचे बरोबर व्यवहार
करण्याचा करता त्यांनी आमच्याशी रोखे खरेदी विक्री करण्यास
पूर्णपणे व्यवहार केल्याने सदर व्यवहारात पूर्णपणे फसवणूक -
झालेली आहे अशी खात्री झाल्याने २२ एप्रिल २००२ रोजी
होम ट्रेड कंपनीचे संचालकांना त्याप्रमाणे वकीलामार्फत नोटीस
पाठविलेली आहे. परंतु त्यासही दाद न दिल्याने आम्ही मा.
मे. श्री. जि. न्यायालय श्री. जाधव मॅडम यांचे, शिवाजीनगर
न्यायालय पुणे यांचे न्यायालयात होम ट्रेडचे केतन शेठ व
त्यांचे ८ सहकारी, कंपनीसह फौजदारी तक्रार नं. १३८/२००२
ता. २४/४/०२ रोजी दाखल केली आहे. त्याप्रमाणे त्याची -
कार्यवाही चालू आहे. त्याप्रमाणे ता. २५/५/०२ रोजी बँकेच्या
रोखे खरेदी विक्री व्यवहारात होम ट्रेड कंपनीने केलेल्या
घोटाळ्याबाबतची हकिगत रिझर्व बँक ऑफ इंडिया, वरळी
मुंबई व सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना लेखी
पत्राद्वारे कळविलेली आहे.

त्यानंतर ता० ७/५/०२ रोजी रिझर्व बँके तर्फे
या घटने बाबतची चौकशी सुरु झाली. तथापि ता. ८/५/०२
रोजी सहकार खात्यामार्फत बँकेच्या व्यवहारांबाबत लेखा
परिक्षण करण्यात येऊन त्यांचे कडील विशेष लेखा परिक्षक श्री.
दादाभाऊ शिंदे यांनी ता० ३०/३/०२ रोजी रक्कम
रुपये ५ कोटी ६५ लाख हे गुंतविलेले रोखे बँकेचे ताब्यात
मिळून आलेले नाहीत अशा रीतीने बँकेची संचालक मंडळाचे
सदस्य, सरव्यवस्थापक यांनी मिळून होम ट्रेड कंपनी वाशी, मुंबई

Follow up with NS after final deal

समक्ष
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

पुरवणी - श्री. उल्हास महादेव भट यांचे ता. ११।५।२००२ रोजीच्या जबाबा पुढे चालू आहे. (२२) 3

---

चे संजय आगरवाल, केतन शेठ, त्रिवेदी वगैरे यांचे बरोबर संगनमत करुन बँकेचे सभासद/ठेवीदार यांची फसवणुक केल्याचा ठपका ठेवुन पोलीसांकडे तक्रार दाखल केलेली आहे. वास्तविक त्याची तक्रार दाखल होण्यापुर्वीच - आमचे बँकेच्या पैशाची (रोखे खरेदी व्यवहारात असलेल्या) फसवणुक झाल्याचे आमचे संचालक मंडळ व बँक अधिकारी यांचे ध्यानात आल्याने आम्ही तात्काळ होम ट्रेड्स नमुद केलेले संचालक यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई केलेली असुन आमच्या कोणत्याही संचालकाचा अगर बँके मधील अधिकाऱ्याचा त्यात कोणताही वाईट हेतु नसतानाही फक्त बँकेचे जबाबदार संस्थाचालक व अधिकारी लोक आम्ही आहोत म्हणुन नमुद केलेली आहेत. आज पर्यंत बँकेच्या संचालक मंडळाने अगर अधिकाऱ्यांनी केलेला बँकेशी निगडीत आर्थिक व्यवहार हा अत्यंत चोख व पारदर्शक पध्दतीने केलेला असुन आमचे बँकेचे जनतेमध्ये त्याबद्दल नाव उंचावलेले आहे. या सर्व कारणा स्तव व रोखेखरेदीत आमचा कोणताही संबंध नसल्याने सदर पोलीसांकडे नोंद झालेल्या गुन्ह्या मधुन आमची नावे कमी करण्यासाठी सदरचा अर्ज आम्ही केला आहे. आमच्या कोणत्याही संचालकांचा व अधिकाऱ्यांचा होमट्रेड कंपनी संचालका बरोबर वैयक्तिक हितसंबंध नसुन वैयक्तिक आर्थिक व्यवहारही नाहीत.

हा जबाब मी वाचुन पाहिला तो बरोबर आहे

हा जबाब लिहून दिला

उल्हास भट

समक्ष

पोलीस निरीक्षक
...शाखा, पुणे शहर

Conspiracy with KS, ST
NLS

48

जबाब ता. ११।६।२००२ (२३)१

मी अशोक प्रतापराव गोडसे उ.व. ४६ धंदा-व्यापार व समाजकार्य रा. २३३, बुधवार पेठ पुणे

Same Statement like Ujjwal Kalekar

समक्ष हजर असताना जबाब लिहून देतो की. वरील ठिकाणी मी माझे कुटुंबीयासह रहावयास असून मी माझे पान दुकान व हॉटेल व्यवसाय पाहून समाजकार्य करतो. मी सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत पुणे या बँकेचा सन १९९३ पासून संचालक आहे.

Director

आता आपण आम्हाला ता. ७।६।२००२ रोजी मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे नावाने केलेला अर्ज दाखविला तो आम्ही वाचून पाहीला तो आम्हीच केलेला असून त्याखालील असणाऱ्या सह्या आमच्याच आहेत. त्याबाबत माझे सांगणे की,

सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत पुणे या बँकेची स्थापना ता. २१०७१९७३ रोजी झाली असून सध्या मी बँकेचा संचालक आहे.

मी संचालक असलेल्या सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत पुणे या बँकेचा आर्थिक व्यवहार सुरळीतपणे चालु असून आजपर्यंत कोणत्याही प्रकारे अफरातफर व अडचणी निर्माण होतील असे प्रकार झालेले नाहीत. सन १९९६ पासून बँकेचे पैशाचा आर्थिक व्यवहार वाढल्याने सरकारी नियमानुसार बँकेतील अतिरीक्त निधी हा सरकारी कर्जरोखे घेऊन त्यामध्ये गुंतविला पाहीजे असे असल्याने बँकेकडे असलेला अतिरीक्त पैसा गुंतविण्याच्या विचारात असताना सेबी मान्यताप्राप्त तसेच पुणे व मुंबई स्टॉक एक्सचेंज यांची मान्यता असलेले ब्रोकर्स आले-अशा २१ ब्रोकर्सची यादी बँकेकडे उपलब्ध आहे. त्यात गिल्टेज मॅनेजमेंटचे मे. केतन सेठ यांचाही समावेश आहे तेव्हापासून बँकेने केलेल्या कर्जरोख्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार व्यवस्थित व प्रामाणिकपणे होत होते व चालूही आहेत त्यामध्ये बँकेला फायदाही झालेला आहे. आजपर्यंत झालेल्या फायद्याच्या रकमेच्या बँकेच्या संचालक मंडळावर, संबंधित अधिकाऱ्यांवर पैशांचा अपहार केल्याचा कोणताही आरोप कोणीही केलेला नाही.

ता. ३१।१।२००२ रोजी बँकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बॉन्ड १३.५०।.-२०१० दर्शनी किंमत ५ कोटीचे १ लाखाप्रमाणे ५०० सर्टीफीकेट क्रमांक ०२९७७०१ ते क्र. ०२९७७५००

प्रमाणे प्रत्यक्षात खरेदी केलेले होते. त्याची विक्री ता २०।१०२ रोजी करण्यात आली. त्यावेळी मे. केतन सेठ यांचीच होम ट्रेड ही कंपनी (या नावाने सुरु झालेली कंपनी) असल्याने व ते कायदेशीर ब्रोकर असल्याने त्यांचे मार्फतच शेअर विकण्यात यावेत कारण यापूर्वीही त्यांचे मार्फतच बँकेने बरेचसे शेअर खरेदी-विक्रीचे व्यवहार केलेले असल्याने तसा ठराव बँकेच्या इतर संचालक मंडळाशी चर्चा करुन एकमताने मंजूर झालेने वाल नमूद केलेल्या सर्टीफीकेटची विक्री करण्यात आली परंतु हा व्यवहार झाल्यानंतर होम ट्रेड चे श्री केतन सेठ व त्यांचे सहकारी यांनी आम्हाला यापूर्वी दिलेल्या उत्तम सेवा व विश्वासाहर्ता या गोष्टींचा गैरफायदा व फिजीकल व्यवहारातील तांत्रिक पळवाटांचा मार्ग शोधू लागल्याचे आमचे लक्षात येण्यास सुरु झाले कारण त्यांना विकलेल्या शेअर्सच्या बदल्यात दुसरे शेअर्स घेणे बँकेस कायदेशीर आहे असे सांगून त्यांनी ८.०७%-२०१७, दर्शनी कींमत ५ कोटी, २५ लाख खरेदी कींमत ५ कोटी, ६८ लाख, ४९ हजार दर रुपये १०३.०४ हे घेण्यास त्यांनी बँकेला उद्युंगत केले त्यात बँकेचा आर्थिक फायदा असल्याने आम्हीही मान्यता दिली व सदरचा शेअर त्यांनी कॉन्ट्रॅक्ट नोट क्र. १६०२९ नुसार विकला त्यापोटी मिळालेली नफ्याची रक्कम रुपये १ लाख ४४ हजार ५६६.३५ एच डी एफ सी. बँकेचा चेक क्रमांक ३२७६७७ ने बँकेस अदा करुन ती रक्कम बँकेस मिळाली त्याबाबतचे योग्य अहवाल बँकेस आहेत अशारितीने बँकेचा आर्थिक विश्वास संपादन करुन केतन सेठ व त्यांचे सहकारी यांनी त्यांचे सर्टीफीकेट बँकेने त्यांच्याकडे मागता ते न देता उलट बँकेस पुन्हा ७.५०%-२०१० या सरकारी कर्जरोख्यांच्या खरेदीचा प्रस्ताव (यापूर्वीच्या शेअर्सच्या बदल्यात) बँकेला दिला व तो कायदेशीर असल्याचेही सांगितले तो प्रस्ताव बँकेच्या फायद्याच्या दृष्टीने संचालक मंडळापुढे मांडून एकमताने मान्य करण्यात आला. त्याप्रमाणे व्यवहार होऊन त्याची कॉन्ट्रॅक्ट नोट क्र. १६८७३ व १६८७७, दर्शनी कींमत रुपये ५ कोटी ६५ लाख, खरेदी कींमत ५ कोटी ७८ लाख ९८ हजार ३७५ रुपये दर रुपये ९९.६०, त्यावेळी पूर्वीचा ८.०७%-२०१७ हा शेअर पुन्हा विकत घेण्याचा प्रस्ताव दिला. त्याची कॉन्ट्रॅक्ट नोट क्रमांक १६७७१, दर्शनी कींमत ५ कोटी २५ लाख, खरेदी कींमत ५ कोटी

हा जबाब लिहून दिला भ.ली.म.

समक्ष
पोलिस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

पुरवणी – श्री अशोक प्रतापराव गोडसे यांचे ता. ११।६।०७ रोजीचे
· जबाबाबाबतचे असे (23) २

७९ लाख १४ हजार बाबतही संचालक मंडळाने जोनेफरुन बँकेला
फायदाच होईल या हेतूने एकमताने ठराव पास केला. त्यावेळी-
देखील केतन सेठ यांच्या होम ट्रेड कंपनीने खरेदी-विक्री —
व्यवहारातील फरक १६०८७.२५ रुपये रकमेचा एच.डी.एफ.सी.
चेक क्रमांक : ७८९९४७ हा दिला तो ही पास झाला. परंतु शेअर्स
बाबत चौकशी करता ते लवकर आणून देतो असे सुरवातीला
सांगितले व त्यानंतर टाळाटाळ सुरु केल्याचे आमचे लक्षात आल्याने
आमचे बँकेचे संचालक मंडळाने व संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी
ठरविल्याप्रमाणे केतन सेठ व त्याचे सहकारी ② संजय अग्रवाल,
③ एन. एस. त्रिवेदी वगैरे यांचेबरोबर बराच पाठपुरावा करता.
त्यांनी आम्हास शेअर्स सर्टीफीकेट देण्यास पूर्णपणे टाळाटाळ केल्याने
सदर व्यवहारात पूर्णपणे फसलो गेलेलो आहोत अशी खात्री
झाल्याने २१ एप्रिल २००२ रोजी होम ट्रेड कंपनीचे संचालकांना
त्याप्रमाणे वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली आहे परंतु त्यासही
दाद न दिल्याने आम्ही मा. प्र. श्री. लीके न्यायालय सौ. जाधव
मॅडम सो. शिवाजीनगर न्यायालय पुणे यांचे न्यायालयात होम
ट्रेडचे केतन सेठ व त्यांचे सहकारी, कंपनीसह फौजदारी तक्रार
नं. १३८।२००२ ता. २६।४।०२ रोजी दाखल केली आहे. त्याप्रमाणे
त्याची कार्यवाही चालू आहे त्याचप्रमाणे ता. २।५।०२ रोजी बँकेच्या
शेअर्स खरेदी विक्री व्यवहारात होम ट्रेड कंपनीने केलेल्या
फसवणुकीबाबतची हकीकत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया वरळी.
मुंबई व सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना लेखी
पत्राद्वारे कळविलेली आहे.

त्यानंतर ता. ७।५।०२ रोजी रिझर्व्ह बँकेतर्फे
या घटनेबाबतची चौकशी सुरु झाली. तथापि ता. ८।५।०२ रोजी
सहकार खात्यामार्फत बँकेच्या व्यवहारांबाबत लेखा परिक्षण
हा पंचनामा वरील पंचांचे उपस्थितीत १३.३५ वा. सुरु करुन १५.३० वा. पुरा केला आहे.

पंच
(१) [signature]
(२) [signature]

समक्ष
[signature]
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

जबाब ता २४/७/२००२ (६३) १

मी केतन कांतीलाल शेठ उ.व. ४० धंदा - ब्रोकर
रा. ललित कुटी को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, गुलमोहर क्रॉस रोड नं. ९
फ्लॅट नं. १९३ जुहु मुंबई-४९

समक्ष पोलीस अटकेत असताना स्वखुशीने जबाब लिहून देतो की मी वरील ठिकाणी माझी पत्नी सौ. जागृती व मुलगी कु. पुजा असे सन १९९० पासून रहाणेस आहे. माझा स्वतःचा गिल्टेज मॅनेजमेंट सर्व्हीसेस लिमिटेड, केतन सेठ ॲन्ड कंपनी, गिल्टेज इन्व्हेस्टमेंट बँकींग लिमिटेड, के.एस.सी. सिक्युरीटीज लिमिटेड, गिल्टेज पोर्टफोलीओ मॅनेजमेंट सर्व्हीसेस, गिल्ट प्लास्टोकेम लिमिटेड, गिल्टेज इन्फोटेक लिमीटेड या नावाच्या कर्जरोखे, बॉण्डस खरेदी विक्री ब्रोकर च्या कंपन्या असून यापैकी पहील्या तीन नमूद कंपन्यांचे काम मी स्वतः पहात असुन बाकी इतर कंपन्यात स्टाफ नियुक्त केलेला असून माझी त्यावर देखरेख असते. तसेच त्या कंपन्यांसाठी माझ्याकडे RBI, सेबी व पुणे स्टॉक एक्सचेंज यांचेकडील परवाना व कंपनी रजीस्ट्रार यांचेकडील रजि. नं. देखील आहे ते आता मला आठवत नाही. माझे शिक्षण बी.कॉम, एम.बी.ए पर्यंत झालेले आहे. माझी पत्नी घरकाम करते तसेच माझे आईवडील दोन भाऊ अनुक्रमे निलेश कांतीलाल सेठ, अमित कांतीलाल सेठ असे असून ते माझेपासून विभक्त रहाणेस व त्यांच्या वरीलप्रमाणेच दोन-तीन ब्रोकर्स म्हणुन कंपन्या आहेत. माझे सर्व कंपन्यांचे मुख्य कार्यालय विलेपार्ले मुंबई येथील १०३, लिबर्टी अपार्टमेंट्स, सरोजिनी नायडू रोड विलेपार्ले पश्चीम मुंबई ५६. याठिकाणी आहे.

माझे कार्यालयामार्फत पूर्ण भारतातील बँका, कंपन्या, फायनान्शियल इन्स्टीट्युशन्स, म्युच्युअल फंड कंपनी, प्रॉव्हीडंट फंड कंपनीज वगैरे संस्थांशी कर्जरोखे, बॉण्डस खरेदी विक्री संदर्भात अधिकृत ब्रोकर यानात्याने संपर्कात येऊन व्यवहार केले जातात माझ्याप्रमाणेच इतर अनेक ब्रोकर्स कंपन्यादेखील ही कामे करतात. पुणे येथेदेखील मी ~~श्री. सद्‌गुरु जंगली महाराज सहकारी बँक, पिंपरी~~, सुवर्णयुग सहकारी बँक, भगिनी निवेदीता सहकारी बँक, सिटीझन्स को-ऑप. बँक, जनसेवा सहकारी बँक, जनता सहकारी बँक, जिजामाता महीला सहकारी बँक, पुणे-कॅन्टोन्मेंट को-ऑप. बँक, पुणे अर्बन को-ऑप बँक, पुणे पिपल्स को-ऑप बँक, पुणे मर्चंट्स को-ऑप बँक, सामपाडा सहकारी बँक लि. सेवाविकास को-ऑप बँक, शिवाजीराव भोसले सहकारी बँक, मुस्लीम को-ऑप.बँक, साधना सहकारी बँक, हडपसर, विद्या सहकारी बँक लि. अशा विविध बँकांशी त्यांचा अधिकृत ब्रोकर म्हणुन रोखे, बॉण्डस खरेदी विक्री व्यवहार सन १९९६ पासून ते आजतागायत माझे वरील नमुद कंपनीमार्फत करीत आहे. त्यांचेशी केलेले सर्व व्यवहार मी

काही फिजिकल व काही SGL स्वरूपात केलेले असून ते सर्व विश्वासार्ह व सुरक्षीतपणे केलेले आहेत. अशा केलेल्या व्यवहारात त्या त्या बँकांना आर्थिक लाभ झाल्यामुळेच त्या त्या बँका मला कर्जरोखे, बॉण्डस खरेदी विक्री व्यवहारात प्राधान्य देत आहेत. त्याबाबतचे सर्व सविस्तर रेकॉर्ड माझेकडे दप्तरी आहे त्यांचेशी आजतागायत केलेल्या कोणत्याही व्यवहारात मी त्या बँकांची फसवणूक केलेली नाही.

कर्जरोखे, बॉण्ड खरेदी-विक्री प्रकरणात ब्रोकर म्हणुन अस्तित्वात असलेल्या कंपन्यांपैकी सुरवातीची लॉईड्स ब्रोकरेज लिमिटेड या कंपनीचे रूपांतर युरो एशियन सिक्युरीटीज लिमिटेड यांच्यात झाले नंतर त्या कंपनीचे रूपांतर सन १९९९ मध्ये मे. होम ट्रेड लिमिटेड कंपनी या नावाच्या कंपनीमध्ये रूपांतर झाले. त्यावेळी त्या कंपनीचे मालक श्री. संजय अगरवाल हा स्वतः असुन त्याचे मे होम ट्रेड लि. कंपनीचे संचालक म्हणुन (१) पुन प्रस त्रिवेदी (२) माईक शहा (३) ॲलन बॅकनस्रोव्हर व इतर सहा-सात जण यांची नावे मला आठवत नाहीत असे मिळून मे होम ट्रेड लि.चे काम सुरु झाले दरम्यान संजय अगरवाल व पुन प्रस त्रिवेदी यांनी मला त्यांचे होम ट्रेड कंपनीचा मी नॉन-एक्झीक्युटिव्ह डायरेक्टर होण्यासाठी विनंती केल्याने व ते मी मान्य केल्याने दिनांक १९ जानेवारी २००० रोजी मला त्यांनी संचालक मंडळावर नियुक्त केले. माझी नियुक्ती झाल्यानंतर केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या आधी अगर नंतर संजय अगरवाल याने अगर एक्झीक्युटीव्ह डायरेक्टर असलेला पुन प्रस त्रिवेदी यांनी कधीही बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची प्रकाशितपणे मिटींग घेतली नाही. त्यामुळे बऱ्याचदा मे. होम ट्रेड कंपनीचा काय कामकाज चालले आहे याची पुरेशीही कल्पना कोणाला च येत नव्हती त्यामुळे मी अगर माझ्यासारखे बाकी संचालक लोकांनी संजय अगरवाल याच्याकडे अशा मिटींग्स घेणे जरूरीचे असल्याने त्या घेण्यात याव्यात याबाबत आग्रहही धरला परंतु तरीदेखील त्यांनी त्याकडे दुर्लक्षच केले. दरम्यान मी स्वतः व संजय अगरवाल दोघेही स्वतंत्ररित्या ब्रोकर असल्याने माझे कंपनीत व त्याचे होम ट्रेड कंपनीत कर्जरोखे अथवा बॉण्ड खरेदी विक्रीचा व्यवहार होत होता व अद्यापही चालू आहे. माझेशी केलेल्या व्यवहारात मला माझे कंपनीचे व्यवहाराचे सुमारे १७ कोटी रुपये अद्यापही येणे बाकी आहे त्याकडेही तो दुर्लक्ष करू लागल्याने व जो खर्च तो करीत असे तो अनावश्यक असल्याचे मला दिसुन आल्याने त्या बाबत संजय अगरवाल याला मी तसे न करण्याबाबत तोंडी समजही दिली परंतु त्याकडेही त्याने दुर्लक्ष केल्याने मी स्वतःहून मे. होम ट्रेड लि. कंपनीच्या दिनांक २५ मे २००१ रोजी संचालक

वाचून दिले म.टी.क.

समक्ष
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, [illegible] शहर

(७) पुरवणी :- केतन कांतीलाल शेठ यांचे दि.२५/७/०२ रोजीच्या जबाबा-
लगतची असे. (63) 2

पदाचा राजीनामा दिला व त्याबाबत सदर मे. होम ट्रेड कंपनीनेच कंपनी रजिस्ट्रार, सेबी, मुंबई स्टॉक एक्सचेंज यांना लेखी पत्राद्वारे माझ्या राजीनाम्याबाबत कळविलेले आहे. माझेकडे असलेल्या विविध पक्षकारांना मी माझ्या मे. होम ट्रेड कंपनीच्या राजीनाम्याबद्दल कळविणे आवश्यक होते परंतु काही तांत्रिक अडचणी असल्याने मी सर्वांना कळवू शकलो नाही

मे. होम ट्रेड लि. कंपनी यांनीदेखील सन १९९९ मध्ये सुवर्णयुग सहकारी बँकेशी अधिकृत ब्रोकर म्हणुन शेअर्स, बॉन्ड्स खरेदी विक्री व्यवहार सुरु केले ते माझ्याच सांगण्यावरुन बँकेने मे. होम ट्रेडशी व्यवहार सुरु केले असे जरी सुवर्णयुग बँकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे असले तरी मी माझे स्वतःच्या कंपनीचे बँकेशी असलेले संबंध सोडून मे. होम ट्रेडशी व्यवहार करण्यास सांगूच शकणार नाही याकरीता मी बँकेच्या अधिकाऱ्यांना तसे सांगितलेले नाही. मला जे व्यवहार बँकेशी करताना त्यात माझे किंवा बँकेचेदेखील नुकसान होणार होते. ते टाळण्यासाठी तो व्यवहार मी न करता तुम्ही दुसऱ्याशी व्यवहार करा. असे मी बँकेच्या अधिकाऱ्यांना सांगत असे तसे सुवर्णयुग सहकारी बँकेचे परस्पर व्यवहारदेखील सुरु झालेले होते व माझेदेखील स्वतंत्र व्यवहार बँकेशी होते.

जानेवारी २००२ पासुन मे. होम ट्रेड लि. कंपनी व सुवर्णयुग सहकारी बँक यांचेत बॉन्ड्स व कर्जरोखे खरेदी विक्री बाबतचा व्यवहार सुरु झाला त्याची माहिती मला मी जरी मे. होम ट्रेड कंपनीचा संचालक नसलो तरी एक ब्रोकर या नात्याने तशी माहिती मला किंवा अन्य ब्रोकरलादेखील होत असते. त्याप्रमाणे मला माहिती होती. ती माहिती अशी की, सुवर्णयुग सहकारी बँक यांचेकडील त्यांचे स्वतःच्या ताब्यात असलेले (१) ११.५०% IDBI २०१० (२) १०.६५% ICICI २००६ (३) १०.६५% ICICI २००६ असे बॉन्ड्स बँकेने दिनांक ३१/१/२००२ रोजी मे. होम ट्रेड कंपनीस विकून त्याबदली मे. होम ट्रेड कंपनीकडून १३.५०% महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दर्शनी किंमत ५ कोटीचे हे दिनांक ११/२/२००२ रोजी खरेदी केले. वरील दोन्ही खरेदी-विक्री झालेल्या व्यवहारात फरकाची रक्कम मे. होम ट्रेडने सुवर्णयुग सहकारी बँकेस दिलेली आहे. नंतर दिनांक २०/२/०२ रोजी बँकेने १३.५०% महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे बॉन्ड्स पुन्हा मे. होम ट्रेड लि. कंपनीला विकले व त्याबदली मे. होम ट्रेड कंपनीने

बँकेस आपण बँकेला ८.०७% GOI २०१७ असे देतो. असे सांगुन फक्त त्याबदली बँकेस त्याची कॉन्ट्रॅक्ट नोट देऊन झालेल्या खरेदी विक्री व्यवहाराच्या फरकाची रक्कम बँकेस चेकने दिली नंतर ८.०७% हे रोखे मे. होम ट्रेड कडे उपलब्ध नसल्याने त्यांनी वेगवेगळी कारणे सांगुन दिनांक ३०/३/२००२ रोजी सदर रोख्यांऐवजी ७.५०% GOI हे रोखे बँकेस देतो असे सांगितले व बँकेला ते ही मान्य झाल्याने त्या बाबतची कॉन्ट्रॅक्ट नोट बँकेने मे. होम ट्रेड लि. कंपनीकडून घेतली. त्या खरेदी विक्रीतल्या फरकाची रक्कम देखील HTL ने बँकेस अदा केली आहे परंतू सुवर्णयुग सहकारी बँकेस देऊ केलेल्या ७.५०% GOI च्या कर्जरोख्यांच्या सर्टीफीकेट्स आजपावेतो मे. होम ट्रेड लि. कंपनीने दिलेले नाहीत त्यांच्यातील सदरचा व्यवहार रु. ५ कोटी ६५ लाख रुपये रकमेचा झालेला आहे त्यामुळे त्यादरम्यान बँकेचे सरकारी ऑडीटचे वेळी ऑडीटरला सुवर्णयुग बँकेत रक्कम रुपये ५ कोटी ६५ लाखांचे कर्जरोखे सर्टीफीकेट्स किंवा तेवढी रोख रक्कमही मिळून न आल्याने त्यांनी पोलीसांकडे मे. होम ट्रेड लि. चे सर्व संचालक व बँकेचे संचालक मंडळ सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष व सरव्यवस्थापक यांचेविरुद्ध बँकेच्या ५ कोटी ६५ लाख रुपये रकमेची आपसात संगनमताने फसवणुक केली म्हणुन दिनांक २५/५/०२ रोजी फिर्याद दाखल केलेली आहे. सदर फिर्यादीमध्ये मे. होम ट्रेड लि. कंपनीच्या संचालक म्हणुन माझेदेखील नाव आहे. परंतू मे. होम ट्रेड कंपनीने हे व्यवहार दिनांक ३०/१/२००२ रोजीपासून बँकेशी केलेले असल्याने त्यापुर्वीच मी दिनांक २५/५/०१ रोजीच वर नमुद केलेल्या कारणास्तव HTL च्या संचालक पदाचा राजीनामा दिलेला असल्याने त्यांचा बँकेशी झालेल्या व्यवहारात माझा कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या संबंध नाही किंवा मी सुवर्णयुग सहकारी बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास अगर पदाधिकाऱ्यास मे. होम ट्रेड लि. कंपनी ही आमचीच असून त्यांचेशीदेखील तुम्ही ओळख या नात्याने व्यवहार करावेत याबाबत लेखी अगर तोंडी सांगितलेले नाही. उलटपक्षी बँकेने मे. होम ट्रेड लि. शी केलेले वरील व्यवहारात बँकेला न मिळालेल्या ७.५०% या कर्जरोख्यांचे सर्टीफीकेट्स बँकेला त्वरीत देऊन तो व्यवहार मिटवावा म्हणुन HTL चे कार्यकारी संचालक पुन. पुस. त्रिवेदी हे ज्यावेळी मला सुवर्णयुग सहकारी बँकेत भेटले होते त्यावेळी त्रिवेदी यांस बँकेच सरव्यवस्थापक सुरेश काळे यांचे समक्षच सांगितले होते. नंतर तसा माझा काही संबंध नसल्याने मी त्यांचे व्यवहारात लक्ष घातलेले नाही.

२० लिहून दिले मु.ना.म.

समक्ष
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

② पुरवणी ;- फेतन कांतीलाल सेठ यांचे दि. २५/७/०२ रोजीच्या जबाबा-लगतची असे. (६३) ३

दरम्यान दिनांक १९ किंवा २० फेब्रुवारी २००२. नक्की तारीख मला आठवत नाही मी माझे मुंबई विलेपार्ले येथील कार्यालयात असताना मे. होम ट्रेडच्या कार्यालयातून मीस कानन (मॅनेजर) हिने मला फोन करून सांगितले की तुमच्याकडे जर ८.०७% GOI हे असतील तर आम्हाला एक-एक कोटीचे पाच असे फिजिकल मध्ये करून ठेवा आम्हास ते पाहीजे आहेत असे कळविल्याने व माझा त्या ब्रोकर कंपनीशी वेळोवेळी व्यवहार होत असल्याने दिनांक २१/२/२००२ रोजी माझे कार्यालयातील कु. जुगना लोधाया ही मी माझ्या कार्यालयात बॅक ऑफीस इन्चार्ज म्हणुन काम पहाते तीला बोलावून तीला वरील हकीकत सांगुन फेडरल बँक मुंबई या बँकेत माझ्या कंपनीचे CSGL अकाऊंट असल्याने त्यांचेमार्फत पुढील कारवाई करणेस सांगीतलेवरुन तीने त्याबाबत फेडरल बँकेला पत्र तयार करुन माझे कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी कु. वीना संघवी हिचेमार्फत सहीने फेडरल बँकेस पाठविले परंतु दिनांक २३/४/२००२ पावेतो मे. होम ट्रेड लि. कडून मला त्यांनी दिलेल्या ऑर्डरप्रमाणे माझ्या खात्यावर पैसे जमा न झाल्याने मी जुगना लोधाया हिला फेडरल बँकेस सदरचा व्यवहार रद्द करण्यासाठी त्याप्रमाणे पत्र देणेस सांगितल्यावरुन कु. जुगना हिने त्याप्रमाणे त्याचदिवशी फेडरल बँकेस कळविलेले आहे. त्या पत्राच्या झेरॉक्स कॉपीज मी माझे कंपनीचे सुवर्णयुग सहकारी बँकेशी असलेल्या व्यवहाराच्या कागदपत्रांच्या (झेरॉक्स प्रती) फाईलमध्ये आपणास हजर केलेल्या आहेत या कालावधीत मला HTL च्या मीस कानन हिने आमच्या कामाचे काय झालेबाबत फोनवरुन विचारणा करता मी तीला तुमचे काम होणार असुन असे सांगुन मला फेडरल बँकेकडून मिळालेली RBI ची रिसिप्ट व फेडरल बँकेचे शेरो सर्टीफीकेट्स रुपये एक-एक कोटीचे पाच च्या झेरॉक्स प्रती HTL च्या माहीतीसाठी त्यांचेकडे आमचे कंपनीच्या शिपायातर्फे पाठवुन दिल्या. त्यावेळी HTL यांनी ८.०७% GOI कोणासाठी मागविले होते याची कल्पना त्यांनीही मला दिली नाही अथवा माझेही लक्षात आले नाही परंतु HTL ने ते स्वतःच सुवर्णयुग सहकारी बँकेशी वैयक्तिक व्यवहार करतात असे सुवर्णयुग सहकारी बँकेस समजण्यासाठी व ते शेरो ते सुवर्णयुग सहकारी बँकेसाठीच घेणार होते असे मला मे. होम ट्रेड चे सुवर्णयुग सहकारी बँकेशी व्यवहार चालू असल्याने समजुन आले व त्याप्रमाणे माझ्याकडून घेतलेल्या फेडरल बँकेच्या शेरो सर्टीफीकेट्स

व दिलेल्या RBI ची दिलेली रिसिप्ट अशा झेरॉक्स प्रती मे. होम ट्रेड लि. ने सुवर्णयुग सहकारी बँकेस दिलेल्या आहेत. मे. होम ट्रेड लि. कंपनीकडून झालेल्या व्यवहाराचे पैसे न मिळाल्याने मी ८.०७% GOI कि.रु. ५ कोटी ही सिक्युरीटी इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग ॲन्ड फायनान्शीयल सर्व्हीसेस स्टँडर्ड चार्टर्ड ग्रिन्लेज बँक लि. यांना विकले व त्यांचेकडून मिळालेली रक्कम ही परस्पर माझे फेडरल बँकेच्या खात्यात जमा झालेली आहे. यापूर्वीदेखीलवसन २००१ ते सन २००२ मध्ये माझ्या गिल्टेज मॅनेजमेंट व गिल्टेज इन्व्हेस्टमेंट बरोबर होम ट्रेड शी व्यवहार झालेले आहेत त्याबाबतचे रेकॉर्ड माझेकडे उपलब्ध आहे.

मी सुरवातीस सन १९९३ मध्ये गिल्टेज मॅनेजमेंट कंपनी सुरु केली त्यानंतर सन १९९५ मध्ये गिल्टेज कॅपिटल लिमीटेड ही दुसरी कंपनी सुरु केली व सन ९८-९९ मध्ये इतर ७ कंपन्या सुरु केल्या. त्या सर्व कंपन्यांमार्फत मी कर्जरोखे बॉन्ड यांचा ब्रोकर म्हणुन संपूर्ण देशात सुमारे ८०० ते ९०० विविध पक्षकार संस्थाशी खरेदी विक्रीचे व्यवहार केलेले असून आतापावेतो कोणत्याही संस्थेची माझ्या स्वतःच्या नमूद कंपन्यांकडून फसवणूक झालेली नाही परंतू नागपूर संदर्भात फक्त नागपूर डिस्ट्रिक्ट को-ऑप बँकेने अनेक कर्जरोखे खरेदी विक्री व्यवहार मे. होम ट्रेड लि. या ब्रोकर कंपनीकडूनच केलेले असल्याने तसे एकाच ब्रोकरकडून ते करता येत नसल्याने व कायदेशिरही नसल्याने त्या बँकेचे अध्यक्ष श्री. सुनिल केदार यांचे सांगनेप्रमाणे माझे गिल्टेज मॅनेजमेंट सर्व्हीसेस, सिंडीकेट सिक्युरीटीज लिमिटेड, सेन्चुरी डिलर्स प्रायव्हेट लिमिटेड, इंद्रमणी फायनान्शियल सर्व्हीसेस या चारही ब्रोकर कंपन्यांनी त्या व्यवहाराचे विभाजन करुन व्यवहार झाल्याचे कागदोपत्री दाखवावे व ३१ मार्च २००२ ~~नंतर~~ पूर्वी पुन्हा केलेल्या नोंदी सुरवातीप्रमाणेच होण्यात येतील असे आश्वासन दिल्याने वरील आम्ही चारही ब्रोकर कंपन्या सदर व्यवहारास कबुल झालो. ह्या आमच्या चुकीमुळेच आमची तेथे दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये आरोपी म्हणुन नोंद झालेली आहे. त्याचप्रमाणे अमरावती येथील अमरावती पिपल्स को-ऑप बँकेशी मी स्वतः गिल्टेज मॅनेजमेंटच्या नावाने त्यांना ८.०७% GOI देणेबाबत करार केला होता परंतु ते त्यावेळी माझ्याकडे नसल्याने त्याची मागणी मी मे. होम ट्रेड कंपनीचे मिस कानन व सुबोध भंडारी यांच्याकडे केली त्यावरुन त्यांनी मला होकार दिल्याने माझे ब्रोकरेजची रक्कम काढुन त्यात रोख्यांची किंमत मी HTL ला देऊन टाकली. त्यानंतर HTL च्या संचालकांनी अमरावती पिपल्स को-ऑप- बँकेशी परस्पर संपर्क साधुन बँकेच्या अधिकाऱ्यांना त्यांनी केतन सेठकडून मागविलेल्या ८.०७% GOI या कर्जरोख्याची रक्कम HTL कडे पोहोच झालेली असून ते कर्जरोखे

हे लिहून दिले भ.ना.म.
(KETAN SHETH)

समक्ष
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा पुणे शहर

③ पुरवणी :- केतन शांतीलाल शेठ यांचे दि. २५/७/०२ रोजीच्या जबाबा लगतची असे. (63) ङ

बँकेस HTL मार्फत देण्यात येतील असे कळवून देखील ते कर्जरोखे कि. रु. ८ कोटीचे अमरावती पिपल्स को-ऑप बँकेस न दिल्याने मे. २००२ च्या शेवटी अमरावती येथे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यात मी स्वत: ब्रोकर म्हणुन अमरावती पिपल्स-को-ऑप बँकेशी सुरवातीचा ब्रोकर म्हणुन काम केल्याने माझे नाव आरोपी म्हणुन नोंद विण्यात आले. त्याचप्रमाणे मुंबई येथील रघुवंशी को-ऑप बँक व सीमेन्स प्रॉव्हीडंट फंड यांचेशी होम ट्रेडने केलेल्या व्यवहाराच्या वेळी मे. होम ट्रेड लि. ने त्यांचेशी केलेल्या फसवणुकीच्या प्रकारात मे. होम ट्रेडच्या नीस कानन मेवावाला व संजय आगरवाल यांनी मी मे. होम ट्रेडच्या संचालकांपैकी असल्याचे सांगितल्याने तेथे माझ्या विरोधात गुन्हे दाखल झालेले आहेत वास्तविक मी. मे. होम ट्रेड लि. च्या संचालक नसताना व त्यानंतर संचालक होऊन राजीनामाही दिला असताना मला त्यात खोटे गोवण्यात आलेले आहे. माझ्या स्वतःच्या कंपन्यांनी माझ्या पक्षकारांशी केलेले व्यवहार हे विश्वासार्ह व सुरक्षीतपणे केलेले आहेत.

हा जबाब मला वाचून दाखवुन हिंदीतुन समजावुन सांगितला तो माझे सांगनेप्रमाणे बरोबर आहे.

हे लिहून दिले. स. ता. अ.

(KETAN SHETH)

समक्ष.

पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

पंचनामा ता० २५।७।२००२ (६४)

(१) श्री० कांतीलाल आत्माराम माकुडे उ.व. ४८ धंदा व्यापार
रा० ४२५/३० डायसप्लॉट झोपडवाडी गुलटेकडी पुणे
(२) श्री० शांताराम विठोबा वईकर उ.व. ४४ धंदा व्यापार
रा० पुलाची वाडी डेक्कन जिमखाना पुणे.

मी० श्री० पी० ए० शिउरकर पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा पुणे शहर वरील नमुद पंचाना साधु वासवानी चौक जवळील पोलीस आयुक्त कार्यालय पुणे येथील गुन्हे शाखा कार्यालयात बोलाविल्यावरुन हजर झाले व त्यांना कळविले की, आत्ता समक्ष हजर असलेले इसम जे आपले नाव व पत्ता - वसंत दत्तात्रय कामत रा० ९, ईशान रिया को ऑप हौसिंग सोसायटी, संघवीनगर, औंध, पुणे ७ असा सांगत असुन ते सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेत व्यवस्थापक पदावर काम करीत आहेत ते काय हकीगत सांगुन काय हजर करतात त्यासाठी तुम्ही पंच म्हणुन समक्ष हजर रहा असे सांगितल्यावर त्यांनी पंच म्हणुन हजर राहण्यास तयारी दर्शविल्याने वरील पंचासमक्ष पंचनामा केला तो खालील प्रमाणे -

विश्रामबाग पोस्टे
गु.र.नं. ६५/२००२
भा.दं.वि.क. ४०६,
४०९, ४२०, ३४

उ.नं.
१२०/०२

आम्ही वरील पंचासमक्ष हजर असलेल्या इसमास नाव व पत्ता विचारता त्यांनी आपले नाव व पत्ता वरील प्रमाणे सांगितला त्यांना काय हकीगत आहे याबाबत विचारता त्यांनी पोलीसांनी मागणी केल्या प्रमाणे झालेल्या संचालक मंडळ सभेचे हजेरी पुस्तक हजर करणेसाठी आणले आहे असे सांगुन सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे कडील संचालक मंडळ सभेचे हजेरी पुस्तक हजर केले त्याची पाहणी केली -

(१) [illegible]

११०२/१०/११ बुधवार पेठ पुणे मुख्यालय येथील ता० ५/४/०१ ते ता० २६/५/०२ या कालावधीमध्ये झालेल्या संचालक मंडळ सभेचे हजेरी पुस्तक, प्रत्येक पानावर बँकेचा शिक्क्यांचा आणि त्यामधील पानावर १ ते २० पर्यंत नंबर टाकलेले

००-०० येणे प्रमाणे वरील वर्णनाचे व किमतीचे सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे कडील संचालक मंडळाचे झालेले सभेचे हजेरी पुस्तक श्री वसंत दत्तात्रय कामत, व्यवस्थापक सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे यांनी हजर केले ते वरील पंचासमक्ष विश्रामबाग पो. स्टे. गु. र. नं. ६५/२००२ भा.दं.वि.क ४०६, ४०९, ४२०, ३४ या गुन्ह्याचे पुराव्याकामी पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेऊन जप्त पुस्तकावर प्रथम व शेवटच्या पानावर आमच्या व पंचांच्या सह्या करण्यात करणेत आलेल्या आहेत.

हा पंचनामा वरील पंचाचे उपस्थितीत १६०५ वा शुरु करुन १६५० ता० पुरा केला आहे.

| | |
|---|---|
| समक्ष | पंच |
| [signature] | (१) कां. आ. माकुडे |
| पोलीस निरीक्षक | (२) [illegible] |

No Role

पुरवणी जबाब ता० २५।०७।२००२ (६५)

मी० वसंत दत्तात्रय कामत वय ५० धंदा नोकरी रा० ९, प्रशांत, प्रिया को ऑप हौसिंग सोसायटी, संघवी नगर औंध पुणे ७

समक्ष हजर राहुन विचारले वरुन सांगतो की, ता० १६।५।०२ रोजी माझे केलेले जबाब मला वाचविले ते मी वाचुन पाहिले त्यातील मजकूर बरोबर आहे. त्या बाबत माझे पुन्हा सांगणे की,

मी काम करीत असलेल्या युवयुग सहकारी बँक मर्यादित पुणे या बँकेच्या ५ कोटि ६५ लाख रुपये सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्री व्यवहाराबाबत पोलीस केस दाखल झाली आहे. सदर प्रकाराबाबत पोलीसांची माझे बरोबर चर्चा झाली व त्या चर्चेद्वारे त्यांनी बँके कडील सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्री संदर्भामध्ये झालेल्या संचालक मंडळ सभा हजेरी पुस्तक हजर करण्यास सांगितले त्याप्रमाणे मी माझे आणि बँकेकडील लेटर पॅडवर लिहुन बँकेकडील झालेल्या संचालक मंडळाच्या सभा हजेरी पुस्तक पोलीसांपुढे हजर केले आहे ते पोलीसांनी जप्त करुन ताब्यात घेतले आहे.

म्हणुन माझे सांगणे

समक्ष
[signature]
पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

टिपन ता. २६/७/०२ (६६)

मी जयकुमार रसिकलाल मेहता उ.व.३९ धंदा - नोकरी रा. हरीओम अपार्टमेंट, सी-१०३ आनंदनगर, वसई रोड पश्चीम ४०१२०२. (फोन क्रमांक - ३४८२०३)

समक्ष हजर असताना विचारलेवरून सांगतो की. मी वरील ठिकाणी सुमारे १३ वर्षापासून रहावयास असून सध्या माझे घरी माझी आई, पत्नी, मुलगा व भाऊ-भावजय त्यांची मुलगी यांचेबरोबर रहावयास आहे. माझे शिक्षण मुंबई विद्यापीठ येथून वाणिज्य शाखामधून पदवीधर पर्यंत झालेले आहे.

सन. १९८५ मंध्ये मी पदवीधर झाल्यानंतर सन १९८६ जुलै मंध्ये चंपकलाल जमनादास ॲन्ड कंपनी शेअर ब्रोकींग फर्म, मुंबई स्टॉक-एक्सचेंज, दलाल स्ट्रीट मुंबई-२३ येथे ऑफीस असिस्टंट म्हणुन कामास लागलो. त्याठिकाणी मी. ३१ मार्च १९९५ पर्यंत काम केले.

सन १९९५ एप्रिल मंध्ये मी लॉईड्स ब्रोकरेज लि. मित्तल कोर्ट, नरीमन पॉईंट मुंबई-२१ याठिकाणी ऑफीस असिस्टंट, सेटलमेंट विभागामंध्ये कामास लागलो. त्याठिकाणी मला ३ वर्षानंतर असिस्टंट मॅनेजर डेब्ट मार्केट या विभागात प्रमोशनवर बदली झाली. व त्याठिकाणीच काम करीत होतो.

सन. १९९८ अखेर मी काम करीत असलेली लॉईड्स ब्रोकरेज लि. कंपनी ही मालक मुकेश आर. गुप्ता यांचेकडून संजय आगरवाल याने विकत घेतली त्यानंतर संजय आगरवाल याने कंपनीचे नाव बदलून युरो एशियन सिक्युरीटीज लिमिटेड असे ठेवले. संजय आगरवाल हा पुर्वीपासून कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी होता.

सन १९९९ नोव्हेंबर मंध्ये वरील कंपनीचे मे. होम ट्रेड लिमीटेड कंपनी या नवीन नावात रुपांतर झाले. त्यावेळीही कंपनीचे मालक म्हणुन संजय आगरवाल हे होते. त्या कंपनीत माझे कामाचे स्वरुप डाटा इन्ट्री करणे, बिलींग करने, चेकींग करणे वगैरे होते. त्यावेळी सदर कंपनीचे ऑफीस वाशी, नवी मुंबई याठिकाणी होते. त्यावेळी कंपनीचे संचालक पदावर ① संजय आगरवाल ② एन. एस. तिवेदी ③ केतन सेठ ④ धनंजय आगरवाल ⑤ माईक शहा. असे होते. व बाकी संचालक यांची नावे मला माहीती नाहीत. त्यावेळी सुबोध भंडारी रा. वाशी, नवी मुंबई पूर्ण पत्ता माहीती नाही हा कंपनीमंध्ये सिनियर व्हाईस प्रसिडेंट होता. एन. एस तिवेदी रा. विलेपार्ले स्टेशनजवळ मुंबई पूर्ण नाव. पत्ता माहीती नाही हे कंपनीत कंपनी सेक्रेटरी म्हणुन काम पहात होते. व कानन मेणावाला रा. जयंत महल, CCI चर्चगेट स्टेशनजवळ

Read in Argument

124

मुंबई पूर्ण नाव पत्ता माहीती नाही. ह्या कंपनीत मॅनेजर म्हणुन काम पहात होत्या. कंपनीचे व्यवहाराबाबतचे सह्यांचे अधिकार फक्त संजय आगरवाल, एन. एस. त्रिवेदी व सुबोध भंडारी यांनाच होते.

तसेच मीस कानन, अरविंद राय, केतन मस्कारीया व मी असे मे. होम ट्रेड लि. कंपनी वाशी नवी मुंबई येथे डेब्ट डिपार्टमेंट मध्ये काम करीत होतो.

मे. होम ट्रेड लि. कंपनी वाशी नवी मुंबई या कंपनीत केतन कांतीलाल सेठ हे सुरवातीपासून संचालक होते व ते कंपनीत येत-जात होते परंतु त्यांनी काय अधिकार होते याबाबत मला सांगता येणार नाही. त्यांनी मे २००१ मध्ये कंपनीच्या संचालक पदाचा राजीनामा दिला असलेबाबत समजले असून ऐकुन माहीती आहे.

आमचे कंपनीने बँकांना सिक्युरीटीज दिल्या नाहीत, काही-काही बँकांचे चेक न वटता परत आल्याने कंपनीचे ऑफीस २५ एप्रिल २००२ नंतर पासून बंद झाले व बँकांनी केलेल्या केसेसमुळे कंपनीचे ऑफीसला पोलीसांनी सील लावलेले आहे व सध्या कंपनी बंद आहे.

मे होम ट्रेड लि. कंपनी वाशी नवी मुंबईचे चीफ एक्झिक्युटीव्ह ऑफीसर व संचालक संजय आगरवाल हे त्यांचेविरुद्ध पोलीसात केलेल्या बँकेच्या तक्रारीप्रमाणे नागपूर पोलीसांत हजर झाले व सध्या उस्मानाबाद पोलीसांचे ताब्यात असल्याचे समजले. तसेच इतर कंपनीतील अधिकारी व संचालक कानन मेवावाला, सुबोध भंडारी व एन. एस. त्रिवेदी सध्या कोठे आहेत याबाबत मला माहीत नसून कंपनी बंद झाल्यापासून ते मला भेटलेले नाहीत व दिसलेले नाहीत.

समक्ष

पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा, पुणे शहर

(६०)९

# सुवर्णयुग सहकारी बँक लि.

मुख्य कचेरी : "मारणे हाईटस्", ११०२/१०/११, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.
फोन नं. : ४४८९९७३, ४४८९९७४, ४४८६०३९ (फॅक्स) ४४७३११८

जा.क्र. ३३१/२००२-२००३ दि. २५/०७/२००२

प्रति,
मा. पोलिस निरीक्षक,
गुन्हे अन्वेषण शाखा,
पुणे - ४११ ००१.

विषय :- माजी संचालक श्री. वसंत दत्तात्रय कोद्रे यांचे निधनाबाबत...

महोदय,

आपणांस कळवितो की, आमचे बँकेचे माजी संचालक कै. वसंत दत्तात्रय कोद्रे यांचे दिनांक २०/०६/२००२ रोजी निधन झाले आहे. त्यांचा मृत्यू दाखला सोबत माहितीसाठी जोडत आहोत. कृपया नोंद घ्यावी, हि विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

व्यवस्थापक

Received
13.8.2002
B.G.

: शाखा :
बुधवार पेठ ४४५७३३२, ४४८९९२१
मार्केट यार्ड ४२६०८८८, ४२६९६४२
बिबवेवाडी ४२११३५७
सांगवी ७२१३५७
व्ही. आय. टी. कॉलेज विस्तारीत कक्ष बिबवेवाडी
वडगाव शेरी ६६८२५३८
सिंहगड रोड ४३९०६५०
लोणावळा (०२११४) ७२२१०
जेजुरी (०२११५) ५३०८२

RECEIPT NO. ९६०७२ (६७) 2
DATE १६/०७/२००२
नक्कल फी / COPYING FEE ५.०० ५.००
TOTAL १०.००

पुणे महानगरपालिका (महाराष्ट्र राज्य)
PUNE MUNICIPAL CORPORATION (MAHARASHTRA STATE)
निबंधक, जन्म मृत्यु यांचे कार्यालय
OFFICE OF THE REGISTRAR OF BIRTHS & DEATHS, PUNE

नक्कल विभाग

| | |
|---|---|
| अर्जदाराचे नाव / APPLICANT | दारवटकर |
| पत्ता / ADDRESS | पुणे |

... मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ अन्वये देण्यात येणारा मृत्यु नोंदणी उतारा. Certificate of Death issued under Section 17 of the Registration of Births and Deaths Act, 1969. दाखला देण्यात येतो की, खाली दिलेली माहिती पुणे महानगरपालिकेच्या ... मृत्यु नोंदणी पुस्तकातील मूळ नोंदीवरुन घेतली आहे. ... that the following information has been taken from the original record of death ... in the register of Pune Municipal Corporation.

| मृताचे नाव / NAME OF DECEASED | लिंग / SEX |
|---|---|
| वसंत दत्तात्रय कोद्रे | पु |

पित्याचे / मातेचे / पतीचे नाव / NAME OF FATHER / MOTHER / HUSBAND

------

| मृत्यु दिनांक / DATE OF DEATH | नोंदणी क्र. / REGISTRATION NO. | नोंदणी दिनांक / DATE OF REGISTRATION |
|---|---|---|
| २०/०६/२००२ | २००२०१०५३१ | २१/०६/२००२ |

मृत्यु झाल्याचे ठिकाण / PLACE OF DEATH

इनलॅक्स & बुधरानी हॉस्पीटल

राहण्याचा कायमचा पत्ता / PERMANENT ADDRESS

२२३ बुधवार पेठ
पुणे.

राष्ट्रीयत्व / NATIONAL...

दिनांक / DATE

निबंधक / REGISTRAR

उपनिबंधक / SUB-REGISTRAR

126

Return Outward No. 866/2002
Police Inspector,
Crime Branch, Pune-01.
Ph. No.- 6122202 (Extn.-220)
Date : 15 /07/2002

To,
The Chief General Manager
Security & Exchange Board of India,
Investigation Dept.,
'B-Wing', Mittal Court, Nariman Point,
Mumbai - 400 021.

Sub : - Regarding Sebi registration No. of Home Trade Ltd.

Dear Sir,

I am the Investigating Officer in respect of the dealing of M/s Home Trade Ltd. with Suvarnayug Sahakari Bank Ltd. Pune - 411 002.

I require to know in writing the Sebi registration No. of M/s Home Trade Ltd. at Pune & Mumbai Stock Exchange

Please inform at your earliest

Thanking you,

Your faithfully,

15/7

( C.P. Shiurkar)
Police Inspector
Crime Branch,
Pune - 411 001

INSPECTOR OF POLICE CRIME BRANCH
PUNE CITY

O 15/7/02

2850451-56.

127

भारतीय प्रतिभूति
और विनिमय बोर्ड

***Securities and Exchange Board of India***

(६९)

**DEPUTY GENERAL MANAGER**
**SECONDARY MARKET DEPARTMENT**

SMD/DBA-II/AK/14520/2002
July 30, 2002

Shri C P Shiurkar
Police Inspector
Crime Branch
**PUNE – 411 001**

Dear Sir,

**Sub :- Information sought with regard to Home Trade Ltd**

This has reference to your letter dated July 15, 2002 seeking information in respect of SEBI Registration number of Home Trade Ltd at Pune and Mumbai Stock Exchange.

SEBI Registration number of Home Trade Ltd on Pune Stock Exchange is INB110624638 and The Stock Exchange, Mumbai is INB010624639.

Yours faithfully,

**PARAG JAIN**

21.11.2/8/02

अरनेस्ट हाऊस, 194 नरिमन पॉइंट, मुंबई-400 021. दूरभाष : 2850441 (10 लाईनें), 2880944 (4 लाईनें). फैक्स : 022-2870746/2046884
Earnest House, 194, Nariman Point, Mumbai-400 021. Tel.: 2850441 (10 Lines), 2880944 (4 Lines). Fax : 022-2870746/2046884

जावक क्रमांक- 932/२००२

अंमली पदार्थ विरोधी पथक,गुन्हे,पुणे

यांचे कार्यालय दिनांक- ०९/०८/२००२

१] पो ना १०५७ डी एस गरुड

२] पो कॉ ४०९० डी एस मते

यांना,,,,,,,,,,,,,,,

आपणास आदेश देण्यात येतो की, आपण [१] पिंपरी पो स्टे गु र नं १०२/०२ भादंविक ४६५,४६७,४६८,४७१,४०६,४०८,४२०,३४ [२] विश्रामबाग पो स्टे गु र नं ६५/२००२ भादंविक ४०६,४०९,४२०,३४ या गुन्हयाचे तपास कामी पोलीस निरीक्षक गुन्हे अन्वेषण विभाग,नागपूर यांना रिपोर्ट करुन वरील गुन्हा संबधात त्यांनी गणेश पेठ पो स्टे नागपूर शहर गु र नं ९७/०२ [२] १०१/०२ भादंविक ४०६,४०९,४२०,४७१,३४ या गुन्हयामध्ये मे होम ट्रेड लि कं. वाशी नवी मुंबई या कंपनीकडील सरकारी रोखे गैरव्यवहार संदर्भात जप्त केलेले कागदपत्राचे अवलोकन करुन वरील गुन्हयासंबधाने [१] सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत ,बुधवार पेठ पुणे व [२] श्री सदगुरु जंगली महाराज सहकारी बँक लि. चिंचवड,पुणे याचेशी झालेल्या व्यवहाराबाबत ची कागदपत्रा,पंचनामे व संबधित दस्तऐवज वगैरे मिळवुन त्याच्या सत्यप्रती घेऊन पुर्ततेने रिपोर्ट करावा.

[ पी आर पटणे ]

पोलीस निरीक्षक

अंमली पदार्थ विरोधी पथक,गुन्हे,

पुणे शहर

पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा पुणे शहर

जावक क्रमांक- ९३२ /२००२ (६७)
अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे, पुणे
यांचे कार्यालय दिनांक- १९/०८/२००२

१] पो ना १०५७ डी एस गरुड

२] पो कॉ ४०९० डी एस मते

यांना,,,,,,,,,,,,,,,

आपणास आदेश देण्यात येतो की, आपण [१] पिंपरी पो स्टे गु र नं १०२/०२ भादंविक ४६५,४६७,४६८,४७१,४०६,४०८,४२०,३४ [२] विश्रामबाग पो स्टे गु र नं ६५/२००२ भादंविक ४०६,४०९,४२०,३४ या गुन्हयाचे तपास कामी पोलीस निरीक्षक गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर यांना रिपोर्ट करुन वरील गुन्हयां संबधात त्यांनी गणेश पेठ पो स्टे नागपूर शहर गु र नं २७/०२ [२] १०१/०२ भादंविक ४०६,४०९,४२०,४७१,३४ या गुन्हयामध्ये मे होम ट्रेड लि कं. वाशी नवी मुंबई या कंपनीकडील सरकारी रोखे गैरव्यवहार संदर्भात जप्त केलेले कागदपत्राचे अवलोकन करुन वरील गुन्हयासंबधाने [१] सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत, बुधवार पेठ पुणे व [२] श्री सदगुरु जंगली महाराज सहकारी बँक लि. चिंचवड, पुणे यांचेशी झालेल्या व्यवहाराबाबत ची कागदपत्रा, पंचनामे व संबधित दस्तऐवज वगैरे मिळवुन त्याच्या सत्यप्रती घेऊन पुर्ततेने रिपोर्ट करावा.

[ पी आर पटणे ]
पोलीस निरीक्षक
अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे,
पुणे शहर

पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा
पुणे शहर

मा० सादर -

वरील आदेशाप्रमाणे आम्ही स्वतः पो कॉ ४०९० मते असे गु. अ. वि. नागपूर शहर याठिकाणी जाऊन तेथील मा० किशोर बेहे पोलीस उप अधिक्षक गु. अ. वि. नागपूर यांना रिपोर्ट करुन त्यांना माहिती मिळणे बाबतचे पत्र दिले असता त्यांनी त्यांचे कडील आपले संबंधित गुन्ह्यांशी उपलब्ध असलेली माहितीच्या छायांकित सत्य प्रति देऊन बाकी माहिती मा० अपर पोलीस महासंचालक यांचे,

130

गु अ वि म राज्य पुणे यांचे ड्रा/१२ दिनांक मे वेतन चौकशी यांचेकडे ऑफिसमधील अयशस्वी बाबत पत्र दिले आहे यबद्दल मा श अहवाल सादर करीत आहेत

मान्यवर आदरपूर्वक

ता० २४/८/२००२

पो०ना० दहशत प्रतिबंधक पथक

पुणे

(७२)

जा. क्र. गु. अ. वि. /नाग/तपास/ /२०
कार्यालय-अपर पोलीस अधिक्षक, गु. अ. वि.
नागपूर. दिनांक : २०.०८.२००२

प्रति,

पोलीस निरीक्षक,
~~अमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे~~
पूणे शहर.

विषय :- गुन्हयाचे तपासकामी माहीती व कागदपत्र मिळणे बाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. १३१ /०२, अन्वेष

पो. स्टे. गणेशपेठ, नागपूर अप. क्र. १०१/०२, कलम ४०६, ४०९, ४६८, ३४ भादंविचे तपासात होमट्रेड प्रा. लिमी. कंपनीचे कार्यालयाची झडती घेण्यात आली असून सदर मध्ये मा. पोलीस उप महानिरीक्ष, गु. अ. वि. पूणे[पूर्व] यांचे आदेशान्वेय सदर गुन्हयाचे तपासात पुराव्याकामी उपयूक्त कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. व जप्त करण्यात आलेली कागदपत्रे शासनातर्फे नियुक्त करण्यात आलेले ऑडीटर, श्री. केतन चोक्सी यांचे कडे ऑडीट करणेकामी देण्यात आले असून ऑडीटचे काम गु. अ. वि. कार्यालय, ओल्ड कस्टम हाउस, मुंबई येथे करण्यात येत आहे.

सदर गुन्हयाचे तपासात जप्त करण्यात आलेली कागदपत्रे आपले कडील गुन्हयाचे तपासामध्ये उपयूक्त असल्यास गु. अ. वि. कार्यालय, ओल्ड कस्टम हाउस येथे मा. पोलीस उप महानिरीक्षक, गु. अ. वि. म. रा. पूणे, यांचे सोबत संपर्क साधून हस्तगत करावे.

तसेच सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेले फिजीकल डिलीव्हीरी, आवक-जावक रजिस्टर मध्ये आपले कडील तपासात असलेल्या बँकाच्या नोंदीच्या प्रति प्रमाणीत करून सोबत जप्ती पत्रकाची प्रत पूरविण्यात येत आहे.

सहपत्र :
[१] आवक-जावक रजिस्टर नोंदीची प्रमाणीत प्रत. 06 0]
[२] जप्ती पत्रकाची पत्र.

[ के. बी. बेले ]
पोलीस उप अधिक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर पथक

(२७)   मूळ - (ब) 2

- जप्ती पंचनामा -   दि. २१/५/२००२

पो. स्टेशन :- गणेशपेठ, नागपूर शहर

गु. र. नं. :- १०१/२००२, कलम :- ४०६, ४०९, ४६८, ३४ भा. द. वि. प्रमाणे.

जप्ती करणारे अधिकाऱ्याचे नांव :- के. डी. सातवे पोलीस उप अधिक्षक, गु. अ. वि., नागपूर.

जप्तीचे ठिकाण :- नरीमन पॉईंट, मित्तल कोर्ट १२ वा माळा येथील होम ट्रेड चे कार्यालय.

कोणाकडून जप्त केले :- केतन रमेश मस्करिया, वय २८ वर्षे, कर्मचारी होम ट्रेड. रा. ठि. १०१/५०१३, [illegible] पंतनगर घाटकोपर (पू.) मुंबई.

जप्त करण्याची तारीख व वेळ :- दि. २१/५/२००२, चे १४.३० वाजता.

जप्ती माल विवरण :- १) ०० = ००/- ट्रान्सफॉर्म सेक्युरिटीज खरेदी व विक्री केल्याचे हस्ताक्षरात लिहिलेले आवक-जावक रजिस्टर. ज्याच्या - १ल्या पानावर दि. १/२/२०००, शेवटच्या पानावर २५/१०/२००० ची नोंद असलेली एकूण ६६ पाने लिहिलेली.

२) ०० = ००/- ट्रान्सफॉर्म सेक्युरिटीज, खरेदी व विक्री केल्याचे हस्ताक्षरात लिहिलेले आवक जावक रजिस्टर, ज्याच्या १ल्या पानावर दि. २१/११/२००० व शेवटच्या पानावर दिनांक २१/३/२००२ अशी नोंद (क्रमशः पान)

सत्यप्रत
(बी. डी. पोराटे)
पोलीस उप अधिक्षक
राज्य गु. अ. वि. भ. प. नागपुर

Exh. 143 A (ओळखणी) [illegible]
CSR [illegible]
CI/BS/21C/mum.

असलेली एकूण १ ते ४३ पाने लिहिलेली.

३) ००=००१ - व्हल्कॅन सेक्युरिटी खरेदी व विक्री केल्याचे हस्ताक्षरात लिहिलेले आवक-जावक रजिस्टर ज्याच्या १ल्या पानावर दि. ३।६।२००१ व शेवटच्या पानावर दि. २२।१।२००२ ची नोंद असलेली एकूण १ ते १११ पाने लिहिलेली.

४) ००=००१ - व्हल्कॅन सेक्युरिटी खरेदी व विक्री केल्याचे हस्ताक्षरात लिहिलेले आवक-जावक रजिस्टर ज्याच्या १ल्या पानावर दि. ९।६।२००२ व शेवटच्या पानावर दि. १५।६।२००२ ची नोंद असलेली एकूण १ ते ८ पाने लिहिलेली.

वरील प्रमाणे [illegible] एकूण ४ रजिस्टर्स [illegible] गु.र.नं. ३ ९०१/२००२ भा.द.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ [illegible] प्रमाणे [illegible] दाखल असून [illegible] कार्यालयातील [illegible] आहे. [illegible] सदर कार्यालयात [illegible] व सी.बी.आय. चे [illegible] यांनी [illegible] प्रवेश केला [illegible] सी.बी.आय. चे [illegible] श्री अनिल गढ़ा व श्री के. के. शर्मा हे हजर होते. सदर [illegible] सी.बी.आय. [illegible] दाखल [illegible] RC-1 (E)/2002/CBI : BS&FC मुंबई. गुन्ह्याचे तपास संबंधाने सदर कार्यालयाची झडती घेणे असल्याने सदरचे कार्यालयाचे संपूर्ण ताबा पो.नि. श्री अनिल गढ़ा यांना ताब्यात देऊन कार्यालयाची [illegible] एकूण तीन किल्ल्या त्यांचे ताब्यात पुढील कारवाई करीता देण्यात आल्या.

सही:- १) [signature]

सही -

२) [signature]

समक्ष [signature]

(के. [illegible]) [illegible]

पोलीस [illegible]

[illegible]

पंचा १) श्री [illegible] वय [illegible] वर्षे, राह. [illegible] ४०४, [illegible] (E) मुंबई.

पंच २) [illegible] ६० [illegible] २२१/[illegible] मुं. २१. [illegible] (U.P.).

(35)

(02)3

| | | |
|---|---|---|
| 1/6/00 | 11.99% GOI 2009 | HDFC BANK LTD. COLABA(?) |
| SGL | | FACE VALUE - 2 CR |
| | | SGL DEAL DATE - 31/5/2000 |
| 1/6/2000 | 10.50% GOI 2014 | SBI INT. SEC. LTD |
| SGL | | FACE VALUE - 23 LAC |
| | | SGL DEAL DATE - 30/5/2000 |
| 2/6/2000 | 10.25% GOI 2012 | NAVSARI PEOPLES CO-OP BANK LTD. |
| | | FACE VALUE - 2.5 CRORE |
| | | CERT NO. BY 389 TO BY 393 |
| | | H/N - HDFC BANK LTD. |
| | | NO. OF BONDS - 05 & FORM OF PR - 05 |
| | 10.25% GOI 2012 | THE UDHNA CITIZEN CO-OP BANK LTD |
| | | FACE VALUE - 50 LAC |
| | | CERT NO. BY 388 |
| | | H/N - HDFC BANK LTD. |
| | | NO. OF BONDS - 01 & FORM OF PR - 01 |
| 4/6/2000 | 11.50% GOI 2010 | SUVARNAYUG SAHAKARI BANK LTD |
| | | FACE VALUE - 2.5 CRORE |
| | | DETAILS AS ON OPPO. PAGE |

(1)

Kishor Bel... Dy. S.P. C.I.D. NAGPUR

सत्यप्रत

(बी. बी. घोरपडे)
पोलीस उप अधिक्षक
राज्य गु. अ. वि. म. प. नागपुर

(37)

(63) 8

| | | |
|---|---|---|
| 7/6/2000 | 8% GOI 2011 | HDFC Bank Ltd (COURATE). Face value 20 Lac. SGL Deal Date - 6/6/2000 |
| 7/6/2000 | 10% GG 2011 | Suvarnayug Sahakari Bank Ltd. Face value - 1 Cr. SGL Deal Date - 6/6/2000 |
| 26/6/2000 | 15.75% VDC 2004 | Sourabh Stk. Broking Ltd. Face value - 35 LAC. CERT. NO. 263 to 269. DIST. NO. 13871 TO 13925. F.no. 219. [illegible] Bonds [illegible] |
| 7/6/2000 | 8% GOI 2011 | S & M Advisory Broking Ltd. Face value - 20 LAC. SGL Deal Date - 3/2/2000 |
| 7/6/2000 | 13% GSFC 2004 | P&R Securities Ltd. Face value - 50 LAC. Details same as on opp. page. |

(2)

सत्यप्रत

(बी. सी. सोरटे)
पोलीस उप अधिक्षक
राज्य गु. अ. वि. म. रा. नागपुर

38

92 4

| | | |
|---|---|---|
| 12/6/2000 | 11% CG 2002 | CALLIGATE MGT SER. LTD.<br>Face value - 50 Lac<br>Details Same as on oppo. page. |
| [illegible] | | |
| 13/6/2000 | 11.75% CG 2005 | Swarnayug Prabhu Sahakari Bank Ltd<br>Face value - 50 Lac<br>Details Same as on oppo. page. (3) |
| [illegible] | | |
| 13/6/2000 | 11.[illegible]% CG 2011 | [illegible] Sahakari Banking Ltd<br>Face value - 50 Lac<br>Same as on oppo. page. |
| [illegible] | | |
| 13/6/2000 | 11.50% CG 2015 | [illegible] Co-op. Bank Ltd<br>Face value - 50 Lac<br>Same as on oppo page. |
| [illegible] | | |
| 13/6/2000 | 11.50% CG 2015 | Syndicate Securities & mgt. Ser.<br>Face value - 25 Lac<br>Same as on oppo. page. |

सत्यप्रत

(बी. बी. [illegible])

पोलीस उप अधीक्षक

राज्य गु. अ. वि. भ. प. नागपुर

Kishor [illegible]
Dy. S.P. C.I.D.
NAGPUR

135

(45) (63)E

(4)

| | | |
|---|---|---|
| 29/7/2000 | 11.99% GOI 2009 | Suvarnayug [illegible] Sahakari Bank Ltd<br>face value - 2cr.<br>Same as on oppo page |
| 20/7/2000 | 10.25% GOI 2012 | Uttam citizen Co-op Bank Ltd<br>face value - 1cr.<br>Same as on oppo. page. |
| 20/7/2000 | 10.25% GOI 2012 | The Surat Mahila Nagrik Sahakari Bank Ltd<br>face value - 50 lac<br>Same as on oppo. page |
| 21/7/2000 | 10.25% GOI 2012 | Mehsana Peoples Co-op Bank Ltd<br>face value - 2cr.<br>Same as on oppo. page |
| 20/7/2000 | 10.50% GOI 2014 | Surendranagar Peoples Co-op. Bank Ltd<br>face value - 1cr.<br>Same as on oppo. page |

सत्यप्रत

(बी. बी. पोराटे)
पोलीस उप अधिक्षक
राज्य गु. अ. वि. म. प. नागपुर

D.S.P. C.I.D. NAGPUR

35 (62)

| | | |
|---|---|---|
| 08/08/2001 SGL - Failed | 11.50% GOI 2015 | Giltedge Investment Banking Services Ltd<br>Face value - 5 lacs<br>SGL Deal Date 08/08/2001 |
| 08/08/2001 SGL - Failed | 14.00% GOI 2005 | Giltedge Investment Banking Services Ltd<br>Face value - 5 lacs.<br>SGL Deal Date 08/08/2001 |
| 08/08/2001 SGL - Failed | 10.70% GOI 2020 | Catholic Syrian Bank EPF A/C<br>Face value - 50 lacs.<br>SGL Deal Date 08/08/2001. |
| 08/08/2001 SGL - Failed | 10.45% GOI 2018 | The Federal Bank Ltd<br>Face value 5 Cr.<br>SGL Deal Date 08/08/2001 |
| 08/08/2001<br>P27064 - 1Cr / MED<br>P27065 - 1Cr / MED | 10.65% ICICI 2006 | Suvarnayug Sahakari Bank Ltd<br>Face value - 2 Cr<br>Details are on oppo. page (5) |
| 09/08/2001 SGL - failed | 11.43% GOI 2015 | HDFC Bank Ltd<br>Face value - 1Cr<br>SGL Deal Date 09/08/2001 |
| 09/08/2001 MED | 11.50% GOI 2015 | The Federal Bank Ltd<br>Face value - 25 lacs<br>SGL Deal Date 09/08/2001 |

सत्यप्रत

(बी. बी. पोराटे)
पोलीस उप अधिक्षक
गु. अ, वि, म. प्र. नागपुर

(62) 6

| | | |
|---|---|---|
| 20/02/2001 (Peil Flex)- P:1029 MKD | 13.00% SBI FRN | The panchsheel Mer. Coop Bank Ltd<br>face value - 60 lac<br>1. Cert. no. 1947675 TO 1947679 - 50 lac<br>Distinctive no. 4723406 TO 4728405<br>Jt/w - The panchsheel Mer. Co-op. Bank Ltd.<br>Cert. no 401874 TO 401893 & 401895<br>QTY - 20,000/- 9,80,000/-<br>Distinctive no. 8426567087-2675<br>872676 TO 873655<br>no of Bonds - 20 & Bor Authorised Signs List |
| 20/02/2001 Sign MKD | 11.50% GOI 2010 | Suvarnayug Sahakari Bank Ltd<br>face value - 252 lac<br>SGL Deal Date 20/02/2001 |
| 22/02/2001 (Cell for Hdfc) MKD | 11.43% GOI 2015 | HDFC Bank Ltd<br>face value - 1 cr<br>Cert. no - B459<br>Jt/w - HDFC Bank Ltd<br>No of Bonds - 01 & form of TR - 01 |
| 22/02/2001 (Cell for Hdfc) MKD | 11.30% GOI 2010 | HDFC Bank Ltd<br>face value - 120 lac<br>Cert. no. B4170 TO B4181<br>Jt/w - HDFC Bank Ltd<br>No. of Bonds - 12 & form of TR - 12 |
| 23/02/2001 SGL MKD | 10.47% GOI 2015 | SBI Gilts Ltd<br>face value - 8 cr.<br>SGL Deal Date 23/02/2001 |

(6)

Kishor Shah
Dy.S.P. CID
NAGPUR

सत्यप्रत
(बी. बी. पोराटे)
पोलीस उप अधिक्षक
राज्य गु. अ. वि. भ. प. नागपुर

(७३)

प्रति,
मा. पोलिस निरीक्षक सो. विश्रामबाग पो. स्टे.
पुणे शहर —

प्रतिवेदक :- पी. आर. पटणे पोलिस निरीक्षक
अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे
शाखा, पुणे शहर
यांजकडुन —

विश्रामबाग पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ६५/२००२ भा. द. वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ प्रमाणे आरोपी नामे संजय हरिराम अगरवाल वय-३७ रा. ५०२ कुसुम अपार्टमेंट, सेक्टर नं. १७ वाशी नवी मुंबई हा पिंपरी पो. स्टे. गु. र. नं. १०७/२००२ भा. द. वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ४६७, ४६८, ४६९, ४७१, ३४ अ. गुन्हयात अटक होता. त्यास मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. न्यायालय क्र. ४ पुणे कॅम्प यांचे कोर्टातुन ट्रान्सफर वॉरंट घेऊन, त्यास वॉरंटाने मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. पिंपरी न्यायालय, पुणे कॅम्प न्यायालयातुन ट्रान्सफर करुन घेऊन, त्यास वरील दाखल गुन्हयात आज दि. २१/८/२००२ रोजी १९.१५ वा. अटक करुन [illegible] [illegible] असुन, त्याला [illegible] घेऊन [illegible] ठेवली आहे.

आरोपीचे अटके बाबत त्याचा भाऊ नामे विजय हरिराम अगरवाल रा. ७ हरिसभा स्ट्रीट खिदिरपूर कलकत्ता-२३ यांना कळविले आहे.

तरी सदर बाबत स्टेशन डायरी नोंद होणेस विनंती आहे.

(सही)
ता. २१/८/२००२

मा. सादर,
सदरबाबत वि. बाग
SDE No. 30 अन्वये
२२:०५ वा. नोंद.
(सही)
S.H.O वि. बाग
पो. ठाणे पुणे.

139

अटक पंचनामा ता. २१/८/2002 (अ)

1) श्री अशोक बबन देशमुख वय ४० धंदा रिक्षा ड्रायव्हर रा. ८३६ शुक्रवार पेठ, पुणे
2) श्री भानुदास धोंडोजी मोरे वय ६२ धंदा प्रेसिंग रा. इंदिरानगर झोपडपट्टी हॅरिस ब्रिज, बोपोडी पुणे

मी पी. आर. पवार पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे वरील पंचांना, गुन्हे शाखा पुणे शहर कार्यालयात बोलाविले वरून हजर झाले असता, कळविले की, पिंपरी पोलीस स्टे. गु. रजि. नं. १०२/२००२ भा.द.वि. कलम ४२०, ४०६, ४०८, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ मधील आरोपी नामे संजय हरिराम अगरवाल वय ३७ रा. ७०२ कुसुम अपार्टमेंट, सेक्टर नं. १७ वाशी नवी मुंबई हा विश्रामबाग पोलीस स्टेशन गु. र. नं. ६५/२००२ भा.द.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ मध्ये असल्याने त्यास सदर गुन्ह्यात अटक करून घेणे कामी, ट्रान्सफर वॉरंट मिळणे बाबत मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. न्यायालय क्र. ४ पुणे यांना रिपोर्ट देऊन, मा. कोर्टाने ट्रान्सफर वॉरंट दिले. सदरचे वॉरंट स्वाधीन कार्यालयाने जा. क्र. १४७/२००२ ने रिपोर्ट सोबत मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. पिंपरी न्यायालय, पुणे यांना दिले असता त्यांनी वॉरंटवरून सदरचा आरोपीस वरील विश्रामबाग पोलीस स्टेशनचे गुन्ह्यात दिले. त्यास सदर गुन्ह्यात अटक करावयाची असल्याने मी त्याची अंगझडती घेऊन पंचनामा करणे आपण समक्ष हजर रहा. वगैरे कळविले वरून पंच राजी झाल्याने मी पंचनामा करणे तो खालील प्रमाणे —

पंचासमक्ष आरोपीस नाव पत्ता विचारता [illegible]

त्याचे, अंग तपासून पाहता त्याचे शरीरावर कोणते
मारहाणीच्या निशाण्या आढळून पोलिसांबाबत तक्रार नसल्याचे
नाही. त्याचे अटक बाबत त्याचा भाऊ नामे विजय
हरिराम अगरवाल रा. ७ हरिसत्ता सदाशिव पेठ
फोन क्र.-23 यांना समक्ष कळविले आहे.

हा पंचनामा पंचासमक्ष १८.४५ वा. सुरु
करून १९.१५ वा. पुरा केला आहे.

पंच. हा पंचनामा लिहिला बरोबर आहे.

1) अ. बी. देशमुख

2) [signature]

[signature]
पोलिस निरीक्षक
अंमली पदार्थ विरोधी पथक
गुन्हे शाखा, पुणे

आरोपीची सही
[signature] 21/8/02
(Sanjay Agarwal)

पंचनामा ता. २३/८/२००२ (७४)

१) जावेद गुलाब शेख. वय २० धंदा- फ्रूट व्यापार
रा. ४५० कसबा पेठ पुणे.

२) संग्राम संभाजी चव्हाण. वय २० धंदा- वेटर
रा. सर्वे नं. ३४ केशव नगर मुंढवा पुणे.

मी. पी. आर. वटवे. पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा पुणे. वरील पंच यांना अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा पुणे. याठिकाणी बोलावून सांगितले की, विश्रामबाग पोलीस ठाणे गु. र. नं. ६५/०२ भा. दं. वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ मधील आरोपी नामे- संजय हरिराम आगरवाल रा. ८०२ कुसुम अपार्टमेंट वाशी नवि मुंबई हे समक्ष हजर आहेत त्याचे दाखल गुन्हाचे कामी हस्ताक्षराचे सहयांचे नमुने घ्यावयाचे आहेत. तरी आपण पंच म्हणून समक्ष हजर रहा वगैरे कळविले वरून वरील पंच इसम पंच म्हणून हजर राहणेस तयार झाले. त्यांचे समक्ष पंचनामा केला तो खालील प्रमाणे.

समक्ष हजर असलेला वरील आरोपी याचे नांव-पत्ता विचारता त्याने आपले नांव. पत्ता वरील प्रमाणे सांगून त्याचे कोऱ्या सहा कागदावर प्रत्येकी एका कागदावर सहा-सहा सह्या घेण्यात आल्या असून आरोपी संजय हरिराम आगरवाल. याने कॉलमने इंग्रजीमध्ये सह्या करणेत आलेल्या आहेत. सदर सह्या कोरे प्रत्येकी सहा कागदांच्या खाली पंचांच्या सह्या समक्ष म्हणून घेतलेली असून आम्ही खाली समक्ष सही म्हणून करणेत आलेली असे तसेच सदरचे हस्ताक्षर लखोट्यात घालून त्यावर पंचांचे व आमचे सही करून घेतले आहे. हा पंचनामा सकाळी १०.३० वाजता सुरू करून ११.३० वाजता पुरा केला आहे.

हा पंचनामा लिहून दिला सा. न. म.

समक्ष
(सही)
पोलीस निरीक्षक
अंमली पदार्थ विरोधी
पथक गुन्हे शाखा पुणे

पंच
1) जावेद गुलाब शेख
2) ___ (सही)

कि. र. नं.
१३५
/२००२

(सही) १६१

Imp Panchanama
SA says that MJPNL Certificates were prepared by SB

पंचनामा ता. २४/८/२००२ (७६)

१) श्री सिद्धार्थ शरणाप्पा कुंभार वय २२ वर्षे धंदा-व्यवसाय
रा. मिठानगर, कोंढवा, पुणे

२) श्री रणजित सुरेंद्र नारायण वय २४ धंदा- नोकरी
रा. कळंबोली गांव, ता. पनवेल जि. रायगड

श्री पी. आर. पठाणे पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर वरील पंचांना रेल्वे स्टेशन बिल्डींग, इंटर नॅशनल इंफोटेक पार्क, टॉवर नंबर 3, पाचवा मजला, वाशी रेल्वे स्टेशन, वाशी, नवी मुंबई येथे बोलावून घेऊन हजर झाले असता, कळविले की, विश्रामबाग पोलीस स्टेशन गु. र. नं. ६५/2002 भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ मधील आरोपी नामे संजय हरिराम अगरवाल वय ३७ रा. ७०२ कुसुम अपार्टमेंट, वाशी नवी मुंबई हा समक्ष हजर असून तो होम ट्रेड चा चेअरमन आहे. सदर गुन्ह्यातील काही माल कार्यालयात गुन्ह्याचे तपास कामी झडती घ्यावयाची असून, ती झडती, घेणे व पाहणी करणे आपण समक्ष हजर रहा वगैरे कळविले वरून पंच राजी झालेने ती पंचनामा करणे तो खालील प्रमाणे —

पंचासमक्ष आरोपीस नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव पत्ता वरील प्रमाणे सांगून, होम ट्रेडचा चेअरमन आहे स्वतः असल्याचे सांगितले. नमूद कार्यालयाची झडती घेणे पाहणी करणेस आपली काही एक हरकत नसलेले सांगितले. सदर कार्यालय हे वाशी रेल्वे स्टेशन बिल्डींगचे ५ व्या मजल्यावर उत्तर/भिमुखी असून, ग्लास डोअरला दरवाजा असून, बाहेर होम ट्रेडचे खाजगी लॉकचे असून दरवाजावर दि. १९/७/२००२ रोजीचे, सहा. पो. निरी. श्री आव्हाड गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी व दोन पंचांचे सहीचे सिल पिंपरी पोलीस स्टे. गु. रजि. नं. १०२/२००२ भा.दं.वि. क. ४२०, ४०६, ४०९, ४६५, ४६८, ४६७, ४७१, ३४ मध्ये केलेले दिसत आहे.

परंतु रखाजाब कुलुप लावलेले बॉक्समध्ये व आरोपी संजय
आगरवाल यांनी सांगितले, सदरचे सिल काढून कार्यालयात
प्रवेश करता, २० हजार स्क्वेअर फुटाचे कार्यालय अत्याधुनिक
पध्दतीने मांडणी केलेले दिसत आहे. सदर ऑफिस मध्ये एक
टेक्नॉलॉजी रुम, कॉम्प्युटर रुम, होम ट्रेडचे सेक्रेटरी आणि
आरोपी संजय अगरवाल यांचा कॉन्फरन्स हॉल, कॅन्टीन,
स्त्री-पुरुष बाथरुम, गरम सामान ठेवण्याची खोली, रुम,
सदर कार्यालयाची पाहणी करत असताना होम ट्रेड सेक्रेटरी
आणि आरोपी संजय अगरवाल यांनी वापरलेले टेबल-खुर्ची
ऑफिसमध्ये कॉम्प्युटर, प्रोजेक्टर, स्कॅनर, स्कॅनर मशीन, झेरॉक्स
मशीन, प्रिंटर्स, कॅबिनेट, रायटींग टेबल, फोन, कागद, पोस्टर्स,
रॅक, कामकाजी कागद, जाहिराती पोस्टर्स इत्यादी ऑफिस उपयोगी
साहित्य दिसत आहे.

[सदर ऑफिसचे होम ट्रेड संबंधात पोलीस सोबत आलेले
आरोपीने नमूद केलेले व सुवर्णयुगचे श्री सुबोध भंडारी असे
स्कॅनरचा महाराष्ट्र शासन प्राधिकरणाचा ऑथराईज लेटरहेड
बनवलेले बांबर मध्ये आढळलेले वगैरे व फेरफार केले व त्याला वापर
पुढे सुवर्णयुग सहकारी बँक लिमी. पुणे शहर यांच्याशी
व्यवहार करताना वापरण्यात आला सदरचा ऑथराईज लेटरहेड
बनवून फाईलचा स्कॅनर केला व तो मला आठवत नाही.] परंतु
कार्यालयात एकूण ८ स्कॅनर असल्याचे दिसत आहेत.
त्यांचा हे ऑथराईज लेटर जेव्हा तयार करण्यात व्यवहारात
आणलेले आहे तेव्हा हे मशीनवरुन नाही त्याचे बाबी
बाबीचे उकल केले असल्याचे सांगत आहे. परंतु कोणत्या
शेडींग मशीन वर केले ते मला आठवत नाही असे सध्या
आरोपी संजय अगरवाल सांगत आहे.

सदरचे होम ट्रेडचे कार्यालयात ठिकठिकाणी असलेल्या
रजिस्टरला फाईल्स, पुस्तके, ड्रॉवर मधील डेटा वगैरे, त्यांचे
ऑफिस मध्ये कागदपत्रांची पाहणी केली असता सुवर्णयुग
सहकारी बँक लिमि. पुणे शहर यांच्याशी संबंधीत असलेला
व्यवहार संबंधातील कोणतेही नोंदी अगर दस्तऐवज मिळून
आलेले नाही. परंतु त्यापूर्वी आपले कार्यालयात नागपूर, सी.बी.आय

पुरवणी :- विश्रामबाग पो.स्टे. गु.र.नं. ६५/२००२ भा.दं.वि. ४०६, ४०९, ४२०, ३४ नुसार होम ट्रेड, वाशी नवी मुंबई येथील कार्यालयाचे दि. २४/५/२००२ रोजीचे पंचनाम्या [illegible] अर्क :

---

पोलिसांनी फाईल्स, फ्लॉपी, कॉम्प्युटर वगैरे रेकॉर्ड घेऊन गेलेले सध्या ताब्यात आहे.

सुवर्णयुग सहकारी बँक लिमी. पुणे शहर यांचा संबंधी कुठलेही प्रकारचा कागदी नोंदी, दस्तऐवज मिळून न आलेने त्याठी एक जप्त करणेत आलेले नाही. आहे ती परिस्थिती नमूद केली.

सदर होम ट्रेड हे कार्यालय, इंटरनॅशनल इन्फोटेक पार्क टॉवर नं. ३ मधील ५ व्या मजल्यावर असून, सदर मजल्यावर वाशी रेल्वे स्टेशन, पश्चिम मजला [illegible], खिडक्या, दुसरा [illegible], पश्चिमेला व त्याच्या उत्तरेस पालवा होम ट्रेड व सहावा ऑर्केड टेक आणि प्रभात टॉवर-ला मधील कार्यालये आहेत.

मागितले केवळ आणलेले नाहीत मी सर्व नोंदी काळजीपूर्वक तपासल्या

[illegible]

घेतलेल्या आहेत. माझ्याकडे प्रत्यक्षात नाशिक येथे कोड़े मेस नसल्याने मी गुंतवणूक रजिस्टर मध्ये सर्टिफिकेट नंबर कोड नंबर इत्यादीचा उल्लेख केलेला नाही.

आता आपण मला वरील नोंदी रजिस्टर मध्ये दाखवून माझ्याच हस्ताक्षरात असल्याचे पाहून वरील नमूद माहिती मी स्वीकारतो आहे. तसेच आता मला वरील नमूद व्यवहाराचे सर्टिफिकेट कॉन्ट्रॅक्ट नोट नंबर १३३६१, १३५४५, १३५६१, १४५४८, १४५४६, १४९७०, १४५४५, १६०२९, १४९११, १६८५३, १६८५५, १६८५१, हे या दाखविले आहेत. त्याबद्दल केवळ उपाध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर भट यांची सही आहे त्या खाली विठ्ठल कैलै उपाध्यक्ष व अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर भट यांच्या सह्या आहेत. या स्टेटमेंटवर दोन इतर ठिकाणी बसावर श्री ज्ञानेश्वर भट (अध्यक्ष) व आपटे श्री. ज्ञानेश्वर यांच्या सह्या असाव्या. म्हणून त्या मी नेहमीच्या माझ्या पद्धती प्रमाणे असल्याने मी ओळखून सांगतो.

माझे वरील टिपण मला वाचून दाखविले ते माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

पोलीस निरीक्षक
आर्थिक गुन्हे शाखा पुणे

Mokole

Temporary Clerk in Bank

जबाब ता. २८.९.२००२ (८८)

माझे नांव - अमर आठवले, धंदा वय २०

धंदा - नोकरी रा. ९१५ शनिवार पेठ पुणे

समक्ष विचारले वरून सांगतो की, मी सुवर्णयुग सहकारी बँक लि. पुणे येथे ऑक्टोबर २००० पासून टेंपररी क्लर्क म्हणून नोकरीस आहे. सध्या मी भाग भांडवल विभागात क्लार्क म्हणून काम करतो आमचे बँकेतील गुंतवणूक विभागात २००१ पासून श्री. दिनेश परदेशी हे क्लार्क म्हणून बुधवार पेठ मुख्य शाखा येथे काम पहातात.

आता आपण मला सन २००१-२००२ चे गुंतवणूक रजिस्टर दाखविले ते रजिस्टरमध्ये एकूण ५१ पाने आहेत प्रत्येक पानावर बँकेचा गोल शिक्का व सुवर्णयुग सहकारी बँकेचा मुख्य शाखेचा इंग्रजी मध्ये मारलेला आहे. सदर रजि. नोंद क्रमांक २४ दि. २०.६.२००१ ची ११.५० टक्के I.D.B.I. २०१० दर्शनी किमत तिनशे लाख रुपये बाबतचे खरेदी केले बाबतची नोंद पान नं. ३० चे पाठीमागे केलेली आहे. तसेच बाजूचे पान नंबर ३१ वर तेच रोखे पुन्हा विकले बाबतची नोंद दाखविली आहे. सदरची नोंदी श्री. दिनेश परदेशी यांनी घेतलेली आहे. त्याच पान नंबर ३१ वर नोंद क्र. २४ चे अनुषंगाने मी माझे हस्ताक्षरात अशी नोंद घेतलेली आहे की, S.G. विकास बँक 624-625 I.D.B.I बँक व त्या खाली Rs. 1000 each + 3 Certificates अशी नोंद घेतली आहे. सदरची नोंद मी कोणाच्या सांगणे वरून व कशी घेतली ही मला आठवत नाही. प्रत्येकात तिन सर्टीफिकेट प्रत्येकी १ कोटीचे आहेत असे नमुद केले परंतु दोनच सर्टीफिकेटची नोंद घेतलेली आहे. तिसऱ्या सर्टीफिकेटची नोंद नजर चुकीने माझेकडून राहीलेली असावी सदरची नोंद मी सर्टीफिकेट केलेली असेल असे मला वाटते परंतु नंतरचे सर्टीफिकेट कोणी मी जनरल मॅनेजर यांना दिले असावेत. सदरची नोंद मी कदाचित श्री दिनेश परदेशी रजेवर असताना केली असावी सर्टीफिकेट ओरिजनल होते की झेरॉक्स

165

होते ते मला आता आठवत नाही.

माझे वरील टिपण मला वाचून दाखविले ते माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे

समक्ष

पोलिस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग कुो
प्राद्द पुणे.

दिनांक ता. ८.१०.२००१ (१००) ९

माझे नांव - श्री. सुरेश शिवाजीराव काळे. वय ४३
धंदा - जनरल मॅनेजर सुवर्णयुग बँक बुधवार पेठ
पुणे. रा. ९ तरंगिणी बी-३१८ कल्याणी नगर,
सेनापती म्हात्रे पुलाजवळ पुणे.

समक्ष विचारले वरून सांगतो की, मी सुवर्णयुग सहकारी बँकेत १९७९ साली क्लार्क म्हणून नोकरीस लागलो. बढतीने जनरल मॅनेजर पदावर मार्च १९९९ साली पोचलो तेव्हापासून जनरल मॅनेजर या पदावर काम करीत आहे.

होम ट्रेड लि. श्री सुवर्णयुग सहकारी बँकेशी डिसेंबर १९९९ पासून आर्थिक गुंतवणुकीचा व्यवहार चालू झाला एप्रिल २००१ साली रिझर्व्ह बँकेकडून एस.जी.एल. चे शेअर्स व बॉंड संदर्भात खरेदी-विक्री करण्यात अशा सूचना आल्या तत्पूर्वी त्या संदर्भातील व्यवहार फिजीकल म्हणून केले जात होते. सन १९९९ साली होम ट्रेड लि. शी व्यवहार व आर्थिक गुंतवणूक करणे संदर्भात निर्णय त्यावेळेचे सुवर्णयुग सहकारी बँकेचे चेअरमन श्री. उल्हास काळोखे यांनी घेतला. सन १९९९ सालापूर्वी १९९६ पासून केतन शेठ हयाचे कंपनीशी आर्थिक गुंतवणुकीचे संबंध सुवर्णयुग सहकारी बँकेशी होते. त्यांनी होम ट्रेड लि. हया कंपनीशी गुंतवणुकीचे व्यवहार करण्याचा सल्ला दिला. व तो होम ट्रेडचा डायरेक्टर असल्याने होम ट्रेडशी व्यवहार करण्याचे ठरवले. होम ट्रेडचे वतीने प्रत्येक वेळी त्याचेशीच सल्लामसलत व त्याचेशी चर्चा होऊन गुंतवणुकीचे व्यवहार सुवर्णयुग बँकेशी होत असत. होम ट्रेडशी झालेले व्यवहाराची सर्व केतन शेठ यांचे गिल्टेज सिक्युरिटी मॅनेजमेंट लि. हया तेव्हा ताडदेव मुंबई येथूनच बहुतेक चालत असत. त्याच ऑफिस मधूनच आम्हाला पत्र व्यवहार कॉन्ट्रॅक्ट नोट्स, कागद पत्र मिळत असत. व त्याच ऑफिस मधून संपर्क करणे वगैरे चालत असत. केतन शेठ यांचेशी सन १९९६ पासून गुंतवणुकीचे व्यवहारी संदर्भात संबंध असल्याने व

तो कंपनीकडे रेकॉर्डवर आहे. असे त्याने सांगितल्याने व तसे कागदपत्रे दाखविल्याने आम्ही त्याच्या पार्श्वभूमीबाबत व त्या कंपनीबाबत खात्री व व्हेरीफिकेशन केले नाही.

तोतानशेट्टे यांचेवर फिजिकल सिक्युरिटीचे डिलरशी व्यवहार करणेचे असे. तसेच सर्व ग्राहक बँकेचे जोब त्या सिक्युरिटीवर तेथेच ट्रान्स्फर होत असत. त्याचे उदाहरण म्हणून मी सन १९९६ ते १९९९ च्या दरम्यानचे काही सिक्युरिटीचे ट्रँझॅक्शन व त्यावरील कागदपत्रे आपणास दाखवितो. फिजिकल सिक्युरिटीचे व्यवहारा संबंधातील शेअर्स, बॉण्ड्स इ. माझ्या ताब्यात कपाटात कुलूप लावून ठेवत असे. परंतु माझे अनुपस्थितीमध्ये गरज पडल्यास ड्रॉवरमधील कपाटाची चावी घेऊन इतर अधिकारी श्री. कामत, श्री. भारती, श्री. कुले हे सुद्धा घेवू शकत असे. शेअर्स व्यवहारा संदर्भात ट्रँझॅक्शन झाल्यानंतर मूळ शेअर्स, बॉण्ड्स मी माझे ताब्यात माझ्या कपाटात ठेवत असे. बॉण्ड्सवर नोटेस व इतर कागद लावून इन्व्हेस्टमेंट रजिस्टरमध्ये नोंदी घेतल्या जात. ते रजिस्टर संबंधीत इन्व्हेस्टमेंट रजिस्टर लिहिणारा क्लार्क लिहित असे व त्याचेकडेच ऑफिसमध्ये ते रजिस्टर ठेवत असून त्या रजिस्टर बँकेमधील अधिकारी श्री. कुले, श्री. भारती इत्यादि चेक करुन सह्या करत. तसेच त्या संदर्भामधील नोंदी डायरेक्ट लेजर रजिस्टरला घेतल्या जात. बँकेच्या इंटरनल ऑडिटचे वेळी ऑडिटर हे सर्व चेक करुन ऑडिट रिपोर्टमध्ये उल्लेख करीत असे. त्यावेळी जे फिजिकल शेअर्स, बॉण्ड्स असत ते चेक करुन बॅलन्स शेअर्स, बॉण्ड्सची मार्केटची किंमत इत्यादि रिपोर्टमध्ये करणेचे असे. ते शेअर्स, बॉण्ड्स ऑडिटचे वेळी ऑडिटर फिजिकली चेक करीत असत. इन्व्हेस्टमेंट रजिस्टर मधील प्रत्येक नोंद बँकेमधील डेप्युटी अधिकारी श्री. सुशील भारती अकौंट्स, श्री. राजीव कुले, अधिकारी, श्री. मनीषा सानपुरे अधिकारी हे चेक करीत असे. व सही करीत असे. व दर महा संपल्यानंतर मी स्वतः इन्व्हेस्टमेंट रजिस्टर चेक करत असे. व दर वर्षी शासकीय हिशोबाचे तपासणीस (ऑडिटर) चेक करीत असत. ऑडिटरला ऑडिट चेकींगचे वेळी लागलेला नफा (कॅपिटल गेन) दाखविलेली सरकारी गुंतवणूकीमध्ये व इतर

समक्ष
[signature]
पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे

गुंतवणूकीमध्ये असलेली रक्कम व त्यामध्ये गुंतवणूक केली त्याचा तपशील एका पाकिटावर तयार करून तो त्यांना माझे सही निशीवारीसकट दिला जात असे.

सरकारी कर्ज रोखे गुंतवणूकी संदर्भातील नोंद होमट्रेड अथवा इतर कंपनी, ब्रोकर कडून आल्यावर बँकेचे मा. अध्यक्ष यांचे आदेशानुसार, बिलानुसार चेक होम ट्रेड लि. अथवा संबंधीत कंपनीस पाठविला जातो व त्याची फोन कॉन्ट्रक्ट नोट व कर्ज रोखे बँकेस साधारणपणे ४ ते ५ दिवसात मिळत असे सदरचा कॉन्ट्रक्ट नोट त्वरीत मिळत असे परंतु कर्ज रोखे ४ ते ५ दिवसांनी त्यानंतर मिळत असत.

दिनांक १५/१२/९९ रोजी ११.५०% GOI २०१५ दर्शनी किंमत (F.V) एक कोटी ती सिक्युरिटीची खरेदी होम ट्रेड लि. कडून केली होती. ती आम्हाला मिळाली हे मी गुंतवणूक रजिस्टर पाहून सांगतो. गुंतवणूक रजिस्टरला नोंद आहे म्हणजे डिलिव्हरी झाली असा त्याचा अर्थ आहे. परंतु त्या सिक्युरिटीचे डिस्टींक्टीव नंबर लिहिले नाही. हे सिक्युरिटी तीन महिने आमचेकडे होते. तरी आम्ही डिस्टींक्टिव नंबर लिहिले नाहीत. तसेच तीन महिन्याचे कालावधीत डिस्टींक्टिव नंबर लिहिण्यासाठी सिक्युरिटी मी गुंतवणूक रजिस्टर लिहिणारे लिपिक यांचेकडे दिले की नाही हे मला आठवत नाही. Read in August

दिनांक १२/१/२००० रोजी १२.६०% GOI २०१६ दर्शनी किंमत (F.V) एक कोटी हे आम्ही होम ट्रेड लि. यांचेकडून विकत घेतले त्याची फिजिकली डिलिव्हरी झाली आहे. परंतु गुंतवणूक रजिस्टर पाहून त्याची डिलिव्हरी कधी झाली हे सांगता येणार नाही. माझेकडे सदरची सिक्युरिटी जवळ जवळ दिड महिने ताब्यात होती परंतु डिस्टींक्टिव नंबर लिहिण्यासाठी मी गुंतवणूक क्लार्क कडे गुंतवणूक रजिस्टर मध्ये

विक्रीसाठी दिली का जाती हे मला माहित नाही. परंतु आता मी गुंतवणूक रजिस्टर पाहून सांगतो की, त्यात डिस्टी. वरील नंबर लिहलेले नसल्याने सदरची सिक्युरिटी पुनर्विक्रीसाठी ठेवलेले असल्याने व बेअरर स्वरूपात असल्याने मी गुंतवणूक रजिस्टर मध्ये नोंद करण्यासाठी दिले नाहीत.

दिनांक २८.६.२००१ रोजी ११.५०%

I.D.B.I. २०१० दर्शनी किंमत तीन कोटी (प्रत्येकी बॉन्ड एक कोटी F.V चे तीन बॉन्ड) होम ट्रेड लि. कडून विकत घेतले. गुंतवणूक रजिस्टर पाहून सदर बॉन्डची डिलीव्हरी कशी झाली हे सांगता येणार नाही. एकूण तीन बॉन्ड विकत घेण्यात आले परंतु दोनच बॉन्डचे नंबर ६२४ व ६२५ फक्त गुंतवणूक रजिस्टर मध्ये लिहि. त्यात आले. ते मी आता पाहिल्यावर लक्षात आले आहे सदरचे बॉन्ड पुनर्विक्री व बेअरर असूनही तीन पैकी दोन बॉन्डचे डिस्टी. नसलेले नंबर लिहिण्यासाठी गुंतवणूक क्लार्ककडे गुंतवणूक रजिस्टर असते लिहिण्यासाठी दिले प्रत्यक्ष संबंधित क्लार्ककडे लिहिण्यासाठी बॉन्ड दिले का नाही त्यास नंतर सांगितले हे मला आता आठवत नाही.

दिनांक १५/५/२००२ रोजी १२.४०% २०१३

दर्शनी किंमत (F.V) एक कोटीची एक सिक्युरिटी होम ट्रेड लि. मार्फत खरेदी केली. सदरची डिलिव्हरी झाली परंतु ती कशी झाली हे गुंतवणूक रजिस्टर मध्ये पाहून सांगता येणार नाही. त्याचे डिस्टींक्टीव नंबर गुंतवणूक रजिस्टरमध्ये लिहिले नाहीत. पुनर्विक्री असले बेअरर स्वरूपात असल्याने लिहिले नाहीत

दिनांक ८/३/२००२ रोजी ११.५०% GOI.

२०१४ व १२.६०% GOI २०१८ दर्शनी किंमत प्रत्येकी एक कोटीचे प्रत्येकी एक सिक्युरिटी अशा एकूण दोन सिक्युरिटीज होम ट्रेड लि. विकल्या त्या दोन्हीची नोंद गुंतवणूक रजिस्टरला घेण्यात आली आहे. दि. २३/३/२००२ रोजी सदरहू त्यांची पोटीची रक्कम प्राप्त झाल्या नंतर त्यांना सिक्युरिटीज देण्यात आल्या की ठेवले नाहि त्या विषयावर अध्यक्ष व उपाध्यक्ष

समक्ष

पोलिस निरीक्षक

गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे

सुवर्णयुग सहकारी बँक लि. यांच्या सत्या मालकीचे व मंजुरी नाही दि. २२.३.२००० रोजी ११.९९% GOI २००८ दर्शनी किंमत दोन कोटी रुपयाची होम ट्रेड कडून खरेदी करण्यात आली. इन्व्हेस्टमेंट रजिस्टर डिस्टिंक्टिव नंबर BY/००११७ चे ५० लाख, BY/००११८ चे ५० लाख, BY/००१२० चे ५० लाख, BY/००१२१ चे ५० लाख चे लिहिण्यात आले आहेत. सदर सिक्युरिटीज एच.डी.एफ.सी. - स्टॉक सिक्युरिटी होल्डिंग कॉर्पोरेशनला विक्री करणे बाबतचे पत्र दि. २१/१/२००१ रोजी एच.डी.एफ.सी. बँक लि. मानेकजी वाडिया बिल्डिंग नानक मोतवानी मार्ग फोर्ट मुंबई यांना लिहिले आहे. ते समक्ष दाखविले.

दिनांक १६.५.२००० रोजी ११.४३% GOI २०१७ दर्शनी किंमत दोन कोटी रुपयांची सिक्युरिटीज होम ट्रेडने सुवर्णयुग सहकारी बँकेस विकली त्याची नोंद गुंतवणूक रजिस्टर आहे. परंतु त्याचे डिस्टिंक्टिव नंबर लिहिलेले नाहीत. तसेच दि. १६.५.२००० रोजी १२.३०% GOI २०१३ दर्शनी किंमत (F.V.) एक कोटी रुपये यांची विक्री होम ट्रेड लि. ला केली त्याची नोंद गुंतवणूक रजिस्टर आहे. त्याची डिस्टिंक्टिव नंबर लिहिलेले नाहीत दोन्ही कॉन्ट्रॅक्ट नोटवर अध्यक्ष सुवर्णयुग बँक लि. यांची मंजूर म्हणून सही आहे. पुनर्विक्रीसाठी सदरचे रोखे होते असल्याने ते लेजर असल्याने त्याचे डिस्टिंक्टिव नंबर लिहिण्यासाठी गुंतवणूक लिपिक यांना दिले नाहीत म्हणून गुंतवणूक रजिस्टर नोंद नाही.

दिनांक २१/५/२००० रोजी होम ट्रेड लि. कडून ११.५०% GOI २०१० (F.V.) दर्शनी किंमत २.५० कोटी रुपयाची सिक्युरिटी खरेदी केली त्याबाबतची नोंद गुंतवणूक रजिस्टर असून त्याचे डिस्टिंक्टिव नंबर लिहिलेले आहेत. BY-00196, BY-00197, BY-00198, BY-00199, BY-00201 असे प्रत्येकी ५० लाखाचे पाच सरकारी रोखे. बाबतची

नोंदे होगळी आहे. सदरील रोखे त्यानंतर बँकेचे नांवे एस. जी. एलद्. खात्यात वर्ग करनेत आले आहेत. त्या नंतर ते २०.२.२००९ रोजी होम ट्रेड लि. ला एस. जी. एल ने विकले त्याबाबतची कॉन्ट्रक्ट नोट बिल रेकॉर्ड असून बँकेचे अध्यक्ष श्री. उल्हास कातोरवे यांनी मंजूर म्हणून सही केली आहे.

दिनांक ६ जून २००० रोजी ११.२५% GOI २००५ दर्शनी किमंत (F.V) ५० लाख सिक्युरिटीची खरेदी होम ट्रेड कडून करनेत आली त्याची नोंदे गुंतवणूक रजिस्टर असून त्याचा डिस्ट्रीक्टीव नंबर BY-६२ असा लिहिलेला आहे. सदर व्यवहाराची कॉन्ट्राक्ट नोट बिल आहे. अध्यक्ष श्री. उल्हास कातोरवे यांची मंजूर म्हणून सही आहे.

दिनांक ६.६.२००० रोजी १०% GOI २०१८ दर्शनी किमंत १ कोटी रुपायाची सिक्यूरिटी होम ट्रेड लि. यांचेकडून एस. जी. एल. ने खरेदी केली. त्यांबाबतची नोंदे गुंतवणूक रजिस्टरला करनेत आलेली आहे. एस. जी. एल मध्ये व्यवहार आहे. त्याचे डिस्टींक्टिव नंबर लिहिले नाहीत त्याची कॉन्ट्रक्ट नोट बिल रेकॉर्डला असून अध्यक्षाची मंजूर म्हणून सही आहे.

दिनांक २०.२.२००९ रोजी ११.५०% GOI. २०१० दर्शनी किमंत २.५० कोटी रुपायाची विक्री होम ट्रेडला करनेत आली त्याची नोंदे गुंतवणूक रजिस्टरला असून त्याचे नंबर लिहिले आहेत BY००१९६, BY००१९७, BY००१९८, BY००१९९ BY००२०१ असे प्रत्येकी ५० लाख रुपायाचे पाँच असे लिहिलेले आहेत. त्याबाबतची कॉन्ट्रक्ट नोट बिल असून त्यावर अध्यक्ष श्री उल्हास कातोरवे यांची मंजूर म्हणून सही आहे.

दिनांक २०.६.२००१ रोजी ११.५०% I.D.B.I. २०१० दर्शनी किमंत (FV) ची खरेदी होम ट्रेड कडून करनेत आली त्याबाबतची नोंदे गुंतवणूक रजिस्टरला घेतली आहे.

समक्ष

पोलीस निरीक्षक

[illegible] २०१०

प्रत्येकी एक कोटी (F.V.) चे तीन बाँड असे नमुद आहे परंतू प्रत्यक्षात दोन नंबर ६२४ व ६२५ असे लिहिलेले आढळे आलेत. तिसरा नंबर कारकून (गुंतवणूक रजिस्टरच्या) यांनी का लिहिला नाही हे मला सांगता येणार नाही. सदरचे बाँड माझेकडे खऱ्या (original) स्वरूपात आले होते ते मला चांगले आठवते. ते बाँड माझ्या ताब्यात होते. तिसऱ्या बाँडच्या काय नंबर होता हे मला आठवत नाही. त्याबाबतचे कॉन्ट्रक्ट नोट दिले असेल ते पाहून मी सांगतो. त्यावर अध्यक्ष श्री. उल्हास कातीरके व श्री उल्हास भट उप अध्यक्ष यांची मंजूरी म्हणून सही आहे. गुंतवणूक रजिस्टरमध्ये चे क्लार्क अथवा इतर कारकून यांना त्यावेळी मी बाँडच्या नंबर देऊन गुंतवणूक रजिस्टरला लिहिण्यास सांगितले होते. तरीही मी सांगून नंबर लिहिण्यास सांगितले. अमर शेटे नावाचे कारकून यांनी तीन बाँडचे नंबर सांगितले असता दोनच बाँडचे नंबर लिहिले.

दिनांक १.८.२००९ (२००९) रोजी १०.६५% I.C.I.C.I २०२६ दराने किंमत १ कोटीचे दोन बाँड एम टू एम कडून खरेदी (दोन कोटीचे) केले. गुंतवणूक रजिस्टरला त्याबाबतची नोंद आहे. परंतू बाँड नंबर अथवा सर्टीफिकेट नंबर लिहिलेले आढळत नाही. त्याबाबतची कॉन्ट्रक्ट नोट कोठे आहे. ते पाहून मी सांगतो. त्यावर मंजूर म्हणून बँकेचे अध्यक्ष श्री. उल्हास कातीरके व उपअध्यक्ष श्री. उल्हास भट. यांची सही आहे. सदरील बाँड बाबतचे सर्टीफिकेट नंबर ५ व ६ च्या झेरॉक्स प्रती ओरिजिनल वरून काढलेल्या आहेत. सर्टीफिकेटचे पाठीमागील भागावर ट्रान्सफरची जागा आहे. एक नंबर कॉलम खाली चेअरमन व मॅनेजिंग

डायरेक्टर सावंत कंटा डिस्ट्रीक सेंट्रल को. ऑप. बँक लि यांचे समक्ष नमूद करून त्यांच्या सह्या आहेत.

तसेच त्याच बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर यांनी दिनांक ५/२/२००१ रोजी मिटिंग घेऊन रिझोल्यूशन नंबर ११ चा सर्टिफाईड कॉपीची झेरॉक्स आहे त्या सोबत I.C.I.C.I चे दोन नोटिफिकेशन ऑफ सेंडर फॉर्मवर साबरकंठा डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. हेड ऑफिस स्टेशन रोड हिम्मत नगर साबरकंठा असा शिक्का असून नेमस ऑफ ऑथोराईझड सिग्नेटरीज म्हणून श्री. अमीचंदभाई पटेल चेअरमन व रमेशभाई मगनभाई पटेल डायरेक्टर असे स्वाक्षरी कॉलममध्ये लिहून त्यांच्या सह्या आहेत. यामध्ये ट्रान्सफरमेंटचे कॉलम कोरे आहेत. आमच्याकडे आलेले I.C.I.C.I चे दोन्ही सर्टिफिकेट नंबर ५ व ६ ओरिजिनल होते. हे मला चांगले आठवते सदरचे सर्टिफिकेट कॉन्ट्रॅक्ट नोट्स आल्यानंतर काही दिवसांनी होम ट्रेडकडून प्राप्त झाले होते.

त्यानंतर दिनांक ३० जानेवारी २००२ रोजी होम ट्रेड लि. ने सुवर्णयुग सहकारी बँकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे रोखे खरेदी करण्याचा प्रस्ताव लेखी पाठविला तो प्रस्ताव श्री. उल्हास काळोखे व उपाध्यक्ष श्री. डाहाके यांनी मान्य केला. त्यावर प्रत्यक्ष सही उपाध्यक्ष यांनी केली त्या प्रस्तावानुसार बँकेकडे असलेले ११.५०% I.D.B.I. २०१० प्रत्यक्ष दर्शनी किंमत ३ कोटी रुपये १०.६५% I.C.I.C.I २००६ दर्शनी किंमत दोन कोटी रुपये (प्रत्येकी एक कोटीचे दोन) होम ट्रेड लि. ने सुवर्णयुग बँक लि. कडून खरेदी केले व त्या रकमेपोटी १३.५०% महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

समक्ष
पोलिस निरीक्षक
आर्थिक गुन्हे शाखा

पान नंबर ५ (१०८) ५

२०१० दर्शनी किंमत ५ कोटी रुपये बॅंकेस विकले व त्यांचे खरेदीची रक्कम रु. ८८५.९७ बॅंकेस मिळाले I.C.I.C.I व I.D.B.I चे बॉंडस् / सर्टीफिकेट होम ट्रेड लि. ला दिले व त्याचेवेळी सुवर्णयुग सहकारी बॅंकेस महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे ॲलॉटमेंट लेटर सह डिस्टींक्टीव्ह नंबर ०२८८६००१ ते ०२८८६१०० (१००), ०२८८६१०१ ते ०२८८६२०० (१००), ०२८८६२०१ ते ०२८८६३०० (१००), ०२८८६३०१ ते ०२८८६४०० (१००), ०२८८६४०१ ते २८८६५०० (१००) चे सर्टीफिकेटस् बॅंकेस प्राप्त झाले. त्याबाबतची नोंदे इनवर्ड रजिस्टरला घेण्यात आली. डिस्टींक्टीव्ह नंबरची नोंद ही घेण्यात आली तर नमुद प्रमाणे. त्याबाबतचे कॉंट्रक्ट नोट व बिल झालेले मी पाहुन सांगतो की, कॉंट्रॅक्ट नोटवर अध्यक्ष श्री उल्हास चोरघडे व उपाध्यक्ष उल्हास भट यांची सही आहे. तर बिलावर उपाध्यक्ष उल्हास भट यांची सही आहे.

दिनांक २०.२.२००२ रोजी होम ट्रेड लि. यांनी पुर्वी सादर केलेल्या प्रस्तावा प्रमाणे कॉंट्रॅक्ट केले की होम ट्रेड लि. यांनी ८.०७% GOI २०१७ दर्शनी किंमत ५.२५ कोटी रुपये चा रोखा सुवर्णयुग सहकारी बॅंकेस विक्री करुन त्या रक्मेपोटी सुवर्णयुग बॅंकेकडे असलेला महाराष्ट्र जिवन प्राधिकरणचे १३.५०% MJP २०१० दर्शनी किंमत ५ कोटी रुपयेचे होम ट्रेड लि. ने खरेदी केले त्या संदर्भातील कॉंट्रक्ट नोटवर सुवर्णयुग सहकारी बॅंकेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची मंजुरी म्हणून सही आहे. व बिलावर उपाध्यक्ष श्री उल्हास भट यांची सही आहे सदर बाबत गुंतवणूक रजिस्टरला नोंदे घेण्यात आली आहे. कॉंट्रक्ट झाल्यानंतर सुवर्णयुग बॅंकेने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे रोखे सर्टीफिकेट नंबर ०२८८६००१ ते ०२८८६५०० असे ॲलॉटमेंट लेटरसह दि. २५.२.२००२ रोजी होम ट्रेड लि. चे प्रतिनिधी यांना दिले. ||

सदर प्रतिनिधीची नारखेडेंनी शुल्कबुक रजिस्टरला सही झाले. त्याचे नाव मला माहित नाही. परंतु ते आल्यावर होमट्रेड लि. शी झालेल्या व्यवहारानुसार सदर शुल्कबुक रजि. सदर लिहिणारे लिपिक यांना अकौंटंट खाली मोकळी जागा ठेवण्यास सांगितले. परंतु होम ट्रेड लि. कडून सुवर्णयुग बँकेस पाठविल्यानंतर बऱ्याच दिवसांनी प्रथम रिझर्व्ह बँकेची रिसीट पाच कोटीची व त्यानंतर ८.०७% GOI २०१७ चे प्रत्येकी एक कोटी (F.V.) दर्शनी किंमतीचे पाच फेडरल बँकेच्या रोख्याचे झेरॉक्स प्रती पाठविल्या. ते मान्य न झाल्याने व आम्ही ओरिजिनल रोखे पाठवण्यास तगादा लावल्याने व ५.२५ कोटीचे ऐवजी पाच कोटीचेच रोखे तेही झेरॉक्स दिल्याने त्याचे निदर्शनास वारंवार आणून दिल्याने त्यांनी नवीन प्रस्ताव मांडला तो असा की ८.०७% GOI २०१७ दर्शनी किंमत ५.२५ कोटीचे ओरिजिनल रोखे मिळण्यास विलंब लागेल म्हणून त्याऐवजी ८.४०% २०१० चे व दर्शनी किंमत ५ कोटीचे एक व ००.६५ कोटीचा दुसरा असे एकूण ५.६५ कोटीचे होम ट्रेड लि. ने सुवर्णयुग बँकेस देण्याचा प्रस्ताव मांडून कबूल केले त्याप्रमाणे कॉन्ट्रॅक्ट नोट बिल दि. २८.३.२००१ रोजी देऊन कॉन्ट्रॅक्ट नोट व बिल सुवर्णयुग बँकेस दिले. सुवर्णयुग बँकने होमट्रेड लि. ने यापूर्वी दिलेले कॉन्ट्रॅक्ट नोट अनुसार ८.०७% GOI २०१७ दर्शनी किंमत ५.२५ कोटीचे. ऐवजी फेडरल बँकेच्या एक कोटी दर्शनी किंमतीच्या वर उल्लेखीत केल्याप्रमाणे च्या पाच झेरॉक्स प्रती रिझर्व्ह बँकेच्या झेरॉक्स रिसीट रद्द असतानाही आमचे बँकेच्या रेकॉर्डला ठेवली कॉन्ट्रॅक्ट नोटवर सुवर्णयुग बँकेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष श्री उल्हास काळोखे व श्री उल्हास भट यांच्या समक्ष आणले व त्यावर उप अध्यक्ष श्री उल्हास भट यांनी सही आहे. ते पाहून मोठ खूण सांगतो त्यानंतर वारंवार तगादे करून समक्ष होम ट्रेड लि. कार्यालयात संजय अग्रवाल व केतन शेठ यांना

समक्ष
[signature]
पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग [illegible]

पान नंबर ६ (९०८)

मी स्वतः व चेअरमन श्री० उल्हास काळेखे उर्फ वासी मुंबई याठिकाणी जाऊन भेटलो व रु. ५०% ऐकी २०१० दराची किंमत ५ कोटी ६५ लाखाचे खरेदी देण्या बाबत आग्रह धरला त्यांनी लवकरात लवकर देण्याचे कबूल केले. परंतु ते न दिल्याने आम्ही दि. २२.७.२००२ रोजी रितसर कायदेशीर नोटीस होम ट्रेड ला दिली. व खाजगी फौजदारी दावा मा. ड्युटी मॅजि. साहेब वर्ग १ ज्यु. मी. कोर्टात दि. २९।८।०२ रोजी भा. द. वि. कलम ४०६, ४६०, ४२०, ३४ प्रमाणे केस दाखल केली. सदर केसचा नंबर १३८/०२ असा आहे. तरी परंतु अद्याप पावेतो होम ट्रेड लि. यांनी ५.६५ कोटीचे शेअर्स सुवर्णयुग सहकारी बँकेला दिले नाहीत सुवर्णयुग बँकेने मात्र होम ट्रेडचे प्रतिनिधीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे शेअर्स गुंतवणूक रजिस्टरला सही करून दिले आहेत. यापूर्वी इतर कोणत्या कंपनीचे प्रतिनिधीस अथवा होम ट्रेडचे प्रतिनिधीस गुंतवणूक रजिस्टरला सही करून इतर कोणतेही शेअर्स, बॉंड, सर्टिफिकेट दिलेले नाहीत. इतर शेअर्स, बॉंड्स सर्टिफिकेट्स कशा रितीने बँकेकडून संबंधित कंपन्या होम ट्रेड लि. इत्यादींना देण्यात आले यांची पूर्ण माहिती काढून मी उद्या रोजी माहिती देतो. तसे पुस्तक डिस्पॅच बुक इत्यादी मिळून आल्यास हजर करून दाखवितो आज दि० ७।१०।२००२ रोजी मी डिस्पॅच बुक इत्यादी मिळून आले नाही. नंतर आणून दाखवितो.

आता मी सुवर्णयुग सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष श्री. उल्हास काळेखे यांचे उपस्थितीत सांगतो की - होम ट्रेड लि. चा संचालक व ब्रोकर

केतन शाहे यांची ओळख मी डेव्हीस कावळे यांचेशी ते बँकेचे चेअरमन पदी होते तेव्हा ओळख करुन दिली आहे. त्यांची केतन शाहेशी माझ्या समक्ष ओळख बँकेमध्ये झाली आहे. व त्यांचेशी सरकारी कर्जरोखे बॉंड याचे खरेदी विक्री संदर्भात बोलणेही झाले आहे. होम ट्रेड लि. यांचे बरोबर गुंतवणूकीचे व्यवहार सुरु करण्यापूर्वी त्यांनी माझेकडे तसेच केतन शाहेकडे चौकशी केली व त्यापुढे प्रत्येक वेळी त्यांचेशी व्यवहार करण्यापूर्वी व गुंतवणूक करण्यापूर्वी ते होम ट्रेड लि. किती व्याज देईल त्याचेकडून बँकेस किती लाभ होईल. बँकेकडे गुंतवणूकीस पैसे आहेत काय याबाबत चौकशी करणे असत त्यानंतर निवेल हामले सरकारी रोखे बॉंड्स बँकेस मिळाले का हे पण विचारत. त्याप्रमाणे आलेले रोखे बॉंड्स डावल-डावल प्रत्येक वेळी मी त्यांना दाखवित असे त्यांचेच आदेशान्वये सुचनेनुसार गुंतवणूक रोखे व बॉंडची खरेदी विक्री होम ट्रेड लि. इत्यादींबरोबर बँकेचे कार्यालयाने केलेली आहे.

व्हाईस चेअरमन याचे बरोबर मी सरकारी रोखे व बॉंडचे गुंतवणूकी संदर्भात व खरेदी विक्रीच्या संदर्भात कधीतरी चर्चा केलेली नाही. व्हाईस चेअरमन श्री. उल्हास भट यांच्या सह्या होम ट्रेड लि. याचे बरोबर जे गुंतवणूकीचे व्यवहार व रोखे, बॉंडची खरेदी विक्री झाली. त्यांचे कॉन्ट्रॅक्ट नोट व बिल यावर त्यांच्या सह्या आहेत.

होम ट्रेड लि. शी सुवर्णयुग सहकारी बँकेशी २५ वेळा सरकारी रोखे, बॉंडचे खरेदी विक्रीचे व्यवहार झाले परंतु केवळ ५-६ वेळाच गुंतवणूक रजिस्टरला डिस्टीवहोल्ड नोंद लिहिले आहे त्याचे कारण

समक्ष

(सही)

पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा. पुणे

पान नंबर ७

मी सांगू शकत नाही: सरकारी रोखे, बॉंडस् आम्ही विकताना पेपरवरुन दराची खात्री करुन विक्री करित होतो. परंतु त्यांचेकडून प्रस्ताव लवकर आल्याने व कॉन्ट्रॅक्ट नोटस् विक्री करण्याचे निश्चित झाल्यावर त्यांचेकडून चेक आल्यावर मगच सिक्युरीटी देत होतो. सरकारी रोखे व बॉंडस् दिल्यावर त्याचे प्रतिनिधी वाकून त्यावर अथवा डिस्पॅच बुकवर कधीही सही घेतलेली नाही. फक्त एकदाच गुंतवणूक रजिस्टर मध्ये महाराष्ट्र शिवनचे रोखे रामहूद दि. ला दिल्यावर सही घेतली आहे.

माझेकडे I.D.B.I, ICICI महाराष्ट्र प्राधिकरणचे आलेले बॉंड सर्व ओरिजनल होते सरकारी रोखे, बॉंड, मी स्वतः कपाटात कुलुपात ठेवत असे. सदरचे सरकारी रोखे व बॉंड मी जनरल मॅनेजर असताना वरुन मासेच ताब्यात ठेवत असे. त्यामुळे गुंतवणूक रजिस्टरला त्याचे डिस्टिंक्टिव्ह नंबर लिहिण्याचे राहिले असावेत

बँकेने सरकारी रोखे/बॉंडस् कोणाला दिले कोणाकडून आले, घेतले कधी आले, कधी दिले याबाबतचे डिस्पॅच बुक (पोच पुस्तिका) सन १९९९ पासून नाहीत.

चालू वर्षी मे महिन्यात रिझर्व्ह बँकेचे ऑडीट लागले तेव्हा व्हाईस चेअरमन भट यांच्या सहीच्या कोऱ्या लेटरवर घेतल्या असल्याने बँकेचे अधिकारी कुलै यांनी ऑडिट वेळी त्रुटींची पूर्तता करणेकामी घेतले असावेत.

माझे जबाब मला वाचून दाखवलेले माझे सांगणे प्रमाणे लिहिलेले आहे

सही सायने

समक्ष

पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग म.रा. पुणे

टिपण दि. ८.१०.२००२ (११२)

मी - उल्हास नथोबा काळोखे वय - ५५ वर्षे
धंदा - समाजकार्य रा. इंदिरा हौ. सोसा, सेनापती
बापट रोड, शिवाजीनगर, पुणे - १६

समक्ष विचारले वरुन पुन्हा सांगतो की मी किर्लोस्कर ऑईल इंजिन, खडकी, पुणे शहर येथे १९६४ सालापासून टर्नर म्हणून नोकरीस लागलो. व सन २००१ पर्यंत तेथेच नोकरीस होतो सन २००१ साली मी व्हॉलंटरी रिटायरमेंट घेतली माझे शिक्षण जुनी मॅट्रीक मराठी मिडीयम मधुन सन १९६४ साली झाले इंग्रजी विषय घेतलेला नव्हता. मला इंग्रजी लिहीता-वाचता येत नाही

मी सुवर्णयुग सहकारी बँकेचे सदस्य म्हणून १३ वर्षांपासून आहे. सन १९९२ साली मी डायरेक्टर झालो. तेंव्हा पासून मी संचालक मंडळाचे बोर्डवर आहे. सप्टेंबर १९९९ पासून मी सुवर्णयुग सहकारी बँकेचा चेअरमन आहे.

मी चेअरमन झालो तेंव्हा ठेवीदारांच्या ठेवी मोठ्या प्रमाणात बँकेत होत्या. म्हणून ऑफीस मधील जनरल मॅनेजर श्री सुरेश काळे हे मला व संचालक मंडळाला म्हणाले की, विनाकारण ठेवी पडून आहेत, कर्ज घ्यायला लोक कमी प्रमाणात येत आहेत, तरी आपण सरकारी कर्ज रोखे बॉन्ड्स मध्ये पैसे गुंतवले तर बँकेस फायदा होईल. सरकारी रोखे म्हणजे नक्की काय? हे मला माहीती नव्हते परंतु त्यात सरकारी शब्द आल्याने शंका घेण्यास काही कारण नाही व त्यात फायदाच होईल असे वाटले तसेच मला व संचालक मंडळाला आमचे बँकेचा ब्रोकर होम सेठ हा सेबी मान्यता प्राप्त व स्टॉक एक्सचेंजची त्यास मान्यता असल्याने व तो १९९६ सालापासून बँकेचा ब्रोकर आहे. असे सांगितल्याने त्याचे बाबत शंका वाटली नाही

173

प्रत्यक्षात कोतन रोखे एकदाच ऑफरती आम्ही जनरल मॅनेजर यांनी करून दिली होती. परंतु तो कोतन रोखे आहे हे प्रत्यक्ष मी एप्रील २००२ मध्ये वाशी येथील होमट्रेड ली. चे ऑफीस मध्ये बँकेस देणे असलेले रोखे त्वरीत द्यावेत म्हणून सांगण्यासाठी जनरल मॅनेजर बरोबर गेलो. तेव्हा ते कोतन रोखे आहे हे माहीती झाले.

जनरल मॅनेजरचे सल्ल्यावरून व बँकेचा फायदा होता म्हणून सुवर्णयुग बँकेने होमट्रेड ली. बरोबर सरकारी रोखे, बॉन्डचे खरेदी विक्री व्यवहार चालू केले. कोतन रोखे हा बँकेच्या जुन्या ब्रोकर मुळे होमट्रेड शी व्यवहार चालू केले आहेत, असे जनरल मॅनेजरने सांगितले. होमट्रेड बरोबर सुवर्णयुग बँकेशी जो व्यवहार झाले त्या संदर्भातील आता मला कॉन्ट्रॅक्ट नोट व बील दाखवलेले त्यावर मंजुर म्हणून छापा व त्याखाली अध्यक्ष असे लिहीलेले ठिकाणी माझ्या सह्या आहेत. त्या सह्या मीच केलेल्या आहेत. जनरल मॅनेजर हे अध्यक्ष व मंजुर असा शिक्का मारलेले कॉन्ट्रॅक्ट नोट बील इत्यादी माझे समोर सहीसाठी ठेवीत. त्यात लिहीलेला इंग्रजी मजकूर मला समजत नसे. विश्वासाने मी त्यावर सह्या करीत असे.

कॉन्ट्रॅक्ट नोटसवर माझ्या मराठीतून सह्या असत. परंतु विकत घेतलेले सरकारी कर्ज रोखे, बॉन्डस् कुठे कोणाकडे ठेवले जात व विकल्यावर कोण कोणा मार्फत कशारितीने दिले जात हे मला काही माहीती नसे.

दिनांक २३-८-२००१ ला संचालक मंडळाची सभा होऊन उप जिल्हाधिकारी दौलतराव देसाई यांचे उपस्थितीत माझी सुवर्णयुग सहकारी बँक ली. च्या चेअरमन पदी व उल्हास भट यांची व्हाइस चेअरमन पदी निवड झाली.

दिनांक ५-९-२००१ रोजी संचालक मंडळाची सभा झाली. त्याचा वृतांत आता मला दाखविला, त्या मी पाहीला तो मराठीतून लिहीलेला असून त्यावर माझी, व्हाईस चेअरमन व सरव्यवस्थापक यांच्या सह्या असून सभेचा इतिवृतांत वाचून

समक्ष
(सही)
पोलीस निरीक्षक
आं.प.वि.पथक, गुन्हे शाखा, पुणे

पुरवणी - श्री उल्हास नथोबा काळोखे यांचे दि. ८.१०.२००२ चे तपास टिपणा लगतची ② असे. (११३) २

कायम बोला असे नमुद झालेल्या ठिकाणी खाली सह्या आहेत

सदर सभेच्या वृतांतात सरकारी कर्ज रोखे, बॉन्ड इ. खरेदी विक्रीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. सरव्यवस्थापक यांच्याकडे राहतील इ. नमूद आहे. तसेच विषय वृतांत १६ मध्ये सरकारी कर्ज रोखे मधील गुंतवणूकीस मान्यता देणे, असे नमूद करुन खरेदीच्या एकूण १४ पैकी तीन फिजीकल व विक्रीच्या बारा व्यवहारांना मान्यता दिल्याचे नमूद आहे.

तसेच आत्ता मला नागरी सहकारी बँकेचे आदर्श पोटनियम सुवर्णयुग सहकारी बँकेचे दाखविले. हे मी वाचलेले नाही

आत्ता मला आपण सांगितले की, व्हाइस चेअरमन उल्हास मत यांनी आपणास सांगितले आहे की, त्यांनी चालू वर्षाच्या मे महिन्यापर्यंत कधीही गुंतवणूकीच्या व्यवहाराच्या संदर्भात होम ट्रेड अथवा कोणत्याही आर्थिक संस्थेकडून झालेल्या कोणत्याही रोखे, बॉन्ड खरेदीचे प्रस्तावावर कॉन्ट्रॅक्ट नोट अथवा बीलावर सह्या केलेल्या नाहीत. चालू वर्षाच्या मे महिन्यात फक्त त्यांनी रिझर्व बँकेचे इन्स्पेक्शन चालू होते तेव्हा सुवर्णयुग बँकेचे अधिकारी श्री फुले हे आले व म्हणाले की ऑडीटर खान यांनी जनरल मॅनेजर सुरेश काळे यांना सांगितले आहे की, होमट्रेड बरोबर व्यवहार झालेले काही प्रस्ताव, कॉन्ट्रॅक्ट नोट बीलावर सह्या व्हाइस चेअरमन यांच्या घ्या, म्हणून त्यावर व्हाइस चेअरमन यांनी सह्या केल्या, ही गोष्ट आपणास माहीती आहे काय या बाबत मला काही एक माहीती नाही. मी जनरल मॅनेजर यांनी माझ्या समोर ठेवलेल्या प्रस्तावावर, कॉन्ट्रॅक्ट नोटवर व बीलावर त्या त्या वेळी होमट्रेड ली. बरोबर सुवर्णयुग बँकेने

१७४

जो सरकारी रोखे बॉन्ड इ.च्या खरेदी - विक्रीच्या व्यवहार केला त्यावर मी त्या त्या वेळी अथवा थोड्याशा विलंबाने त्यावर सह्या केल्या आहेत. त्या त्या वेळी जनरल मॅनेजरनी त्यात बँकेचा फायदा आहे. असे सांगितले.

काही कॉन्ट्रॅक्ट नोट, बील व प्रस्ताव मला आत्ता आपण दाखविले. त्यावर माझ्या सह्या नाहीत, याबाबतची चूक जनरल मॅनेजर श्री सुरेश काळे यांची आहे. विशेषता होमट्रेड बरोबर झालेल्या व्यवहारच्या अनुषंगाने काही कॉन्ट्रॅक्ट नोट, बीले व प्रस्तावावर त्यांनीच माझ्या सह्या घेतल्या नाहीत.

ज्या ज्या वेळी होमट्रेड लि. बरोबर बँकेचे सरकारी रोखे बॉन्डस यांची खरेदी विक्री झाली, त्यासाठी बँकेचे संचालक मंडळाची मान्यता घेतली आहे.

३० मार्च २००२ रोजी विकत घेतलेले पाच कोटी पासष्ट लाख रुपयांचे सरकारी रोखे अद्याप बँकेला मिळाले नाहीत म्हणून दिनांक २० एप्रीलच्या आसपास जनरल मॅनेजरनी मला सांगितले. हे ऐकून मला जबरदस्त मानसिक धक्का बसला. यामुळे मी जनरल मॅनेजर श्री सुरेश काळे यांना घेऊन वाशीच्या होमट्रेड ऑफीसमध्ये संबंधितांना (केतन सेठ) यांना भेटलो. हि माझी त्या ऑफीसमधील पहीलीच भेट. त्यांनी सांगितले की दुसरे दिवशीच आम्ही रोखे पाठवतो. त्यानंतर 22.४.2002 रोजी संचालक मंडळाची तातडीची बैठक बोलावली. व त्या रोखे व्यवहारामध्ये बँकेची फसवणूक झाली, ह्याची सर्वांना कल्पना दिली. संचालक मंडळाने त्यावर एक मताने निर्णय घेतला की, बँकेचे कायदेशीर सल्लागार ॲडव्होकेट सुर्जेकर यांचेमार्फत कायदेशीर नोटीस होमट्रेड ला त्वरीत पाठवावी, असा निर्णय झाला. दुसरा निर्णय असा झाला की, ह्या प्रकरणी अंतर्गत लेखा परिक्षक शेवरे साने व जेष्ठ संचालक शंकरराव सुर्यवंशी यांची द्वीसदस्यीय समीती नेमण्यात आली. दि. २३ एप्रील रोजी ॲडव्होकेट सुर्जेकर यांच्या मार्फतीने समक्ष व रजिस्टर पोस्टाने कायदेशीर नोटीस पाठविली. मुदतीत उत्तर न दिल्याने दि. २६ एप्रील रोजी पुन्हा संचालक मंडळाची तातडीने मिटींग बोलावली. व त्यावर ॲडव्होकेट श्री. पी. नारायण

समक्ष
[signature]
पोलीस निरीक्षक
[illegible] पथक, गुन्हे शाखा, पुणे

पुरवणी - श्री उल्हास नथोबा काळे यांचे दि. ८.१०.२००२ रोजी चे तपास टिपणा लगतची (२) असे (११२)

यांचे वतीने खाजगी फौजदारी दावा दाखल करावा. तसेच दिवाणी दावा दाखल करावा असे ठरले, त्याच प्रमाणे रिझर्व बँकेला व सहकार खात्याला लेखी फसवणूक झाल्याबाबत त्वरीत कळवावे. त्याच प्रमाणे त्वरीत कारवाई करण्यात आली.

सुवर्णयुग सहकारी बँकेच्या सरकारी रोखे, बॉन्डस इ. मध्ये एकूण ३५ कोटी ५० लाखांची गुंतवणूक झाली, त्यापैकी पाच कोटीचे आसपास फक्त गुंतवणूक होमट्रेड लि. यांच्यामार्फत केतन सेठ ह्या बँकेच्या ब्रोकर मार्फत त्यांच्या वरील विश्वासाने करण्यात आली. याची शिफारस संचालक मंडळाला कारकून ते जनरल मॅनेजर ह्या पदावर पोहचलेल्या व बँकेत २५ वर्षा-पासून नोकरीस असलेल्या श्री काळे यांनी केली होती. त्यामुळे जनरल मॅनेजर यांनीच व्यवहार काटेकोर पणे, दक्षता घेवून हाताळण्याची पूर्ण जबाबदारी होती.

मी सन १९९९ मध्ये सुवर्णयुग सहकारी बँकेचा चेअरमन झालो. तेंव्हा बँकेत एकूण ठेवी ७१ कोटींच्या होत्या. मी, संचालक मंडळाने सहकार्य घेवून प्रशासकाची नेमणूक होण्याचे आगोदर पावेतो २०४ कोटींच्या ठेवी होत्या. माझ्या अथवा माझ्या नातेवाईकांच्या नावाने कर्ज घेतलेले नाही, अथवा कोणीही नातेवाईक बँकेत नोकरीस लावलेला नाही.

आता मला आपण सन १९९९ - २००० च्या दरम्यानचा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ सहसंस्था फिरते पथक श्री. बी. एन महाजन यांनी केलेल्या वार्षिक तपासणीच्या अहवाल मधील गुंतवणूक शिर्षकाखाली दोन रोख्यांच्या संदर्भात - गुंतवणूकीच्या पावत्या दप्तरी नाहीत, असा उल्लेख आहे. तो दाखवला तो वाचला, त्याबाबत माझे म्हणणे असे की, रोख्यांच्या पावत्या ठेवणे, त्या संदर्भातील काम पहाणे हि जबाबदारी सरव्यवस्थापक श्री सुरेश काळे यांची आहे. त्यांनी अहवालात नमुद केल्या प्रमाणे सदरचे रोख्यांची पावती आहे नाही हे मला व संचालक मंडळाला कधी सांगितले नाही. सरव्यवस्थापक यांची तसेच सर्व

संचालक मंडळाची सरकारी रोखे / बॉन्डस ची खरेदी विक्री व इतर बँकेचे व्यवहार याबाबत सामुदायीक जबाबदारी आहे. दिनांक २६.४.२००२ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये पुढील व्यवहाराची जबाबदारी माझी आहे, असे मला नमुद करावयचे होते.

चार्टर्ड अकाउंटंट श्री साने यांनी सन 2002 साली बँकेचे इंटरनल ऑडीट केले. त्याबाबतचा अहवाल झालेला आहे. परंतु इंग्रजीत असल्याने, त्यात काय नमुद आहे हे मला सांगता येणार नाही.

दिनांक ६.६.२००१ रोजीचे जावक क्रं. १३०/२००१-चे सुवर्णयुग सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक यांनी सर्व बँकांनी सरकारी कर्ज रोखे गुंतवणूक व्यवहार फिजीकल मध्ये न करता एस जी एल खात्यातून करावेत असे रिझर्व बँकेने बंधनकारक केले आहे. ह्या बाबतचे झेरॉक्स पत्र माझे नावाने संबोधित करून त्यावर त्याची सही असलेले मला आता वाचून दाखविले व वाचून पाहीले. त्याबाबतचे माझे म्हणणे की हे पत्र त्यांनी मला कधीही दिले नाही. संचालक मंडळाला समोरही ठेवले नाही. माझी त्यावर पत्र मिळाल्या बाबत स्वाक्षरी नाही.

दिनांक २५.११.१९९९ ला जावक क्रं.३३०/९९-२००० अन्वये श्री सुरेश शिवाजीराव काळे, १ एरंडवणा बी २/९ कल्पना नगर सोसायटी, पुणे यांना त्यांचे सुवर्णयुग सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक या पदी नेमणूकीचे पत्र माझ्या सहीने दिलेले आहे. हे आत्ता मी त्या पत्राची झेरॉक्स पाहून सांगतो. ते पत्र सुवर्णयुग सहकारी बँकेचे लेटर पॅडवर टंकलिखीत केलेले आहे. कार्यालयाने मसुदा तयार करून व्यक्तीशः मी बोलला नाही. अथवा मी सांगितला नाही. तो स्वतः काळे यांनीच केलेला आहे. मी फक्त सही केलेली आहे. मुद्दा क्रं.४ ज्यात नमुद आहे की, आपली नियुक्ती पोटनियम क्रं. ४०(अ) मधील मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून होणार नाही. याचा कायदेशीर अर्थ मला सांगता येणार नाही.

दिनांक ५-९-२००१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील मंजूर क्रं. ३९५१ ची खरी नक्कल विषय क्रं. ३ अधिकारी वर्ग व संचालक समीती यांना योग्य निर्णय घेण्याचे अधिकार देणे

समक्ष
(signature)
पोलीस निरीक्षक
गु.प्र.वि. पथक, गुन्हे शाखा, पुणे

पुरवणी - श्री. उल्हास नथोबा काकोरे यांचे दि. ८.१०.२००२ रोजीचे तपास लिपणा लगतची ③ असे (११३) ४

(५) उपलब्ध निधीचे सुयोग्य व्यवस्थापन गुंतवणूक बाबतचे निर्णय घेण्या बाबत ठराव आपल्या बँकेच्या ठेवीचा वेग मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. त्या प्रमाणात कर्जातील वाढ तातडतोब होत असते. त्यामुळे अतिरिक्त निधीचा प्रश्न निर्माण होतो. ह्या संदर्भात सरकारी कर्ज रोखे, बॉन्डस इ. खरेदी विक्रीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, मा. सरव्यवस्थापक यांचेकडे राहतील याबाबत कार्योत्तर मंजूरी व माहितीसाठी संचालक मंडळाचे पुढील सभेत ठेवण्यात यावे, असे ठरविण्यात आले. ठराव सर्वानुमते मंजूर झाला, अशा प्रकारचा ठराव मा. सरव्यवस्थापक यांनी संचालक मंडळा समोर ठेवला. त्याची घोडक्यात माहीती वर नमूद केली आहे. व त्याची झेरॉक्स प्रत आपणास आज दिली आहे.

दिनांक २८.४.२००२ रोजी अध्यक्ष, संचालक मंडळ सुवर्णयुग सहकारी बँक यांचे नावानी संबोधित केलेली २२.४.२००२ रोजी संचालक मंडळाने नेमलेल्या त्रिसदस्यीय समीतीचा अहवाल जोड संचालक शंकरराव सुर्यवंशी यानी सादर केलेल्या अहवालाची एक पानी झेरॉक्स प्रत आज आपणास दिली.

दिनांक २.५.२००२ रोजी मी व सरव्यवस्थापक श्री सुरेश काळे यानी दोघांच्या सहीने चीफ जनरल मॅनेजर रिझर्व बँक ऑफ इंडिया सेंट्रल ऑफीस अर्बन बँक डिपार्टमेंट पहिला मजला, गारमेंट हाऊस, वरळी मुंबई याना दि. २.५.२००२ रोजी पत्र पाठविले व त्यांच्या प्रती चीफ जनरल मॅनेजर रिझर्व बँक ऑफ इंडिया मुंबई रिजनल ऑफीस अर्बन बँक डिपार्टमेंट, वरळी मुंबई याना व कमिशनर फॉर कोऑपरेशन ~~अॅण्ड~~ अॅण्ड रजिस्ट्रार कोऑपरेटिव्ह सोसायटीज एम एस (अर्बन बँक डिपार्टमेंट) पुणे यांना सादर केल्या. सदर

पंजाब नॅशनल बँकेची होम ट्रेड लि. यांनी रु. ५,६४,००,०००/- ची फसवणूक करून अपहार केल्याची माहीती दिली. सदर जबाब इंग्रजीतून लिहीलेला आहे.

माझा हा जबाब मला वाचून दाखविला व मी सुद्धा वाचून पाहीला, तो बरोबर आहे.

म्हणून माझी सही

समक्ष

पोलीस निरीक्षक
अंमली पदार्थ विरोधी पथक
गुन्हे शाखा, पुणे शहर.

No Role Shareholder Director of the Bank.

टिपण दिनांक ८-१०-२००२ (११४)

मी :- उल्हास महादेव भट वय-४७ वर्षे धंदा-व्यापार

रा० फ्लॅट नं० ३, २७/क/२ बुधवार पेठ, पुणे-२

पुन्हा समक्ष विचारले वरून सांगतो की, मी वरील नमूद ठिकाणी राहतो व माझे स्टेशनरी सप्लायर व गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर चे काम करित असतो.

सुवर्णयुग सहकारी बँकेचा सभासद म्हणून मी सुमारे २० ते २२ वर्षा पासून आहे. सन १९९२ साली मी सुवर्णयुग सहकारी बँकेचा डायरेक्टर म्हणून निवडून आलो. त्यानंतर मी सन १९९८ पर्यंत डायरेक्टर होतो. व पुन्हा १९९८ साली डायरेक्टर म्हणून बँकेवर निवडून आलो. सन २००१ चे 23 ऑगस्ट पासून मी व्हाइस चेअरमन म्हणून काम करतो

बोर्ड ऑफ डायरेक्टरचे रिझ्युलेशन प्रमाणे ५ सप्टेंबर २००१ पासून गुंतवणूकीचे अधिकार व्हाइस चेअरमन ला पण देण्यात आले.

दिनांक 23.८.२००१ या ठराव दिनांक ५.९.०१ रोजी झालेले मी प्रोसीडींग बुक मधील ठराव वाचले. दिनांक 23.८.२००१ रोजीचे ठरावानुसार मी सुवर्णयुग सहकारी बँकेचा व्हाईस चेअरमन झालो. व दिनांक ५.९.२००१ चे डायरेक्टर बोर्डचे ठरावानुसार सरकारी कर्ज रोखे, बॉन्डस इत्यादी खरेदी विक्रीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा० अध्यक्ष / मा. उपाध्यक्ष / मा. सरव्यवस्थापक यांचेकडे राहतील असे त्यात नमूद आहे.

होमट्रेडशी सुवर्णयुग सहकारी बँकेचे सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्रीचे व्यवहार जे झाले व कुठल्या पद्धतीने

झाली हे मला माहीती नव्हते. व त्यासाठी चेअरमन मंजुरी देत होते व त्यासाठी जनरल मॅनेजर हे काम करीत होते. सरकारी कर्ज रोखे, बॉन्ड, बेअरर बॉन्ड इ. चे खरेदी विक्रीचे सर्व निर्णय चेअरमन व जनरल मॅनेजरच घेत असत. व त्याद्वारेच संबंधित पार्टी व बँकांशी बोलणी, पत्र व्यवहार इ. तेच करीत असत. बोर्ड ऑफ डायरेक्टरची मिटींग जेव्हा होत असे तेव्हा फक्त ते या खरेदी विक्रीतून जो फायदा झाला ते सांगत असत. परंतु सविस्तर माहीती देत नव्हते. परंतु पुढील मिटींगचे वेळी मागील मिटींगचे प्रोसीडींग सविस्तर प्रोसीडींग बुकमध्ये लिहून ते सविस्तर वाचून दाखविले असत. व त्यावर उपस्थित चेअरमन, जनरल मॅनेजर, व्हाईस चेअरमन, डायरेक्टर यांच्या सह्या घेत असत. जरी झालेल्या व्यवहारा बाबत संपूर्ण माहिती होत नसली तरी सुध्दा त्यांचेवर विश्वासाने सह्या केल्या जात असत.

होम ट्रेड लि. बरोबर सरकारी रोखे, बॉन्ड इ. च्या खरेदी विक्रीचा व्यवहार करण्याचा निर्णय चेअरमन व जनरल मॅनेजर यांनीच घेतला. होमट्रेड बरोबर व्यवहार होऊन वेळोवेळी कॉन्ट्रॅक्ट नोट व बील व पत्र यावर माझ्या कधीही सह्या नव्हत्या. परंतु ज्यावेळी एप्रील २००२ नंतर होमट्रेड लि. ने बँकेस फसवण्याबाबतचे प्रकरण जेव्हा चव्हाट्यावर आले, त्या दरम्यान रिझर्व बँक ऑफ इंडिया चे स्पेशल ऑडीट सुवर्णयुग बँकेत चालू होते तेव्हा रिझर्व बँकेचे अधिकारी खान. यांनी सुवर्णयुग बँकेच्या अधिकाऱ्यांना सांगितले की, कॉन्ट्रॅक्ट नोटवर आपण पदाधिकारी, व्हाईस चेअरमन यांच्या सह्या नसल्याने त्यांच्या सह्या कॉन्ट्रॅक्ट नोट, बील इ. कागदपत्रावर घ्याव्यात. म्हणून सुवर्णयुग बँकेतील अधिकारी श्री राजीव फुले व विनायक घाटे हे अधिकारी माझेकडे मी सुवर्णयुग बँकेच्या जुन्या इमारतीत गणपती भवन येथे बसलो असताना आले. त्यांनी सांगितले की, रिझर्व बँकेच्या ऑडीटरनी कॉन्ट्रॅक्ट नोट व बिलावर व्हाईस चेअरमन यांच्या सुध्दा सह्या घेण्यास सांगितले आहे. म्हणून आम्ही आपल्या सह्या घेण्यासाठी आलो आहोत. सोबत त्यांनी एक बोलका फाईल आणली होती. त्याचे आतील बिलावर

समक्ष
[signature]
पोलीस निरीक्षक
आ.प्र.वि. पथक, गुन्हे शाखा, पुणे

व कॉन्ट्रॅक्ट नोट वर टॅग लावलेले होते. त्यांचे सांगणे प्रमाणे मी त्यावर विश्वासाने सह्या केल्या. मी भांबावलेल्या स्थितीत असल्याने सह्या केल्या. जरी मी त्यावर सह्या केल्या तरी मला चेअरमन व जनरल मॅनेजर यांनी कधीही होमट्रेड बरोबर झालेल्या व्यवहाराची कल्पना वा माहिती दिली नव्हती. मी ज्या कॉन्ट्रॅक्ट नोटवर व बीलावर सह्या केल्या त्याच्या मी सह्या करण्यापूर्वीच्या झेरॉक्स प्रती माझेकडे आहेत. मला ह्या प्रती बँकेचे अधिकारी राजीव फुले यांनी दिल्या.

सुवर्णयुग सहकारी बँकेच्या पोटनियमा प्रमाणे सह्यांचे अधिकार चेअरमन यांना दिलेले आहेत. त्याची कार्यवाही सरव्यवस्थापक (G.M.) यांनी करावयाची आहे. चेअरमनच्या अनुपस्थितीमध्येच फक्त अधिकार व्हाइसचेअरमन यांना देण्यात आले आहेत. परंतु तशी कधी वेळच आली नाही.

चालु वर्षी जनरल मॅनेजर यांनी राजीव फुले यांचे मार्फत सांगितले वरुन मी कॉन्ट्रॅक्ट नोट, बील व प्रस्तावावर सह्या केल्या आहेत तत्पूर्वी तशा संदर्भातील कागदपत्रावर कधीही सह्या केल्या नव्हत्या.

माझी वरील टिपण मला वाचून दाखवली ते माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे

ते मी वाचून पाहीले व मला वाचून दाखवले
ते माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

म्हणून माझे सांगणे

समक्ष

पोलीस निरीक्षक
अं.पगवि पथक, गुन्हेशाखा
पुणे शहर

दिनांक ता. ९.१०.२०२२ (७९५)

माझे जबाब - सुमित विष्णुप्रसाद तारी, ५ वय ३८
धंदा - नोकरी - अकौंटंट रा. ३०८ (अ) अमलताष
वेद. पांडेन अपार्टमेंट पुणे - २

पुन्हा समक्ष विचारले वरून सांगतो की, मी सुवर्णयुग सहकारी बँक पुणे येथील हेडऑफिसमध्ये लिपीक म्हणून जानेवारी १९९७ मध्ये नोकरीस लागलो. त्यानंतर मी सन २००० साली जुलै महिन्यात अकौंटंट म्हणून बढती मिळाली. लिपीक असताना मी सगळ्या सेक्शन मध्ये कामे केली. उदा. क्लार्क, सेव्हींग, कॅशबुक क्लिअरिंग, आकडेवारी विभाग इत्यादि विभागात कामे केली.

अकौंटंट म्हणून बढती मिळाल्यावर रोजचा जमाखर्च, त्याची चाचणे तपासणे सर्व शाखांचे आकडेवारीचे एकत्रीकरण करणे. आर. बी. आय, सहकार खाते यांना पाठविण्यात येणारी माहिती पत्रके तयार करणे. एस. जी. एल. रोखे व्यवहारा मध्ये ब्रोकर कडून दर मागवून मा. सरव्यवस्थापक यांचेकडे सादर करणे. सरव्यवस्थापक सांगतील त्या पद्धतीने ब्रोकर कडून उदा. फोन करून मागवित असे. तसेच सरव्यवस्थापक व व्यवस्थापक हे सांगतील ती कामे करणे.

सुवर्णयुग बँकेचे इन्व्हेस्टमेंट रजिस्टर श्री. दिनेश वरदशी हा लिपीक गेल्या एक वर्षापासून लिहित आहे. त्यापूर्वी लेखनीक गणेश सिंगाराम त्या लिपीक याने लिहिले आहे. सदर रजिस्टरचे चेकींग श्री. राजीव कुले हे बँकेचे अधिकारी करीत असत. बँकेत येणारे बॉन्डस्, रोखे व त्यासंदर्भात इतर बँका, आर्थिक संस्था व कंपन्या यांचे बरोबर संपूर्ण व्यवहार स्वतः जनरल मॅनेजर श्री. सुरेश काळे हे बघत असत. त्याबाबत ते चेअरमन उल्हास काळे यांचेशी सल्लामसलत करीत असत. जनरल मॅनेजर सुरेश काळे. हे बॉन्डस्, रोखे हे स्वतःचे ताब्यात ठेवीत असत. होम ट्रेड बरोबर सुवर्णयुग बँकेचे व्यवहार हे १९९९ पासून आहेत. सुवर्णयुग सहकारी बँकेत गिल्ट-

Read

मॅनेजमेंटच्या अध्यक्ष व होमट्रेडचे संचालक व ब्रोकर केतन सेठ हे दोनदा तिनदा आलेले मी पाहिले असून त्यांची व चेअरमन तसेच जनरल मॅनेजर सुरेश काळे यांची भेट झाल्याचे माहित होते तीन वर्षात मी पाहिले आहे. तसेच चेअरमन उल्हास काळेखे व जनरल मॅनेजर काळे यांचेशी फोनवरून केतनसेठेशी बोलणे झाल्याचे मी अनेक वेळा ऐकले आहे. चेअरमन उल्हास काळेखे व जनरल मॅनेजर श्री. सुरेश काळे हे माझ्या बरोबर रोखे, बॉन्डस् याबाबत काही बोलत नसत. परंतु कॉन्ट्रॅक्ट नोटस् व बिलावर सह्या करणेचे वेळी त्यांचा संबंध येत असे. श्री. काळे साहेब यांचे सांगण्यावरून मी चेअरमन यांची कॉन्ट्रॅक्ट नोटस् वर सही घेणेसाठी मी काही वेळा गेलो आहे. त्यावेळी त्यांनी संपूर्ण माहिती घेऊन व विचारून सह्या करीत असत. त्या व्यवहाराबाबत त्यांना आणखी जनरल मॅनेजर श्री. काळे साहेब यांचेकडून माहिती कल्पना असायची होम ट्रेड लि. बरोबर व सुवर्णयुग सहकारी बँक बरोबर जे व्यवहार झाले त्या संदर्भातील कॉन्ट्रॅक्ट नोट व बिल सन १९९९ ते ३० जानेवारी २००२ च्या दरम्यानच्या अध्यक्ष व व्हाईस चेअरमन यांच्या सह्या मला आता दाखवल्या त्या पाहून व ओळखून मी सांगतो की, सदरच्या सह्या अध्यक्ष उल्हास काळेखे व व्हाईस चेअरमन उल्हास भट यांच्याच आहेत.

गुंतवणूक रजिस्टरमध्ये काही नोंदी खास रोखे, बॉन्डस् इ. चे डिस्टींक्टिव्ह नंबर लिहिले जात नसत. कारण की, रोखे व बॉन्डस् स्वत: जनरल मॅनेजर यांच्या ताब्यात असत व ते सांगतील तेव्हाच नंबर लिहिले जात असत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे बॉन्डस्चे ॲलॉटमेंट लेटर विभागी आल्यानंतर होमट्रेडच्या प्रतिनिधीस दिनांक २५.२.२००२ रोजी जनरल मॅनेजर यांचे सांगण्यावरून मी गुंतवणूक रजिस्टर लिहिणारे क्लार्क परदेशी यांना देणेस सांगितले त्यावरून त्याची सही घेऊन देण्यात आले. तो

समक्ष
(सही)
पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग
पुणे शहर

पुरवणी टिपण - सुनिल विष्णूप्रसाद वारी याचे पुन्हा घेत-
लेले टिपण खालीलप्रमाणे आहे. (914) 2

प्रतिनिधी कोण होता त्याचे नाव काय हे मला माहित
नाही.

वरील माझे टिपण मी स्वतः वाचून पाहिले
मला वाचून दाखविले ते माझे सांगणे प्रमाणे लिहिले असून
ते बरोबर आहे.

म्हणून माझे सांगणे.

समक्ष

पोलीस निरीक्षक
गुन्हे अन्वेषण विभाग पुणे शहर